म. ग्रं. सं. ठाणें

विषय [illegible]

सं. क्र. १८५

१८३८

REFBK-0005832

REFBK-0005832

[illegible]
37131[illegible]

# लोकमाता

[ भारतांतील नद्या ]

दत्तात्रेय बाळकृष्ण कालेलकर

ग्रं. क्र. ५८३२

विश्वस्य मातरः सर्वाः
  सर्वाश्चैव महाफलाः ।
इत्येताः सरितो राजन्
  समाख्याता यथास्मृति ॥

—महाभारत, भीष्मपर्व ९-३७-३८

REFBK-0005832

नवजीवन प्रकाशन मंदिर
अमदाबाद

मुद्रक आणि प्रकाशक
जीवणजी डाह्याभाई देसाई
नवजीवन मुद्रणालय, कालुपुर, अमदावाद

प्रथम आवृत्ति, प्रति ३२००

अेक रुपया

मे, १९४७

# भक्तीचा प्रवाह

कृष्णेच्या कांठीं ज्याचें बाळपण गेलें, किशोर वयांत ज्यानें समुद्रकांठीं वाळूचे किल्ले बांधले, गंगा-यमुनेच्या संगमस्थानीं ज्यानें स्वतःच्या आओी-बापांच्या अस्थींचें विसर्जन केलें, गंगोत्री, जम्नोत्री, त्र्यंबकेश्वर आणि लोणावळा वगैरे ठिकाणीं ज्यानें पवित्र नद्यांचें अुगम पाहिले, हिरांबंदर, केटीबंदर, अड्यार, कारवार वगैरे ठिकाणीं ज्यानें सागरसरितांचा संगम न्याहाळला, त्याच्या जवळ नद्यांविषयीं सांगण्याजोगें थोडेंथोडकें नसणार.

निसर्गाचें आकर्षण, अितिहासाचा ओढा आणि धर्मभावनेंतील काव्य या संस्कार-त्रयीनें ज्याचें जीवन समृद्ध झालें आहे, त्याची वाणी मूळची मूक असली तरी यथाकाळीं वाचाळ होणारच. जें पोटांत सांठवलें असेल तें ओठांवाटे बाहेर पडल्यावांचून कसें राहील? अगदीं राहवेना, म्हणूनच भारतवर्षांतील पाहिलेल्या कित्येक नद्यांचें येथें स्मरणपूर्वक अुपस्थान केलें आहे.

जगांतील सर्वच मानवांना नदीविषयीं आकर्षण वाटत असतें. आपल्या पूर्वजांनीं तर नदीच्या ध्यानाला आध्यात्मिक साधनेंतच स्थान दिलें आहे. आणि आपल्या विद्वानांनीं नद्यांविषयींच्या माझ्या ह्या लहानशा लेखमालेला तरुणांच्या शिक्षणक्रमांत स्थान दिलें आहे. ह्यामुळें ही लेखमाला मराठी वाचकांना आवडेल, असा विश्वास वाटतो. वाचकांचा आनंद हेंच लेखकाचें समाधान होय.

काका कालेलकर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | सखी मार्कंडी | ३ |
| २. | कृष्णेचीं संस्मरणें | ५ |
| ३. | शेतकरी नदी | १० |
| ४. | गंगामाई | ११ |
| ५. | संगम | १५ |
| ६. | वेदांची धात्री | १७ |
| ७. | अंबा-अंबिका | १८ |
| ८. | शोणभद्र | १८ |
| ९. | चंबल | २० |
| १०. | स्वर्धुनी वितस्ता | २१ |
| ११. | दूधगंगा | २५ |
| १२. | रावी | २७ |
| १३. | पिनाकिनी | २८ |
| १४. | रेणुकेचा शाप? | ३० |
| १५. | मूळ त्रिवेणी | ३२ |
| १६. | फल्गु | ३३ |
| १७. | नदीवर कालवा | ३४ |
| १८. | सिंधूचा विषाद | ३६ |
| १९. | बिहारची गंडकी | ४१ |
| २०. | सागर-सरितांचा संगम | ४३ |
| २१. | यमुनाराणी | ४५ |
| २२. | ताप्ती | ५० |
| २३. | स्तन्यदायिनी चिनाब | ५१ |
| २४. | नेपाळची गंगा | ५२ |
| २५. | दक्षिणगंगा गोदावरी | ५५ |
| २६. | सुवर्णदेशाची माता | ६४ |
| २७. | जोगचा धबधबा | ६९ |
| २८. | जोगचें पुनर्दर्शन | ८८ |

# लोकमाता

## अर्थात्

## भारतवर्षांतील नद्यांचें वर्णन

" गङ्गे च यमुने चैव कृष्णे, गोदे, शरावति ।
ऐरावति, महासिन्धु, ग्रंथेऽस्मिन्संनिधिं कुरु ॥ "

नों. क्र. १४८८८
३१।३।५३

१

# सखी मार्कंडी*

काय प्रत्येक नदी माताच असते? नाहीं. मार्कंडी ही माझी बाळपणची सखी आहे. अितकी चिमुकली आहे कीं तिला मी वडील बहीण सुद्धां मानण्यास तयार होणार नाहीं. आमच्या शेतांत दुपारीं अुंबराच्या झाडाखालीं छायेंत बसलों असतां मार्कंडीवरील मंद वायु मला हटकून बोलवावयाचा. मार्कंडीच्या कांठावर मी किती तरी वेळां बसलों आहें आणि वाऱ्याच्या झुळकेनें डोलणारी गवताची पाती तासन् तास पाहत राहिलों आहें. मार्कंडीच्या कांठावर असाधारण किंवा अद्‌भुत असें कांहींच नाहीं; विशेष फुलेंहि नाहींत; तऱ्हेतऱ्हेचीं रंगीबेरंगी फुलपांखरेंहि नाहींत; फार काय, मजेदार धोंडे सुद्धां नाहींत. आपल्या कलरवानें मनाला अस्वस्थ करतील असे लहानमोठे प्रपातहि नाहींत. तेथें आहे केवळ प्रेमळ शांति.

गुराखी म्हणतात कीं, मार्कंडी वैजनाथाच्या डोंगरांत अुगम पावते. पण तिचें मूळ शोधून काढण्याची अिच्छा मला कधींच झाली नाहीं. आमच्या तालुक्याचा नकाशा हातीं आला तरी त्यांत मार्कंडीची रेषा शोधण्याच्या भरीस मी पडलों नाहीं. कारण, तसें केल्यास ती सखी न राहतां नदी व्हावयाची! मला आपलें तिच्या पाण्यांत पाय सोडून बसणेंच आवडतें. पाय ठेवला रे ठेवला कीं, तात्काळ खळखळ खळखळ असा तिचा नाद चालू होतो. लहानपणीं आम्ही किती तरी गुजगोष्टी करीत असूं. आमच्या आनंदाला अेकमेकांचा सहवासच पुरा असे. मार्कंडी काय बोलते तें समजून घेण्याची पर्वा मीं कधीं केलीच नाहीं; आणि मी जें बोलत असें त्याचा अर्थ करण्याची अुठाठेव मार्कंडीला नसे. आम्ही अेकमेकांना अुद्देशून बोलत आहोंत अेवढीच गोष्ट आम्हां दोघांना पुरेशी

*बेळगांव जिल्ह्यांतील बेळगुंदी गांवाजवळून वाहत असलेली अेक चिमुकली नदी.

होती. भाअूबहीण पुष्कळ वर्षांनीं भेटतात तेव्हां हजारों प्रश्न अेकमेकांस करतात; पण त्या प्रश्नांमागें जिज्ञासा नसते; तो अेक केवळ प्रेम व्यक्त करण्याचा प्रकार असतो. प्रश्न काय विचारला व अुत्तर काय मिळालें अिकडे लक्ष देण्यासारखी मनःस्थिति प्रेममीलनच्या वेळीं कोठून असणार ?

मार्कंडीच्या कांठाकांठानें मी गात फिरत असें आणि मार्कंडी अैकत असे. सोळाव्या वर्षीं आपणांस नेण्यासाठीं आलेल्या यमराजाला शिवभक्तीच्या बळावर मागें हटविणाऱ्या मार्कंडेय अृषीचें आख्यान गाण्यांत मला किती आनंद वाटत असे !

“ साधु सुंदर शाहणा सुत तया सोळाच वर्षें मिती ।
जो कां मूढ कुरूप तो शतवरी वर्षें असे स्वस्थिती ॥
या दोहींत जसा मनांत रुचला तो म्यां तुतें दीधला ।”

असें वरदान महादेवानें मृकंडु अृषीला दिलें. “ दोहोंतून कोणता वर पसंत करावा ? ” अृषीनें धर्मपत्नीला विचारलें. दोघांनीं सद्गुणी पुत्र सोळाच वर्षें जगला तरी चिंता नाहीं, तो कुलोद्धारक होअील, असें मानून त्याचीच याचना केली. मार्कंडेय जसजसा मोठा होत चालला तसतशी आअीबापांचीं तोंडें म्लान होअूं लागलीं. शेवटीं सोळा वर्षें पूर्ण झालीं. तरुण मार्कंडेय पूजेला बसला आहे अशा वेळीं यमराज रेड्यावर बसून आला. पण शिवलिंगाला मिठी मारून बसलेल्या तरुण साधूला शिवण्याचें धैर्य त्याच्यांत कोठून असणार ? तरीहि त्यानें पाश फेंकलाच. लिंगांतून त्रिशूलधारी महादेव प्रकट झाले; आणि भलतेंच साहस केल्याबद्दल यमराजाला रागें भरून घ्यावें लागलें. मृत्युंजय महादेवाच्या दर्शनानंतर मार्कंडेयाला मृत्यूची भीति कोठून राहणार ? त्याची आयुर्धारा अद्यापि वाहत आहे.

मी कॉलेजांत शिकत होतों तेव्हां परीक्षा झाल्यानंतर आमची भाअुबीज होत असे. कापणीच्या सुगीच्या दिवसांत मला दोन दोन दिवस शेतांतच घालवावे लागत. तेव्हा मार्कंडी मला गोड गोड रताळीं देत असे आणि अमृतासारखें पाणीहि देअी. रात्रीं ती थंडींत कुडकुडते किंवा कसें हें पाहावयाला मी जाअीं तेव्हां आपल्या आरशांत ती मला मृगनक्षत्र दाखवीत असे.

आजहि जेव्हां जेव्हां मी घरीं जातों, तेव्हां तेव्हां मार्कंडीला भेटल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं. पण आतां ती पूर्वीप्रमाणें माझ्याशीं लडिवाळपणा करीत नाहीं. किंचित् स्मित करून मौन धारण करते. तिच्या सुकुमार मुखावर पूर्वीचें लावण्य दिसून येत नाहीं. पण तिचा स्नेहभाव मात्र अधिक गाढ झाला आहे.

## २

# कृष्णेचीं संस्मरणें

### १

अेकादशीचा दिवस होता. गाडींत बसून आम्ही माहुलीस जाण्यास निघालों होतों. सातार्‍याहून माहुली बरीच दूर आहे. रस्त्यांत अुजव्या बाजूस शाहूमहाराजांच्या अिमानी कुत्र्याची समाधि लागते. रस्त्यावरून आमच्याप्रमाणेंच पुष्कळ लोकांनीं गाड्या माहुलीकडे भरधांव सोडल्या होत्या. शेवटीं आम्ही नदीकांठीं पोहोंचलों. तेथें या कांठापासून त्या कांठापर्यंत लोखंडाची सांखळी अुंचावर ताणून बांधिली होती. माझ्या बालदृष्टीला भव्य वाटणारी अेक होडी त्या सांखळीला टांगून ठेवण्यांत आली होती.

तीरावरील काळे गोटे किती गुळगुळीत आणि गार लागत! अेक हातांत घेतला नाहीं तोंच दुसर्‍यावर दृष्टि जाअी; तो याच्यापेक्षां चांगला वाटे. अितक्यांत तिसर्‍या ओल्या गोट्यावर अुदी रंगाच्या रेघा दिसत; त्याबरोबर तो घेण्याची अिच्छा होअी. त्या दिवशीं मला कृष्णेचें पहिलें दर्शन घडलें. कृष्णाबाअीनें मला प्रथम ओळखलें. मीं कृष्णेला ओळखावें अितका त्या वेळीं मोठा झालों नव्हतों. मूल आअीला ओळखूं लागतें त्यापूर्वींच आअीनें त्याला आपलेंसें केलेलें असतें. आम्ही नागव्यानें पुष्कळ वेळपर्यंत पाण्यांत डुंबलों. अुड्या मारल्या, पाणी अुडविलें, आणि होडीवर चढून पाण्यांत बुड्या मारल्या आणि कडकडून भूक लागेपर्यंत कृष्णेंत जलविहार केला.

नदीचें हें दर्शन ज्याप्रमाणें पहिलेंच होतें, त्याचप्रमाणें अंघोळ केल्यावर खाऱ्या शेंगदाण्यांची न्याहारी केली तोहि स्वाद त्या प्रकारचा पहिलाच होता. यात्रेच्या वेळीं मोरांच्या पिसांचा टोप घालणारे 'वासुदेव' भीक मागण्यास आले होते. त्यांचें गोड भजनहि त्या दिवशीं प्रथमच अैकलें. कृष्णाबाअीच्या देवळांत थोडा वेळ विश्रांति घेअून आम्ही परतलों.

सह्याद्रीच्या अरण्यांत महाबळेश्वराजवळ अुगम पावून साताऱ्यापर्यंत धावत येण्यास कृष्णेला फारसा वेळ लागत नाहीं; पण तितक्यांतच वेण्या कृष्णेला भेटण्यास येते. या संगमामुळेंच तर माहुलीचें माहात्म्य. दोन मुली अेकमेकींच्या खांद्यावर हात ठेवून खेळावयास जातात तशाच प्रकारचें हें दृश्य, नाहीं म्हटलें तरी पसतीस वर्षें, या हृदयांत अुमटलेलें आहे !

कृष्णेचा कुटुंबविस्तार फार मोठा आहे. किती तरी लहानमोठ्या नद्या तिला येअून मिळतात. गोदावरीप्रमाणें कृष्णेलासुद्धां 'महाराष्ट्रमाता' म्हणतां येअील. ज्या काळीं सांप्रतची मराठी भाषा बोलण्यांत येत नव्हती त्या काळचा सारा महाराष्ट्र कृष्णेनें व्यापून टाकला आहे.

## २

अेकदां नरसोबाच्या वाडीला जात असतांना होडीवर गाडी चढवून आम्ही कृष्णेपार गेलों तें कृष्णेचें दुसरें दर्शन. अेका बाजूनें सुळक्या कड्यासारखा अुंच कांठ आणि दुसऱ्या बाजूनें दूरवर पसरलेला गाळाचा विस्तार आणि त्यांत अुगवणारीं वांगीं, काकड्या, खिरे, कलिंगडीं यांचीं अमृतमय शेतें ! कृष्णाकांठचीं तीं वांगीं ज्यांनीं खाल्लीं आहेत त्यांना स्वर्गांत सुद्धां त्यांची वासना होअील ! सतत अेकदोन महिने वांगींच खात राहिलों तरीहि तृप्ति होणार नाहीं, मग वीट कोठून येणार ?

## ३

सांगलीजवळ कृष्णाकांठींच मी महाराष्ट्राचें संस्थानी वैभव प्रथम पाहिलें. सुंदर बांधकाम केलेले विशाल घाट व चकाकणाऱ्या घाटदार घागरी कडेवर घेअून जाणाऱ्या महाराष्ट्रललना, पाण्यांत अुड्या मारून कांठावरील लोकांना भिजवून टाकण्याची हौस बाळगणारे आडदांड आखाडेबाज, क्षुद्र घंटिकांच्या

तालबद्ध आवाजांत आपलें आगमन सुचविणारे पहाडासारखे हत्ती आणि 'क ऱ्ऱ्ऱ्ऱ्' असा अेकश्रुति ध्वनि करून रसपान करण्यासाठीं निमंत्रण करणारे अुसाचे चरक–हें कृष्णाबाअीचें तिसरें दर्शन !

मला चांगलेंसें पोहतां येत नव्हतें तरी सुद्धां अेक मोठी घागर पाण्यांत अुलटी टाकून तिच्या आधारानें तरंगण्याची अिच्छा मनांत धरून मीं अेकदां नदींत प्रवेश केला. पण अेका जागीं चिखलांत असा रुतलों कीं, अेक पाय वर काढूं जातां दुसरा अधिक खोलांत जाअी. आणि चिखल तरी कसला ? जणूं काळेंभोर लोणीच ! मला वाटलें कीं, आतां आपली हालचाल बंद होअून आपण अुलट्या झाडासारखे येथें स्थावर होणार ! त्या दिवशींची तिरपीट मी अद्यापि विसरलेलों नाहीं.

४

चिंचली स्टेशनावर आम्हांला नेहमीं कृष्णानदीचें पाणी प्यावयास मिळत असें. आमचे अेक ओळखीचे गृहस्थ तेथें स्टेशनमास्तर होते. आम्हांला तहान असो वा नसो, आमचे वडील मोठ्या भक्तीनें आम्हांला सर्वांना पाणी पिण्यास सांगत. कृष्णा ही महाराष्ट्राची आराध्य देवता. तिचें थेंबभर सुद्धां पाणी पोटांत गेल्यास आपण पावन होअूं ! ज्याच्या पोटांत कृष्णेचा अेक बिन्दु गेला आहे तो महाराष्ट्रीयपणा कधीं विसरणार नाहीं. श्रीसमर्थ व शिवाजीमहाराज, शाहू व बाजीराव, घोरपडे व पटवर्धन, नाना फडणवीस व रामशास्त्री — थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्राचें साधुत्व व वीरत्व, महाराष्ट्राची न्यायनिष्ठा व मुत्सद्दीपणा, धर्म व सदाचार, देशसेवा व विद्यासेवा, स्वतंत्रता व अुदारता हीं सर्वच कृष्णेच्या वात्सल्यांत वाढलीं आहेत. देहू व आळंदी येथील अिंद्रायणीचें पाणी कृष्णेलाच मिळतें. पंढरपुरची चंद्रभागा सुद्धां भीमा होअून कृष्णेंतच विलीन होते. "गंगास्नान आणि तुंगापान" या म्हणींत जिचा गौरव व्यक्त झाला आहे ती तुंगभद्रा कर्नाटकाच्या प्राचीन वैभवाच्या स्मरणासहित कृष्णेंतच मिसळून जाते. खरें सांगावयाचें म्हणजे महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगण (आंध्र) या तीन देशांचें अैक्य साधण्यासाठीं कृष्णा वाहत आहे. या तीनहि प्रांतांनीं कृष्णेचें दुग्धपान केलें आहे. कृष्णेंत प्रांतीयता नाहींच !

५

कॉलेजांतील दिवस. मोठ्या आशेनें पुण्याहून वडील बंधूंना भेटण्यासाठीं घरीं गेलों. पण मी पोहोंचण्यापूर्वींच ते अिहलोकाचा त्याग करून गेले होते ! त्यांच्या अस्थि कृष्णानदीच्या पवित्र जलांत विसर्जन करण्याचें माझ्या नशिबीं आलें ! बेळगांवहून मी कुडचीला गेलों. संध्याकाळची वेळ होती. आगगाडीच्या पुलाखालीं कृष्णाबाअीची पूजा केली. वडील बंधूंच्या अस्थि प्रवाहांत सोडून दिल्या, स्नान केलें आणि मांडी घालून जीवन-मरणाचा विचार करीत बसलों. कृष्णेच्या पाण्यांत किती तरी महाराष्ट्र-वीरांचें, तसेंच महाराष्ट्राच्या शत्रूंचें रक्त मिसळलें असेल ! पावसाळी अुन्मादांत कृष्णेनें किती तरी शेतकऱ्यांना आणि त्यांच्या गुरांढोरांना जलसमाधि दिली असेल ! पण कृष्णेला त्याचें काय होय ? मदमत्त हत्तींनीं तिच्या पाण्यांत विहार केला काय, किंवा वीतराग साधूंनीं तिच्या कांठीं तपश्चर्या केली काय, कृष्णेला दोन्हीं सारखींच. माझ्या बंधूंच्या अस्थि व खडे होअून पडलेल्या पहाडांच्या अस्थि यांत कृष्णेला भेद कोठून वाटणार ? माहुलीस गेलों असतांना मला आपल्या खांद्यांवर अुभा करून पाण्यांत अुडया मारण्यास अुत्तेजन देणाऱ्या वडील बंधूंच्या अस्थि माझ्या हातानें त्याच कृष्णेच्या पाण्यांत विसर्जन करणें माझ्या वांट्याला आलें ! किती अतर्क्य ही जीवनलीला !

६

कृष्णेच्या पाण्यांत माझा दुसराहि अेक भाअू निजलेला आहे ! ब्रह्मचारी अनंतबुवा मरढेकर हे आमचें परस्पराचें हार्दिक प्रेम पाहतां माझ्या अगदीं धाकट्या भावासारखे होते; आणि देशसेवेच्या व्रताच्या बाबतींत ते मला माझ्या वडील बंधूंच्या ठिकाणीं होते. स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व गोसेवा असें त्रिविध कार्य करीत असतां त्यांनीं बाअीस देह सोडला. त्यांनीं माझ्याबरोबर गंगोत्रीची व अमरनाथची यात्रा केली होती. पण कृष्णाकांठीं येअूनच ते अमर झाले. भक्तीच्या अुमाळ्यांत ते कितीदां तरी देहभान विसरून जात आणि पुष्कळ ठिकाणीं ठेंचाळत. याचा अनुभव मला हिमालयांतील प्रवासांत पुष्कळदां आला होता. मी त्यांना

पुष्कळदां रागें भरत असें, पण ते जुमानीत नसत. ते आपले श्रीसमर्थांच्या प्रासादिक वाणीच्या तंद्रींत असावयाचे. कृष्णेलो सुद्धां त्यांनी रागें भरावेंसें वाटलें असावें. देवळाला प्रदक्षिणा घालीत असतांनाच ते वरून खालीं अेका डोहांत पडले आणि स्वर्गवासी झाले ! जेव्हां वाअीच्या खडकाळ पटावरून वाहणाऱ्या गंगेची मला आठवण होते, प्रत्येक पावसाळ्यांत कृष्णेंत शिरःस्नान करणाऱ्या देवळांच्या शिखरांचें मला दर्शन होतें, तेव्हां कृष्णेच्या कुशींत माझाहि अेक भाअू सदैव झोंप घेत आहे, या गोष्टीचें मला स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं; आणि त्यांच्या तपोनिष्ठ, पण प्रेमसुकुमार मूर्तीचें दर्शन घडल्यावांचून राहत नाहीं !

७

सन १९२१ चें साल ! भारतवर्षानें अेका वर्षांत स्वराज्यसिद्धि करण्यासाठीं कंबर बांधली आहे. हिंदु-मुसलमान अेक झाले आहेत. तेहतीस कोटि देवांसारखे भारतवासी कोटिकोटीच्या संख्येंतच विचार करूं लागले आहेत. स्वराज्य-महर्षि लोकमान्य टिळक यांचें स्मरण सदैव राखण्यासाठीं टिळक-स्वराज्य-निधि म्हणून अेक कोटि रुपये गोळा करावयाचे आहेत. राष्ट्रीय सभेच्या निशाणाखालीं काम करणाऱ्या सभासदांची संख्याहि अेक कोटि करावयाची आहे. आणि पट-वर्धन श्रीकृष्णाच्या सुदर्शनाप्रमाणें असणारे रहाटसुद्धां तितक्याच संख्येनें या धर्मभूमींत चालू करावयाचे आहेत. यासाठीं भारतमातेचे सुपुत्र बेझवाडा येथें गोळा झाले आहेत. श्री. अब्बाससाहेब आणि पुणतांबेकर, गिदवाणी आणि मी, अेकत्रच बेझवाड्याला पोहोंचलों आहों. अशा मंगल प्रसंगीं श्रीकृष्णांबिकेचें विराट्दर्शन घडण्याचें सद्भाग्य मला लाभलें. वाअी येथें ज्या कृष्णानदीच्या कांठीं बसून संध्यावंदन केलें आणि न्यायनिष्ठ रामशास्त्र्यांच्या व राजकार्यधुरंधर नानांच्या गोष्टी केल्या, तीच चिमुकली कृष्णा येथें अेवढी प्रचंड झालेली पाहून प्रथम तर खरेंच वाटेना. कोठें ती माहुलीची लहानगी सांखळी आणि कोठें हें युरोप-अमेरिकेला जोडणाऱ्या तारायंत्रासारखे येथले तारांचे दोरखंड ! येथें हजारों व लाखों लोक स्नानाला येत. स्थूलकाय आंध्र बांधवांत आज भारतवर्षांतील सारे बंधु मिसळून गेले आहेत. राष्ट्रीय

हिंदीचा वाक्प्रवाह जेथें तेथें अेकूं येत आहे. कृष्णानदीला जशा वेण्या, वारणा, कोयना, भीमा, तुंगभद्रा येअून मिळतात, तसे खेड्यांतील लोक टोळ्याटोळ्यांनीं आल्यानें बेझवाडा भरून अुतूं जात आहे ! अशा प्रसंगीं रोज कृष्णेंत स्नान करण्याचा अलभ्य लाभ मिळत असे. ज्या कृष्णेनें जन्मकाळचें दूध दिलें त्याच कृष्णेनें स्वराज्याकांक्षी भारतराष्ट्राचें गौरवशाली दर्शन करविलें. जय कृष्णे ! तुझा विजय असो, भारतवर्ष अेक होवो, स्वतंत्र होवो !

३

# शेतकरी नदी

घटप्रभा व मलप्रभा या आमच्याकडील कर्नाटकांतील नद्या स्वाभाविकपणेंच शेतकरी आहेत. जेथें जातात तेथें शेती करतात, जमिनीला खत देतात, पाणी पुरवतात, अुद्योगी लोकांना समृद्ध करतात. त्यांतच आणखी गोकाकजवळ अेक मोठा बांध घालून मनुष्यानें या नदीची शक्ति वाढविली आहे. जेथें नदीचें पाणी पोंचत नव्हतें तेथें या बांधामुळें तें पोंचलें आहे. घटप्रभेच्या नांवाबरोबर गोकाकच्या लांबच लांब धरणाची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. मोठमोठ्या नद्या जिकडून तिकडून गाळ खेंचून घेअून जातात. अुलट, अशा लहान नद्या मिळेल तेथून थोडा थोडा चांगला कसदार गाळ आपल्या पाण्याबरोबर शेतकऱ्यांना फुकट देअून आपल्या मुलांचें पालन करतात. खरोखरीच घटप्रभा जातीनें शेतकरी आहे.

स. ... ५.१९
स्थळ प्रत

# ४

# गंगामाअी

## १

गंगेनें कांहींच केलें नसतें आणि अेकट्या देवव्रत भीष्माला जन्म दिला असता तरीसुद्धां आर्यजातीची माता म्हणून आज ती प्रख्यात झाली असती. पितामह भीष्मांची प्रतिज्ञा, भीष्मांची निःस्पृहता, भीष्मांचें ब्रह्मचर्य आणि भीष्मांचें तत्त्वज्ञान हें आर्यलोकांचें नित्य आदरणीय ध्येय होअून बसलें आहे. अशा महापुरुषाची माता म्हणून आपण गंगेला ओळखतों.

## २

नदीला जर कोणती अुपमा शोभत असेल तर ती मातेचीच. नदीच्या कांठीं राहिल्यावर दुष्काळाची भीतीच अुरत नाहीं. मेघराजा जेव्हां दगा देतो तेव्हां नदीमाताच आपलें पीक पिकवते. नदीचा कांठ म्हणजे शुद्ध व शीतल हवा. नदीच्या कांठाकांठानें फिरावयास गेलें असतां निसर्गाच्या मातृवात्सल्याच्या अखंड प्रवाहाचें दर्शन होतें. नदी मोठी असली व तिचा प्रवाह धीरगंभीर असला म्हणजे कांठावर राहणाऱ्या लोकांची भरभराट त्या नदीमुळेंच झालेली असते. खरोखर नदी ही समाजाची माता आहे. नदीकांठच्या शहरांतील आळीआळींतून आपण फिरत असावें, अशा वेळीं अेखाद्या कोपऱ्यांतून जेव्हां नदीचें दर्शन होतें तेव्हां आपल्याला किती आनंद होतो! शहरांतील घाणेरडें वातावरण कोणीकडे आणि नदीचें प्रसन्न दर्शन कोणीकडे? अेकदम फरक दिसून येतो. नदी अीश्वर नव्हे, पण अीश्वराचें स्मरण करून देणारी देवता आहे. जर गुरूला वंदन करणें योग्य, तर नदीलाहि वंदन करणें तितकेंच योग्य आहे.

ही झाली सामान्य नदीची गोष्ट. पण गंगामाअी तर आर्यजातीची माता आहे. आर्यांचीं मोठमोठीं साम्राज्यें या नदीच्या तीरावरच स्थापलीं गेलीं. कुरु-पांचाल देशांचा अंग-वंगादि देशांशीं असलेला संबंध गंगेनेंच

हिंदीचा वाक्प्रवाह जेथें तेथें अेकूं येत आहे. कृष्णानदीला जशा वेण्या, वारणा, कोयना, भीमा, तुंगभद्रा येअून मिळतात, तसे खेड्यांतील लोक टोळ्याटोळ्यांनीं आल्यानें बेझवाडा भरून अुतूं जात आहे ! अशा प्रसंगीं रोज कृष्णेंत स्नान करण्याचा अलभ्य लाभ मिळत असे. ज्या कृष्णेनें जन्मकाळचें दूध दिलें त्याच कृष्णेनें स्वराज्याकांक्षी भारतराष्ट्राचें गौरवशाली दर्शन करविलें. जय कृष्णे ! तुझा विजय असो, भारतवर्ष अेक होवो, स्वतंत्र होवो !

३

# शेतकरी नदी

घटप्रभा व मलप्रभा या आमच्याकडील कर्नाटकांतील नद्या स्वाभाविकपणेंच शेतकरी आहेत. जेथें जातात तेथें शेती करतात, जमिनीला खत देतात, पाणी पुरवतात, अुद्योगी लोकांना समृद्ध करतात. त्यांतच आणखी गोकाकजवळ अेक मोठा बांध घालून मनुष्यानें या नदीची शक्ति वाढविली आहे. जेथें नदीचें पाणी पोंचत नव्हतें तेथें या बांधामुळें तें पोंचलें आहे. घटप्रभेच्या नांवाबरोबर गोकाकच्या लांबच लांब धरणाची आठवण झाल्याशिवाय राहत नाहीं. मोठमोठ्या नद्या जिकडून तिकडून गाळ खेंचून घेअून जातात. अुलट, अशा लहान नद्या मिळेल तेथून थोडा थोडा चांगला कसदार गाळ आपल्या पाण्याबरोबर शेतकऱ्यांना फुकट देअून आपल्या मुलांचें पालन करतात. खरोखरीच घटप्रभा जातीनें शेतकरी आहे.

स. ... ग्रं. प्र. १२८
स्थळ प्रत

४

# गंगामाअी

१

गंगेनें कांहींच केलें नसतें आणि अेकट्या देवव्रत भीष्माला जन्म दिला असता तरीसुद्धां आर्यजातीची माता म्हणून आज ती प्रख्यात झाली असती. पितामह भीष्मांची प्रतिज्ञा, भीष्मांची निःस्पृहता, भीष्मांचें ब्रह्मचर्य आणि भीष्मांचें तत्त्वज्ञान हें आर्यलोकांचें नित्य आदरणीय ध्येय होअून बसलें आहे. अशा महापुरुषाची माता म्हणून आपण गंगेला ओळखतों.

२

नदीला जर कोणती अुपमा शोभत असेल तर ती मातेचीच. नदीच्या कांठीं राहिल्यावर दुष्काळाची भीतीच अुरत नाहीं. मेघराजा जेव्हां दगा देतो तेव्हां नदीमाताच आपलें पीक पिकवते. नदीचा कांठ म्हणजे शुद्ध व शीतल हवा. नदीच्या कांठाकांठानें फिरावयास गेलें असतां निसर्गाच्या मातृवात्सल्याच्या अखंड प्रवाहाचें दर्शन होतें. नदी मोठी असली व तिचा प्रवाह धीरगंभीर असला म्हणजे कांठावर राहणाऱ्या लोकांची भरभराट त्या नदीमुळेंच झालेली असते. खरोखर नदी ही समाजाची माता आहे. नदीकांठच्या शहरांतील आळीआळींतून आपण फिरत असावें, अशा वेळीं अेखाद्या कोपऱ्यांतून जेव्हां नदीचें दर्शन होतें तेव्हां आपल्याला किती आनंद होतो! शहरांतील घाणेरडें वातावरण कोणीकडे आणि नदीचें प्रसन्न दर्शन कोणीकडे? अेकदम फरक दिसून येतो. नदी अीश्वर नव्हे, पण अीश्वराचें स्मरण करून देणारी देवता आहे. जर गुरूला वंदन करणें योग्य, तर नदीलाहि वंदन करणें तितकेंच योग्य आहे.

ही झाली सामान्य नदीची गोष्ट. पण गंगामाअी तर आर्यजातीची माता आहे. आर्यांचीं मोठमोठीं साम्राज्यें या नदीच्या तीरावरच स्थापलीं गेलीं. कुरु-पांचाल देशांचा अंग-वंगादि देशांशीं असलेला संबंध गंगेनेंच

घडवून आणला आहे. आजहि हिन्दुस्थानची लोकवस्ती गंगाकांठींच भरगच्च आहे.

जेव्हां आपण गंगेचें दर्शन घेतों तेव्हां पिकांनीं भरलेलीं शेतेंच आपलें लक्ष वेधतात अथवा मालानें लादलेल्या नौकाच आपल्या दृष्टीसमोर येतात असें नाहीं; तर व्यास-वाल्मीकींचीं कवनें, बुद्ध-महावीरांचे विहार, अशोक, चन्द्रगुप्त किंवा हर्ष यांसारख्या सम्राटांचे पराक्रम आणि तुलसीदास किंवा कबीर यांसारख्या संतजनांचीं भजनें या सर्वांचेंच स्मरण होतें. गंगेचें दर्शन म्हणजे शैत्यपावनत्वाचेंच प्रत्यक्ष दर्शन !

परंतु गंगेचें स्वरूप अेकाच प्रकारचें नाहीं. गंगोत्रीजवळच्या हिमाच्छादित प्रदेशांतील तिचें खेळकर कन्यास्वरूप, अुत्तर काशीकडील चीड-देवदार वृक्षांच्या काव्यमय प्रदेशांतील मुग्धास्वरूप, देवप्रयागच्या पहाडी व अरुंद प्रदेशांत चमकण्याच्या अलकनन्देबरोबर चाललेली तिची क्रीडा, लक्ष्मणझुल्याच्या कराल दंष्ट्रेंतून सुटल्यावर हरद्वारजवळ तिचा अनेक धारांनीं स्वच्छंद विहार, कानपूरला घासून जाणारा तिचा अितिहासप्रसिद्ध प्रवाह, प्रयागच्या विशाळ पटावर तिचा कालिंदीसमवेत होणारा त्रिवेणीसंगम; यांपैकीं प्रत्येकाची शोभा कांहीं वेगळी-वेगळीच आहे. अेक दृश्य पाहून दुसऱ्याची कल्पना येणें शक्य नाहीं. प्रत्येक दृश्याचें सौंदर्य वेगळें, प्रत्येकाचा भाव वेगळा, प्रत्येकाचें वातावरण वेगळें, आणि प्रत्येकाचें माहात्म्य वेगळें.

प्रयागच्या पुढें गंगा वेगळेंच स्वरूप धारण करते. गंगोत्रीहून प्रयागापर्यंत गंगेचा प्रवाह वर्धमान असला तरी त्याला अेकस्वरूपी म्हणतां येअील. पण प्रयागाजवळ तिला यमुना मिळते. पहिल्यापासूनच यमुना दुहेरी हाडाची. ती खेळते, नाचते, पण खेळकर दिसत नाहीं. गंगा शकुंतलेसारखी तपस्वी कन्या वाटते, तर काळी यमुना द्रौपदीप्रमाणें मानिनी राजकन्या दिसते. शर्मिष्ठा व देवयानी यांची गोष्ट आपण अेकतों तेव्हांसुद्धां प्रयागाजवळील गंगा व यमुना यांचे मोठ्या कष्टानें अेकमेकींत मिसळणारे शुक्ल-कृष्ण प्रवाह आठवतात. हिंदुस्थानांत असंख्य नद्या आहेत; आणि अर्थात् संगमांनाहि तोटा नाहीं. आपल्या पूर्वजांनीं या सर्व संगमांत गंगायमुनांचा हा संयोग सर्वांत अधिक श्रेष्ठ मानला आहे; आणि

म्हणूनच त्याला प्रयागराज हें गौरवपूर्ण नांव देण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांत मुसलमान आल्यावर ज्याप्रमाणें आपल्या अितिहासाचें रूप पालटलें, त्याचप्रमाणें दिल्ली-आग्रा व मथुरा-वृन्दावन यांच्या जवळून येणाऱ्या यमुनेच्या प्रवाहामुळें गंगेचें स्वरूपहि अगदीं बदलून गेलें आहे.

प्रयागानंतर गंगा कुलवधूप्रमाणें गंभीर व सौभाग्यवती दिसूं लागते. येथून पुढें तिला मोठमोठ्या नद्या मिळत जातात. यमुनेचें पाणी वृन्दावनाहून श्रीकृष्णाच्या आठवणी घेअून येतें, तर अयोध्येहून येणारी शरयू आदर्श राजा रामचंद्राच्या प्रतापी पण करुण जीवनाच्या आठवणी आणते. दक्षिणेकडून येणारी चंबल* नदी रंतिदेवाच्या यज्ञयागाच्या गोष्टी सांगते, तर महान् कोलाहल करणारा शोणभद्र गज-ग्राहाच्या दारुण युद्धाचें स्मरण देतो. याप्रमाणें पुष्ट होत गेलेली गंगा पाटलीपुत्राजवळ मगध साम्राज्यासारखी विस्तीर्ण होते. तरीसुद्धां गंडकी आपली अमूल्य खंडणी घेअून येण्यास मागेंपुढें पाहत नाहींच. जनक आणि अशोक, बुद्ध आणि महावीर यांच्या प्राचीन भूमींतून पुढें जात असतां गंगा जणूं ‘ कोठें जावें ? ’ अशा विचारांत पडल्यासारखी दिसते. एवढा प्रचंड वारिराशि आपल्या अमोघ वेगानें पूर्वेकडे धावत असतां त्याला दक्षिणेकडे वळविणें ही काय सोपी गोष्ट आहे ? तरीसुद्धां तो तसा वळला खरा. दोन सम्राट किंवा दोन जगद्गुरु ज्याप्रमाणें अेकाअेकीं अेकमेकांस भेटत नाहींत, तसाच कांहींसा प्रकार गंगा व ब्रह्मपुत्रा यांच्यासंबंधीं झालेला दिसतो. ब्रह्मपुत्रा हिमालयाच्या पलीकडील सारें पाणी घेअून आसामांतून पश्चिमेकडे येते आणि गंगा या बाजूनें पूर्वेकडे जाते. त्यांची समोरासमोर भेट कशी व्हावी ? कोण कोणाला प्रथम नमणार किंवा वाट देणार ? शेवटीं अुभयतांनीं ठरविलें कीं, प्रत्येकीनें दाक्षिण्य सेवून सरित्पतीच्या दर्शनास जावें आणि भक्तिनम्र होअून जातां जातां जमेल त्या ठिकाणीं रस्त्यांत अेकमेकींची भेट घ्यावी.

याप्रमाणें गोआलंदोजवळ जेव्हां गंगा व ब्रह्मपुत्रा यांचीं विशाल पात्रें अेक होतात तेव्हां समुद्र याहून वेगळा असूं शकेल काय अशी शंका येअूं लागते. विजय संपादन केल्यावर कसलेली सेनासुद्धां ज्याप्रमाणें अस्ताव्यस्त होते, आणि विजयी वीर वाटेल तसे जिकडेतिकडे फिरूं

* पुढें ‘ चंबल ’ हें ९ वें प्रकरण पाहा.

लागतात, त्याचप्रमाणें या महान् नद्यांची स्थिति होते. अनेक मुखांनीं त्या सागरास जाऊन मिळतात. प्रत्येक प्रवाहाचें नांव वेगळें. आणि कित्येक प्रवाहांना तर ऐकापेक्षां अधिक नांवें आहेत. गंगा व ब्रह्मपुत्रा ऐक होऊन ‘पद्मा’ हें नांव धारण करतात; आणि पुढें गेल्यावर तीच नदी ‘मेघना’ या नांवानें ओळखली जाते!

ही अनेकमुखी गंगा जाते कोठें? सुंदरबनांतील* वेताचीं बेटें पोसायला कीं सगरपुत्रांच्या अतृप्त वासना शांत करून त्यांचा उद्धार करायला?

आज जाऊन पाहाल तर जुन्या काव्यांतील कांहींसुद्धां येथें राहिलेलें नाहीं. जिकडे पाहावें तिकडे तागाचीं पोतीं बनविणाऱ्या गिरण्या आणि असेच दुसरे ओंगळ कारखाने! ज्या प्रवाहांतून पूर्वी हिंदी कलाकौशल्याच्या असंख्य वस्तु हिंदी नौकांतून लंका किंवा यवद्वीपापर्यंत जात, त्याच प्रवाहांतून आज विलायती व जपानी आगबोटी परदेशी कारखान्यांत तयार झालेला तकलादी माल हिंदुस्थानांतील बाजारांत भरण्याकरितां घेऊन येत असतांना दिसतात.

गंगामाई पूर्वीप्रमाणेंच आपणांस नानाप्रकारची समृद्धि अर्पण करीत आहे. पण आपले दुबळे हात ती समृद्धि झेलूं शकत नाहींत. गंगामाई! हें असलें दृश्य पाहायचें तुझ्या दैवांत अजून कोठवर आहे?

---

* भगीरथानें गंगा आणून ज्या ठिकाणीं आपल्या पूर्वजांच्या अस्थींचें सिंचन केलें व त्यांना गति दिली त्या सागरबेटांना सांप्रत ‘सुंदरवन’ असें म्हणतात. गंगेच्या मुखाजवळ असलेल्या या प्रदेशांत उत्तम वेत तयार होतो.

५

# संगम

नद्या तर आपण पुष्कळ पाहतों, पण दोन नद्यांचा संगम मात्र फारसा पाहावयाला मिळत नाहीं. संगमाचें काव्यच वेगळें !

दोन नद्या भेटल्या म्हणजे त्यांपैकीं अेक स्वतःचें नांव सोडून दुसरींत मिसळून जाते. सगळ्या देशांतून हा नियम पाळण्यांत आलेला दिसून येतो ! परंतु ज्याप्रमाणें कलंकाशिवाय चंद्राला शोभा नाहीं, त्याप्रमाणें अपवादाशिवाय नियम असणें जणूं शक्य नाहीं; आणि कित्येक वेळां नियमापेक्षां अपवादच अधिक लक्ष वेधून घेतो. अुत्तर अमेरिकेंतील मिसोरी–मिसिसिपि आपलें लांबलचक नांव द्वंद्व–समासानें धारण करून जगांतील सर्वांत लांब नदी म्हणून प्रसिद्धि पावली आहे. सीताहरणाच्या प्रसंगापासून विजयनगरच्या स्वातंत्र्यहरणापर्यंतचा अितिहास जिला आठवतो ती तुंगभद्रासुद्धां तुंगा व भद्रा यांच्या मीलनावरून आपलें नांव व महत्ता संपादन करूं शकली. पुण्याला आपल्या कडेवर खेळविणारी मुळामुठाहि मुळा आणि मुठा या दोन नद्यांच्या संगमापासून बनलेली आहे.

सिंहगडाच्या पश्चिम बाजूकडील दरींतून मुठा येते. खडकवासल्यापर्यंत संन्याशाच्या डोक्याप्रमाणें मुंडन केलेल्या टेकड्या तिचें रक्षण करतात. खडकवासल्याच्या बांधानें तन्वंगी मुठेचें सुदीर्घ सरोवर बनविलें आहे. या सरोवराच्या कांठीं झाडेंहि नाहींत व देवळेंहि नाहींत. दिवसा ढग व रात्रीं तारे आपली चिंताजनक प्रतिबिंबें या सरोवरांत पाहतात. येथेंच मुठेजवळून पाटांच्या रूपानें दोन प्रचंड कर वसूल करण्यांत येतात, आणि पुणें व खडकी येथील लोक त्यांचें भरपूर पाणी पितात. मुठेच्या तीरावर अुसाचें पीक होतें. वसंतऋतूंत जिकडे पाहावें तिकडे अुसाचे चरक ‘क र्‌ र्‌ र्‌’ आवाजाची बांग* देअून लोकांना रसपानाची आठवण देत असतात.

---

*** बांग :** मुसलमानांत प्रार्थनेची वेळ झाल्याची लोकांना आठवण देण्यासाठीं मिनाऱ्यावरून जो मंत्र मोठ्यानें बोलला जातो त्याला ‘बांग’ असें म्हणतात.

'लकडी पूल' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या, पण दगडांनीं बांधलेल्या पुलाखालून नदी पुढें वाहते आणि 'दगडी पूल' या नांवानें असलेल्या, पण पूल नसून भक्कम बांध असलेल्या दगडी अंतरायाला ओलांडून पुढें जाते, त्यानंतरच तिचा मुळाताअीशीं संगम होतो. ओंकारेश्वरापासून दगडी पुलापर्यंत वाटेल तितकीं मढीं जळत असलीं तरी संगमप्रसंगीं त्या संबंधीं मुठेच्या तोंडावर कांहीं विषाद दिसत नाहीं.

अेवढा शांत संगम दुसरीकडे कोठें क्वचितच दिसेल. याच संगमावर कॅप्टन मॅलेट पेशवाअीच्या अंतकाळची वाट पाहत छावणी टाकून पडून होता. आज मात्र संस्कृत भाषेचें संशोधन युरोपीय पंडितांच्या हातून परत हिसकावून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या आर्य पंडित भांडारकरांचा 'संगमाश्रम'च येथें शोभत आहे. संस्कृत विद्येच्या पुनरुद्धारासाठीं स्थापिलेल्या पाटशालेचें रूपांतर करून जुन्या-नव्याचा संगम करणाऱ्या डेक्कन कॉलेजची अिमारतहि या संगमापासून फार दूर नाहीं. येथें गोऱ्यांच्या नौकाविहारासाठीं नदीला बांध घालून पाणी अडविण्यांत आलें आहे; आणि डासांच्या विशाल कुळासहि येथें आश्रय देण्यांत आला आहे.

जवळच्या टेकडीवर गुजरातच्या अेका लक्ष्मीपुत्राची गगनचुंबी, पण नम्रनामधेय 'पर्णकुटि' बांधलेली आहे. माणसांचें स्वातंत्र्य हरण करणारें येरवड्याचें कारागृह आणि प्राणघातक लष्करी दारूखानासुद्धां संगमापासून फार दूर नाहीं. कुणास ठाअूक किती विचित्र वस्तूंचा संगम मुळामुठेच्या कांठावर होत असेल किंवा व्हावयाचा असेल! बांधाजवळ वसलेल्या 'बंडगार्डन'च्या अुपवनांत लक्षाधीश व भिक्षाधीश लोकांचा संगम होतो हें सुद्धां याचेंच अेक अुदाहरण आहे.

"सुटल्यें अेकदांची!" म्हणून "हुश्श" करीत बांधावरून सुटून जाणारी मुळामुठा पुढें कोठें जाते याची माहिती कोणाला?

६

# वेदांची धात्री

नदीच्या प्रवाहांत हे हत्तीअेवढे खडक येअून पडले आहेत कीं हत्तीअेवढ्या खडकांतून नदीनें आपला मार्ग शोधून काढला आहे हें कोण सांगू शकेल? दक्षिणेंत वैदिक संस्कृतीचा विजय सुचविणारें विजयनगरचें साम्राज्य या नदीच्या कांठींच घडलें गेलें आणि या नदीच्या कांठींच कच्च्या मडक्याप्रमाणें तें फुटलें! विजयनगरच्या साम्राज्याचा डंका त्रिखंडांत वाजत होता. चीनचा सम्राट्, बगदादचा बादशाह आणि विजयनगरचा महाराजाधिराज ह्या तिघांचें वैभव सर्वांत मोठें मानलें जात असे. त्या समयीं तुंगभद्रा काय अशीच दिसत असेल? आणि अशी नसेल तर कशी असेल? नदी ही काय मानवी कृति आहे कीं तिच्या वैभवांत अुत्कर्ष व अपकर्ष असावेत?

ज्याप्रमाणें मुळा व मुठा मिळून मुळामुठा नदी बनली आहे, त्याचप्रमाणें तुंगा आणि भद्रा या दोहींच्या संगमानें तुंगभद्रा बनली आहे. "द्वंद्वः सामासिकस्य च" या न्यायानें या दोन नद्यांत अुच्चनीचभाव थोडासुद्धां नाहीं. दोन्हीं नांवें सारख्याच रीतीनें मिळून वाहत आहेत. या नदीच्या पाण्याची माधुरी व फलद्रूपता ही प्राचीन काळापासून वाखाणलीं गेलीं आहेत. गंगेचें स्नान आणि तुंगेचें पान माणसाला मोक्षमार्गाला नेतें, हें विधान सर्व नदीभक्तांनीं मान्य केलें आहे. मोटरींतला प्रवास नसता तर तुंगभद्रेला अनेक स्थळीं अनेक प्रकारें आम्हीं पाहिलें असतें. तीर्थहळ्ळीजवळ जी नदी पाहिली ती तुंगा होती कीं भद्रा होती तेंहि आज सांगतां येणार नाहीं. तुंगभद्रा ही अेका मोठ्या संस्कृतीची प्रतिनिधि आहे. आज सुद्धां वेदपाठी लोकांत तुंगभद्रेच्या कांठीं वसणाऱ्या ब्राह्मणांचे अुचार आदर्शभूत व प्रमाणभूत समजले जातात. वेदांचें अध्ययन सिंधु आणि गंगा यांच्या किनाऱ्यांवर खुशाल झालेलें असो, त्यांचें रक्षण मात्र तुंगभद्रेच्या कांठींच झालें आहे.

७

# अंबा-अंबिका

भीष्म पितामहांनीं अंबा-अंबिका या दोन राजकन्या जिंकून विचित्र-वीर्याकडे आणल्या. पण त्या मुलींनीं स्पष्टच सांगितलें कीं, " आमचें मन दुसऱ्यावर बसलें आहे." आतां विचित्रवीर्यानें त्यांच्याशीं विवाह कसा करावा? आणि ज्या राजावर त्यांचें मन बसलें होतें तो तरी जिंकल्या गेलेल्या कन्यांचा स्वीकार कसा करील? बिचाऱ्या मुली कोणत्याहि पतीची प्राप्ति न होतां झुरून झुरून मरून गेल्या!

उन्हाळ्याच्या दिवसांत आबूच्या पहाडावरून सरस्वती व बनास या दोन नद्यांचें मीं एकदां दर्शन घेतलें होतें. या बिचाऱ्या नद्यांना समुद्रापर्यंत कांहीं जातां आलें नाहीं. मध्यंतरीं कच्छच्या रणांतच त्या लुप्त होतात. कौमार्य, सौभाग्य व वैधव्य यांपैकीं एकहि स्थिति त्यांच्या वांट्याला आलेली नाहीं. गुजरात व राजपुताना यांच्या इतिहासांत या नद्यांना केवढेंहि महत्त्व असलें तरी करणाच्या* दोन आंसवांशिवाय आपल्याला त्यांना काय देतां येणार?

८

# शोणभद्र

अयं शोणः शुभजलोऽगाधः पुलिनमण्डितः ।
कतरेण पथा ब्रह्मन्! संतरिष्यामहे वयम् ॥
अेवमुक्तस्तु रामेण विश्वामित्रोऽब्रवीदिदम् ।
अेष पन्था मयोद्दिष्टो येन यान्ति महर्षयः ॥

आसेतुहिमाचल भारतवर्षाच्या अुद्धाराचा अेकमात्र विचार करणाऱ्या या क्षत्रिय गुरुशिष्यांची जोडी जेव्हां शोणभद्र ओलांडूं लागली तेव्हां त्यांच्या

* करण वाघेला हा गुजरातेंतील एक पदच्युत राजा एका काळीं या नदीच्या कांठीं अज्ञातवासांत दिवस कंठीत होता.

मनांत कोणते विचार आले असतील ? निसर्गाचा कवि वाल्मीकि यानें विश्वामित्र व राम या दोघांचेंहि निसर्गप्रेम मुक्तकंठानें वर्णिलें आहे. तिघेहि जनगणहितकारी मूर्ति; त्यांच्या भावनेचा प्रवाहहि शोणभद्राप्रमाणें वाहत असावा.

अमरकंटकाच्या आसमंतांतील अुन्नत भूमि भारतवर्षाच्या जवळजवळ मध्यभागीं आहे. तेथून तीन दिशांना तिनें आपल्या करुणेची दुग्धधारा सोडली आहे. भौगोलिक रचनेंत ज्यांच्यामध्यें पुष्कळ साम्य आहे, पण दुसऱ्या प्रकारें संपूर्ण वैषम्य आहे, अशा दोन भागांना या भूमीनें दोन नद्या अर्पण केल्या आहेत. नर्मदा गुजरातच्या वांट्यास आली आणि महानदी अुत्कलदेशाला लाभली.

अमरकंटकाचा तिसरा प्रवाह म्हणजे पीवरकाय शोणभद्र. नर्मदा सुदीर्घा आहे, महानदी अष्टावक्रा आहे, तर शोणभद्र सुघोष आहे. जवळ-जवळ पांचशें मैलांचा पराक्रम पुरा करून तो पाटण्याजवळ गंगेला मिळतो. शोणावरून शोणपूर हें स्थान प्रसिद्ध झालें आहे. असें म्हणतात कीं, गजेन्द्र-नक्रांची लढाई झाली ती गंगाशोणांच्या संगमाजवळील डोहांतच. जणूं काय याच प्रसंगाचें स्मारक करण्यासाठीं अद्यापि शोणपुरांत लाखों लोकांची यात्रा भरते आणि या यात्रेंत शेंकडों हत्ती विकले जातात.

सिंधु आणि ब्रह्मपुत्रा यांच्याप्रमाणें शोणभद्रालाहि पुल्लिंगी नांव देऊन प्राचीन ऋषींनीं त्याची योग्य बूज केली आहे. बनारसहून गयेला जात असतां या महाकाय व महानाद नदाचें दर्शन झालें होतें. गाडी मोठ्या पुलावरून जाऊं लागली आणि शोणभद्राचें कांहीं केल्या न संपणारें पात्र दिसूं लागलें. अरुंद दरींतून आपला विकास थांबल्यामुळें अुत्पन्न झालेल्या अधीरतेनें धावत असतां अेकदम विशाल क्षेत्र मिळाल्यामुळें "आतां कोठें जाऊं ? कोठें नको ?" असें वाटत असलेलें या नदाच्या मुखावर स्पष्ट दिसत होतें. "नाल्पे सुखमस्ति; यो वै भूमा तत्सुखम्" असें मानणारे महर्षि शोणाच्या कांठीं आसरा शोधीत फिरत असतां त्यांच्या मनांत काय काय विचार आले असतील ? ते अेक विश्वामित्रांना ठाऊक; अथवा भगवान् श्रीरामचंद्रांना ठाऊक !

९

# चंबल

ज्या ज्या नद्यांचें मीं स्नानपान केलें आहे त्यांचेंच अुपस्थान येथें करण्याचा संकल्प आहे. तरी सुद्धां त्यांत अेक अपवाद केल्याशिवाय राहवत नाहीं. मध्यदेशांतील चंबल नदीचें दर्शन घेतल्याचें आठवत नाहीं; पण पौराणिक कालांतील चर्मण्वती या नांवाबरोबर ती माझ्या स्मरणांत नित्य राहिली आहे. नद्यांचीं नांवें त्यांच्या कांठावरील पशु, पक्षी अथवा वनस्पति अित्यादींवरून पडल्याचीं उदाहरणें आहेत. दृषद्वती, सारसवती, गोमती, कुशावती, शरावती, वाघमती, हत्तीमती, साबरमती, अिरावती प्रभृति नांवें त्या त्या नदीकांठच्या प्रजेचें सूचन करतात. नदीच्या नांवांतच तिची संस्कृति व्यक्त होते. मग चर्मण्वती हें नांव काय सुचवितें ? हें नांव अैकल्याबरोबरच प्रत्येक गोसेवकाच्या अंगावर कांटा अुभा राहिल्याशिवाय राहणार नाहीं.

प्राचीन राजा रंतिदेव अमर कीर्ति प्राप्त करून गेला. महाभारता-सारख्या विराट् ग्रंथाला रंतिदेवाची कीर्ति गातांना शीण वाटत नाहीं. या राजानें या नदीच्या तीरावर पुष्कळ यज्ञ केले. त्यांत जे पशु मारले जात त्यांच्या रक्तानें नदीचें पाणी सदा लाल दिसत असे. या पशूंचीं कातडीं सुकविण्यासाठीं या नदीच्या कांठावर अितकीं कांहीं पसरून टाकलेलीं असत कीं, त्या नदीचें नांवच चर्मण्वती पडलें. महाभारतांत अेक प्रसंग मोठ्या अुत्साहानें वर्णिला आहे. रंतिदेवाच्या यज्ञाला अितके ब्राह्मण लोटत कीं, कधीं कधीं आचाऱ्यांना या भूदेवांस विनंती करणें भाग पडत असें कीं, "भगवन्, आज मांस कमी शिजविलें आहे, आज केवळ पंचवीस सहस्र पशूच मारले आहेत, भाज्याकोशिंबिरीच अधिक घेऊन आज भागवा." ! !

त्यावेळचा हिंदुधर्म व आजचा हिंदुधर्म यांत केवढें अंतर पडलें आहे ! ग्रीक लोकांच्या 'हॅकेटॉम'ला* मागें सारतील असे मोठेमोठे यज्ञ करून स्वर्गांतील देवांना, त्याचप्रमाणें भूदेवांना तृप्त करणें हें त्या वेळच्या

* हेकॅटोम : होमरकालीन ग्रीक लोकांचा गोयज्ञ.

धर्माचें मुख्य लक्षण होतें. नंतरच्या धार्मिक लोकांनीं शंका काढली कीं, झाडें तोडून, पशूंना मारून आणि रक्ताचा चिखल करून जर मनुष्याला स्वर्गांत जातां येत असेल तर नरकाला जाण्याचा मार्ग कोणता ? या चर्मण्वती नदीच्या तीरावर भिन्न भिन्न काळीं कितीतरी युद्धें झालीं असतील, माणसांनीं माणसांचें रक्त वाहावयाला लावलें असेल, पण चंबलचें नांव घेतांच राजा रंतिदेवाच्या काळाचें स्मरण होतें. आपल्यालाच जर अितका अुद्वेग वाटतो तर लोकमाता चर्मण्वतीला त्या वेळीं काय झालें असेल ?

## १०

# स्वर्धुनी वितस्ता

"पृथ्वीवर जर कोठें स्वर्ग असेल तर तो येथेंच आहे, येथेंच आहे, येथेंच आहे," असें सम्राट् जहांगिरानें झेलम नदीचा अुगम पाहून म्हटलें. त्याचे हे अुद्गार येथील अष्टकोनी तलावाच्या अेका बाजूस कोरून ठेवले आहेत. खरोखर हें स्थळ भूस्वर्ग या पदवीस शोभेल असेंच आहे. नसानसांतून व रोमरोमांतून चेतना अुत्पन्न करणारा शीतल मधुर वारा जेथें वाहतो, जेथें वनश्री आपल्या यौवनाचा पुरेपूर अुन्माद प्रकट करते, जेथें पर्वत आपल्या सौंदर्यानें हा खरोखरच पर्वत आहे कीं रंगभूमीवरील पडदा आहे अशी शंका मनांत अुत्पन्न करतो, आणि जेथील शांति चैतन्यानें गजबजलेली असते, अशा ठिकाणीं झेलम नदीचा अुगम झाला आहे. तिचें वेदकालीन नांव 'वितस्ता'. जहांगीर बादशाहानें या अुगमाच्या स्थळीं अेक सुंदर अष्टकोनी तलाव बांधला आहे. आंतील पाणी — पाणी म्हणजे जणूं नीलमण्यांचा रस ! — पाहिल्याबरोबर वाटतें कीं येथें कोणीं निळीनें रंगविलेले कपडे धुतले असावेत. अितकें स्वच्छ, गोड पाणी दुसरीकडे कोठें मिळणार ?

या तळ्याच्या अेका बाजूकडून जो सुंदर सरळ पाट काढलेला आहे, तीच आपली वितस्ता. या स्वर्गांतील आनंद लुटण्यासाठीं जणूं काय गंधर्वच माशांचें रूप धारण करून या तळ्यांत व पाटांत स्नान करण्यास अुतरले असावेत, अितकी अवर्णनीय शोभा या दोहोंची दिसून येते ! या भागांत

मासे पकडण्यास कडक प्रतिबंध नसता तर या शोभेची काय अवस्था झाली असती ? येथील मासे अितके भोळे आहेत कीं, मीं अेक मोठें पातेलें पाटांत बुडविलें तों त्यांत पांचसात आले. या स्थानाला 'वेरीनाग' म्हणतात. पुढें गेल्यावर 'खनबल' नांवाचें अेक ठिकाण येतें. तेथें झेलम नदी होड्या चालविण्याअितकी मोठी होते. 'खनबल'जवळच अनंतनाग नांवाचा अेक सुंदर तलाव आहे. येथून सर्वत्र सपाट भूमि आहे. काश्मीरची सारी दरी अशीच चहूं बाजूला सपाट आहे.

झेलमला सरळ वाहणें सुचतच नाहीं. वळणें घेत घेत मंद गतीनें ती पुढें जाते. हिच्या कांठीं अेक मोठी वैभवशाली संस्कृति* विस्तार पावून अस्तंगत झाली. वितस्ता मात्र अद्याप तशीच वाहते.

खनबलाहून पुढें गेल्यावर बीजब्यारा नांवाचें अेक स्थान लागतें. तेथें आम्हीं अेक चिनारचें झाड पाहिलें. नअू जणांनीं हात पसरून वेंगांत त्याच्या खोडाचें माप घेतलें. बरोबर चौपन फुटांचा त्याचा घेर भरला !

बीजब्याऱ्याच्या देवळाविषयीं अेक गमतीची दंतकथा आम्हीं तेथें अेकली. ती अिंग्रज लेखकांनीं सुद्धां अुतरून घेतली आहे.

जेव्हां धर्मांध मुसलमान हें देअूळ फोडण्यास आले तेव्हां येथल्या पुजाऱ्यांनीं त्यांना मुळींच विरोध केला नाहीं, किंवा द्रव्य देअून त्याचा बचाव करण्याचीहि गोष्ट काढली नाहीं. त्यांनीं सांगितलें: "या, या, हें देअूळ फोडून टाका. आमच्या शास्त्रांत लिहिलेंच आहे कीं, यवन येतील आणि मूर्तीचा नाश करून देअूळ अुध्वस्त करतील. आमच्या शास्त्रांत लिहिलेलें अन्यथा होणार नाहीं." बुतशिकन गाझीला वाटलें, "जर आपण देअूळ फोडलें तर या काफरांचीं शास्त्रें खरीं असल्याचा पुरावा मिळेल, त्यापेक्षां जाअूं द्या कीं, अेक देअूळ सोडून देअूं." ही गोष्ट कितपत खरी आहे हें आपणांस माहीत नाहीं. पण गुजरातेंतील वाण्याच्या गोष्टीप्रमाणेंच ही कथाहि चातुर्याची आहे. आणि हें सुद्धां खरेंच कीं, मुसलमानी राजवटींत बीजब्याऱ्याचें हें देअूळ भंगलें नाहीं.

---

* अनंतपूर येथें अेका प्राचीन राजधानीचे अवशेष अेका टेकडीखालीं दबलेले नुकतेच खोदून काढले आहेत.

येथून थोड्या अंतरावर अनंतपूर नांवाचें अेक प्राचीन शहर जमिनी-खालीं दबलें जाअून त्याची टेकडी बनली आहे. शेतांत खोदीत असतां जुनें सुंदर बांधकाम, कितीतरी प्राचीन रांजण आणि त्यांतील कोळसे झालेले तांदूळ येथें सांपडलेले मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिले आहेत.

नदी अितस्ततः भटकत अितकी सावकाश वाहते कीं, पाण्याचा प्रवाह कोठें जाणवतच नाहीं. नदीच्या प्रवाहाच्या विरुद्ध दिशेस जावयाचें असेल तेव्हां वल्हीं न मारतां होडीला खूप लांब दोरी बांधून दोघेजण कांठावरून ही दोरी ओढीत चालतात. होडी पाण्यांतच चालावी, कांठाला लागूं नये, म्हणून होडींतलाच अेक कोळी वल्ह्याचें सुकाणूं करून तें हातांत तिरकें धरून बसतो.

काश्मिरी शालींच्या कोपऱ्यांत कोयरीच्या आकाराचा जो प्रकार असतो तें येथील कारागिरीचें वैशिष्टय आहे. झेलम नदीचीं वळणें पाहून कारागिरांना ही आकृति सुचली असें सांगण्यांत येतें. अेकदां आम्हीं नदींत अेका बंदरापासून चौदा मैलांचा प्रवास केला. त्या वेळीं मूळ बंदरावर जरा अुशीरां आलेला अेक प्रवासी मधल्या मार्गानें चालून येथें आम्हांला येअून भेटला. त्याला फक्त अडीच मैलच चालावें लागलें. अितकीं वळणें ही नदी घेते!

या वळणांमुळें नदीचा वेग कमी होतो आणि तिचें पात्र झिजत नाहीं. पण जेव्हां पूर येतो तेव्हां "सर्वतः संप्लुतोदके" अशी स्थिति होते. येथील प्राचीन स्थापत्य-विशारद राजांनीं हें संकट टाळण्यासाठीं आणि या नदीला आटोक्यांत ठेवण्यासाठीं अशीं कित्येक वळणें व पाट खोदून ठेवले आहेत. हा अुपाय अितका रामबाण आहे कीं, आजदेखील त्याचेंच अनुकरण करावें लागत आहे. अेका मोठ्या होडींतून रानडुकराच्या सुळ्यासारखा अेक मोठा राक्षसी फाळ नदीचा तळ खोदीत जातो आणि आंतला चिखल विजेच्या पंपानें बाहेर फेकीत असतो. ही सर्व कृति वराहमूलम् (आजचें बारामुल्ला) क्षेत्रांत पाहावयास मिळतें. बारामुल्ला हें काश्मीरच्या दरीचें पलीकडील टोक आहे. येथून पुढें झेलम फारच वेगानें वाहते.

या साऱ्या प्रदेशाच्या मधोमध काश्मीरची राजधानी वसली आहे. श्रीनगर हें नदीच्या दोन्ही कांठांवर पसरलेलें आहे नदीवर अंतराअंतरावर सात पूल बांधले आहेत. त्याशिवाय दोहों बाजूंस शहराच्या अंतर्भागापर्यंत नदींतून कालवे खोदले आहेत. त्यामुळें अनायासें शान्त मार्गांचा लाभ होतो. नदीचा मुख्य प्रवाह हा राजमार्ग आणि बाकीचे कालवे हे राज-मार्गास येऊन मिळणाऱ्या आडवाटा. मार्गावर ज्याप्रमाणें गाड्या धावतात त्याप्रमाणें येथें लांब व अरुंद 'शिकारा' होड्या' तीरासारख्या धावत असतात. होड्यांची किती का धांदल असेना, त्या मुळींच आवाज करीत नाहींत !

दुपारीं जेव्हां महाराजांच्या देवळांतील पूजा संपते आणि आदल्या दिवसाचीं निर्माल्य झालेलीं फुलें नदीच्या पात्रांत फेकून दिलीं जातात तेव्हां हीं फुलें जवळ-जवळ अर्धामैलपर्यंत लांब ओळीनें सावकाश वाहत असतांना दिसतात.

आणि या नदीच्या कांठावर प्रवृत्ति तरी किती चालू असते ! कांहीं ठिकाणीं सतरंज्या विणल्या जातात, तर कांहीं ठिकाणीं अप्रतिम गालिचे. अेका स्थळीं अक्रोडाच्या लाकडावर सुंदर कारागिरीचें काम चालतें, तर दुसऱ्या स्थळीं रेशमाच्या कारखान्यांत कुरूप किड्यांचे कोश पाण्यांत अुकळून त्यांतून सुंदर रेशीम तयार केलें जातें. चीन, तिबेट, त्याप्रमाणेंच समरकंद व बुखारा येथील व्यापारी महिनेच्या महिने येथें तळ देअून पडलेले असतात, आणि हुशार पंजाबी लोक त्यांच्याबरोबर व्यापार करण्यांत गढलेले असतात. जिकडे पाहावें तिकडे हातांपेक्षां लांब बाह्या असलेले डगले घालून लोक फिरत असलेले दिसून येतात.

पुढें गेल्यावर झेलम ही हिंदुस्थानांतील सर्वांत मोठें सरोवर जें वूलर त्याच्यांत जाअून पडते, आणि त्यांत अदृश्य होअून गुप्त रूपानें दूरची मजल मारून दुसऱ्या टोकानें बाहेर पडते आणि बारामुल्ल्याकडे वळते. पुढें या नदीचा अेक कृत्रिम पाट काढून त्यांतून जी विद्युच्छक्ति निर्माण करण्यांत आली आहे ती साऱ्या काश्मीर राज्याला विजेचा पुरवठा करते. अॅबटाबादेजवळ नदी दिशा बदलते आणि पुढें वेगानें धावते. झेलमची सर्वच दरी सौंदर्याविषयीं प्रख्यात आहे. दंतकथा अशी आहे कीं, अकबर

बादशाहानें या नदीच्या सौंदर्यानें मोहित होअून अुंचावरून नदीच्या पात्रांत अुडी टाकिली होती. वाटल्यास तिला कविकल्पना म्हणा, पण ही दरी पाहून असा अुन्माद चढण्याचा संभव मात्र निःसंशय दिसून येतो. अशा दंतकथा अेखाद्या बादशाहाचा मोठेपणा दर्शविण्यापेक्षां या नदीचें सौंदर्य किती मोहक आहे हें दर्शविण्यासाठीं म्हणूनच रचल्या जातात.

जेव्हां हिंदुस्थानाचा खरा अितिहास लिहिला जाअील तेव्हां त्यांत मोठमोठ्या नद्यांपरत्वें वेगवेगळे विभाग पाडले जातील. या अितिहासांत झेलमच्या संस्कृतीचा विभाग लहानसान असणार नाहीं.

खरोखर झेलमला ‘स्वर्धुनी’ हें नांव शोभतें!

## ११

# दूधगंगा

श्रीनगरांत पाण्याची वाण कोठून असणार? सरोवरें तोडूनच तर काश्मीरचा प्रदेश बनला आहे. या अुपत्यकेची लांबीरुंदी मोजण्यासाठींच जणूं काय झेलम नदी नागमोडी वाहते. जिकडे पाहावें तिकडे कमळें, शिंगाडे व नाना प्रकारच्या भाज्या देणारीं ‘दलें’ (म्हणजे सरोवरें) पसरलेलीं आहेत. ज्या वर्षी अतिवृष्टि होत नाहीं तें वर्ष भाग्याचें. अशा प्रदेशांत जेथें अेखादी होडीहि धड मावणार नाहीं अेवढ्या प्रवाहाला कोण विचारतो? तरी देखील असा अेक प्रवाह ‘दूधगंगा’ या नांवानें तिकडे मानास पात्र झाला आहे.

त्यांत पाणी फारसें नसलें तरी तो प्रवाह अखंड वाहत असतो. तो कधीं कमी होत नाहीं कीं वाढत नाहीं. त्याचें पाणी पांढुरकें दिसतें म्हणूनच ‘दूधगंगा’ हें नांव त्याला पडलें असावें. आम्ही ज्या नारायणाश्रमांत राहत होतों, त्याच्याजवळून दूधगंगा वाहत होती. अेक लांब लाकूड टाकून तिच्यावर पूल बनविला होता.

स्नान करण्यास ही नदी फारच अनुकूल आहे. तिच्यांत अुभें राहून आंघोळ करतां येते आणि पोहावयाचें असेल तर थोडें पोहतांहि येतें. बुवा

आजारी होते; तेव्हां भांडीं विसळायला, वस्त्रें धुण्याला आणि अितर अुपयोगाला दूधगंगा ही सदा माझ्या साहाय्यास येत असे. या अनोळखी प्रदेशांत जेव्हां आम्ही दोघेहि आजारी होतों तेव्हा दूधगंगेचें साहाय्य नसतें तर आमची काय दशा झाली असती कोण जाणे !

दूधगंगेविषयीं कृतज्ञता वाटल्यामुळें तिचें माहात्म्य शोधून काढण्याची मला अिच्छा झाली. तेथील सार्वजनिक पुस्तकालयांत जाअून पुष्कळ पुस्तकें धुंडाळलीं. अेवढी लहानशी दूधगंगा, पण ती फार दुरून येते आणि फार दूरवर जाते हें पाहून मला आश्चर्य वाटलें. कोणत्या ऋषीनें दूधगंगेला जन्म दिला, तिच्या कांठावर कोणीं कोणीं तपश्चर्या केली अित्यादि सर्व हकीकत संशोधन करून मीं मिळवली. अितिहासांतील अनंत घटनांप्रमाणें ही माहिती सुद्धां पुढें माझ्या विस्मृतीच्या प्रवाहांत बुडून गेली आणि आतां मूळ कृतज्ञताच तेवढी अवशिष्ट राहिली आहे.

रोज सकाळीं मठांतील साधु नदीवर स्नान करण्यास गोळा होत असत आणि रात्रीं सगळे झोंपी गेल्यावर दूधगंगेच्या कांठावर बसून मी आकाशांतील ध्रुवाचें ध्यान करीत असें, अेवढी मला आठवण आहे. माझें तें ध्यानहि फार दिवस चाललें नाहीं; कारण काश्मिरांत ध्रुव अितक्या अूंचीवर असतो कीं, त्याकडे पाहतांना मान दुखूं लागते. तेथें सप्तर्षींतील वसिष्ठ अरुंधतीसमवेत सरळ डोक्यावर चमकत असे.

काश्मीरतलवाहिनी सतीकन्या* दूधगंगेला नमन असो !

---

* **सतीकन्या :—** चार पर्वतांनीं बनलेल्या अुपत्यकेच्या या ठिकाणीं ( द्रोणांत ) प्राचीनकाळीं अेक सरोवर होतें. त्या सरोवरांत सती पार्वती विहार करीत असे. म्हणून त्याला 'सतीसर' म्हणत. या सतीसरांतील राक्षस सतीला त्रास देअूं लागले. तेव्हां भगवान् विष्णूनें वराहाचें रूप घेअून आपल्या सुळ्याच्या तडाख्यानें पर्वताचा काप काढून सरोवरांतील पाण्याला वाट करून दिली. त्या सतीसराचा अवशेष म्हणून काश्मीरमधील नद्या वाहत असतात. त्यांतील अेक ही दूधगंगा. म्हणून तिला सतीकन्या म्हटलें आहे.

## १२

# रावी

रावी ही वैदिक नदी आहे. पंजाबच्या अितिहासाबरोबरच रावीचा अितिहास सुद्धां युद्धकर्दमानें माखलेला आहे. अितिहासांत रावीचा अुल्लेख अनेक वेळां आला आहे. अकबर बादशाहानें दोन दोन नद्यांचीं आद्याक्षरें घेअून त्यांच्या मध्यभागीं वसलेल्या अंतर्वेदीला अथवा 'दुआब'च्या प्रदेशाला नांवें दिलीं या गोष्टीचेंहि येथें स्मरण होतें. पण माझ्यापुढें मात्र रावीचें नांव घेतल्याबरोबर युवक विद्यार्थी तीर्थरामाची मूर्ति अुभी राहते. स्वामी रामतीर्थांनीं रावी नदीवर मस्तीनें भरलेलीं कितीतरी सुंदर काव्यें भावनावेगांत लिहिलीं आहेत. मी लाहोराला गेलों तेव्हां आषाढाचा महिना होता. अुत्तराखंडाची यात्रा पुरी करून काश्मिराकडे जात असतां वाटेंत लाहोरास अुतरलों होतों. त्या वेळीं रावीच्या विस्तीर्ण वाळवंटांत फिरण्यासाठीं कॉलेजच्या विद्यार्थ्यांबरोबर गेलों होतों. अितर पौरजनांप्रमाणें आम्हींहि कांहीं खाद्यपदार्थ विकत घेअून खाल्ले; पण पुडक्यांचे कागद वाळूंतच फेकून देअून त्या सुंदर पुलिनाची शोभा नासून टाकण्याचें धैर्य मला होअीना. समुद्रकिनाऱ्यावर, त्याचप्रमाणें नदीकांठीं, पुष्कळदां प्रवाहाबरोबर आलेला केर-कचरा पडलेला असतो. परंतु पाण्याच्या लाटांची खुबीच अशी कीं, तो केर आपल्या डोळ्यांत सलत नाहीं. पण जेथें तेथें खाद्यवस्तु घेअून बसणारा मनुष्य मात्र घाणीचा प्रचारक दिसून येतो. गंडेरीचा चोथा, कागदाचे कपटे व अुष्ट्या पत्रावळी जिकडे तिकडे फेकून मनुष्यप्राणी जणूं निसर्गाचा सूड घेतो!

रावी ही लाहोर शहराला आपल्या मांडीवर घेअून खेळवीत आहे असा भास होतो. रावीचें मुख्य काम म्हणजे हिमालयांतील अरण्यांतून चिरून बनविलेल्या फळ्या मनुष्यप्राण्यासाठीं सपाट प्रदेशांत आणून पोहोंचत्या करणें हें आहे. वर पर्वतांत मोठमोठ्या फळ्या पाण्यांत तरंगत सोडल्या कीं चालल्या त्या वाहत! स्वाभाविक जाड्यामुळें (inertia) त्यांचा स्वतःचा कसलाच आग्रह नसतो. जोंपर्यंत अखादें विघ्न येत नाही तोंपर्यंत फळ्या पाण्यांत वाहत राहतील. अेखाद्या ठिकाणीं प्रवाहाला वांकण मिळालें कीं

त्याच्या आधारानें कांठावर पोंचतील, आणि तेथेंच आयुष्याची कृतार्थता मानून राहतील. स्वराज्यापर्यंत पोंचण्याचें त्यांना अगत्य नसतें. पण या फळ्यांचा ज्यांना अुपयोग आहे ते बरे त्यांना तेथेंच थांबू देतील! ते जनावरांच्या कातड्यांपासून बनविलेल्या पखालीच्या ताफ्यावर या फळ्यांची 'शिकार' करण्यास निघतात; आणि जेथें त्या थांबल्या असतील तेथून त्यांना हाकून काढतात. आणि त्या फळ्या आपली ही नवी यात्रा सुद्धां त्याच जुन्या निराग्रह स्वभावधर्माप्रमाणें चालू ठेवतात!

रावीमुळें लाहोरचा व्यापार पुष्कळच वाढला आहे. पण माझ्या मनाला रावी ही स्वामी रामतीर्थांचीच माता वाटते. मग तिनें रणजितसिंगाला आणि गुरु अर्जुनदेवांना देखील आपलें स्तन्य पाजलें असेना कां!

## १३

# पिनाकिनी

नेल्लूर म्हणजे भाताचें गांव (नेल्लु = तांदूळ; अूरु = गांव). दक्षिण हिंदुस्थानच्या अितिहासांत नेल्लूरनें आपलें नांव अजरामर केलें आहे. बेझवाड्याहून मद्रासला जात असतां वाटेंत नेल्लूर लागतें.

भारतसेवकसमाजाचे सभासद कै. हणमंतराव यांनीं नेल्लूरपासून थोडें दूर पल्लिपाडु नांवाच्या गांवांत अेक आश्रम वसविला आहे. तो पाहण्यास गेलों असतां सुभगसलिला पिनाकिनीचें दर्शन झालें होतें. श्रीमती कनकम्माच्या पवित्र हस्तांनीं कांतलेल्या सुताचें वस्त्र स्वीकारून आश्रम पाहण्यास गेलों. थोड्या अंतरापर्यंत जिकडे पाहावें तिकडे बागाच बागा आहेत. कालव्यांतून पाणी जोरानें वाहतें आणि हिरवे तरंग हसतात!

मग आली वाळू — पुढें, मागें, अुजवीकडे व डावीकडे वाळूच वाळू! वारा लहर लागेल त्याप्रमाणें ठिकठिकाणीं वाळूच्या टेकड्या बांधी, आणि अिरादा फिरतांच तितक्याच सहजतेनें त्या अुधळून लावी!

अशा वाळूंत सुखानें निर्वाह करणारे तुंगकाय ताडवृक्ष आनंदानें डोलत होते. अुन्हाच्या तापानें कासावीस होअून ते स्वतःच स्वतःवर

चवऱ्या ढाळीत होते कीं आमच्यासारख्या पथिकांची कींव करून आम्हांला वारा घालीत होते, हें कोण सांगणार? दुपारचें ऊन कर्मठ ब्राह्मणाप्रमाणें कठोर तप करीत होतें. पाय भाजत होते, डोकें तापत होतें, आणि शरीराच्या मधल्या भागाला सहवेदना देण्यासाठीं तहान आपली करामत दाखवीत होती.

अशा प्रकारें त्रिविध तापानें तप्त होऊन आम्ही आश्रमांत पोहोचलों. तेथें मी अेका मोठ्या अुंचवट्यावर चढलों. तेव्हां अेकदम पिनाकिनीचा तरल प्रवाह दृष्टीस पडला. किती शीतल तिचें दर्शन! गव्हाच्या रव्यासारख्या पांढऱ्या रेतीवरून स्फटिकासारखें पाणी वाहत आहे आणि वरून भास्कराच्या प्रतापी किरणांचा वर्षाव होत आहे, अशा या शोभेचें वर्णन कोणास करतां येअील? जणूं रोप्यरसाची कोठी भट्टीचा ताप असह्य झाल्यामुळें फुटली आहे आणि आंतला रस वाट फुटेल तिकडे वाहूं लागला आहे! अितक्यांत वाऱ्याची दिशा बदलतांच पिनाकिनीवरून वाहणारा गार वारा सबंध शरीरास सुखसंवेदना देअूं लागला. जवळच्या आंबराअींतील अेका झाडावर चढून दोन डहाळ्यांमध्यें आरामखुर्चीसारखें अेक स्थान शोधून मी आरूढ झालों. दूरवर ताड डुलत होते; वयोवृद्ध आम्रवृक्ष सावली करीत होते आणि पिनाकिनी शीतल वायु फुंकीत होती. नंदनवनांत तरी यापेक्षां अधिक सुख मिळत असेल का?

नदीकांठाचें हें काव्य पिअुन डोळे गुंगले आणि मिटूं लागले. वरून पडण्याची भीति नसती तर जागृतींतील या काव्याच्या तोडीचें अेखादें स्वप्नकाव्य मीं अवश्य अनुभविलें असतें.

पिनाकिनीचें पात्र मोठें आहे. पावसाळ्यांत ती रुद्रावतार धारण करते. तेथील लोकांची पिनाकिनीविषयींची भक्ति कांहीं 'और' च आहे.

# १४

# रेणुकेचा शाप ?

रेणुका म्हणजे रेती. तिच्या शापानें कोणती नदी सुकून जाणार नाहीं ? गयेची नदी फल्गु सुद्धां अशीच अंतःस्रोता झाली नाहीं का ? मग वढवाण-जवळील भोगावोची देखील अशीच स्थिति कां होणार नाहीं ? काठियावाडांत भोगावो नांवाच्या नद्या पुष्कळ आहेत. प्रत्येकीला काय कोणत्या तरी राणक-देवीचा शापच भोंवला असेल ? शेत्रुंजी, भादर, मच्छु, आजी, रंगमती, मेगळ या चारहि दिशांस वाहणाऱ्या नद्यांपैकीं बाराहि महिने जिच्यांत पाणी असतें अशा किती असतील ? खंडस्थ भारतवर्षापासून काठियावाड अनेक रीतींनीं वेगळें पडतें. त्याचा आकार तो केवढा ! चोटीलो किंवा बरडो, शेत्रुंजो अथवा गिरनार हे डोंगर पाणी देऊन देऊन किती देणार ? नीलगिरि आणि सह्याद्रि, सातपुडा आणि विंध्याद्रि, हिंदुकुश आणि हिमालय, नागा, खासी आणि ब्रह्मी योमाओ यानांच मुख्यतः मेघांकडून करभार मिळतो. त्यांच्या मुली गौरवानें अलसललित होऊन चालतात. त्यांच्यापुढें बिचाऱ्या काठियावाडच्या नद्यांचा काय पाड ? पाऊस पडला कीं वाहायला लागायचें, पाऊस थांबला की चिंतेंत पडायचें !

प्रत्येक नदीनें अेखाददुसऱ्या शहराला आश्रय दिला आहे. भोगावोमुळें वढवाणला शोभा आली आहे. राणकदेवीचा शाप नसता तर या नदीचें मुख किती अुज्ज्वल दिसलें असतें ! आज अंत्यजांचा शाप घेऊन हल्लींचे लोक भविष्यकालीं तिची काय दशा करणार आहेत कोण जाणे ! शेत्रुंजीचीं वळणें पाहावयाचीं असतील तर तिचें रक्षण करणाऱ्या त्याच नांवाच्या डोंगराच्या शिखरावरून पाहून घ्यावीं. सोन्यासारखें गवत अुगवेलेलें आहे, दूरवर गालिच्यासारखीं शेतें पसरलीं आहेत, आणि त्यांच्यामधून शेत्रुंजी आपली वाट काढीत हळूहळू वाहत आहे हें दृश्य रमणीय दिसतें. शेत्रुंजीची गति संस्कारक आणि चित्ताकर्षक आहे.

आणि मेगळ हें नांव कशावरून पडलें असावें ? देवडोहांत मगरानें अेखाद्या हत्तीला घट्ट पकडून ठेविलें असावें त्यावरून ? कीं समुद्राच्या

आणि तिच्यामध्यें येणाऱ्या अुंच वाळवंटावर ती डोकें आपटते म्हणून ? प्रत्येक नदीला समुद्राला मिळण्याचा अधिकार असतोच. पण बिचाऱ्या मेगळला वर्षांतील आठ महिने खंडितेप्रमाणें आपल्या पतीचें दर्शन दुरूनच घ्यावें लागतें ! पावसाळ्यांत जेव्हां समुद्राच्यानेंहि राहवत नाहीं, तेव्हांच या दोघांचा संगम होतो. चोरवाडच्या लोकांना या संगमावरच स्मशान करण्याचें कां सुचलें ? अथवा त्यांत देखील औचित्य नाहीं असें कसें म्हणावें ? स्मशान हा सुद्धां अिहलोक व परलोक यांचा संगमच नाहीं कां ?

पण काठियावाडला जिचा अतिशय गौरव वाटतो अशी अेकटी भादर नदीच आहे. भादरचें मूळ नांव काय असेल ? भाद्रपदी कीं भद्रावती ? बहादूर तर नसावेंच. या नदीची प्रतिष्ठा फार आहे. जेतपूर, नवागढ व नवीबंदर यांसारखीं स्थळें तिच्या कांठावर वसलीं आहेत. जेव्हां नवीबंदर वसलें असेल, तेव्हां त्याला 'नवी' नांव देणाऱ्या पुरुषांच्या हृदयांत केवढ्या आकांक्षा व अुत्साह असतील बरें ? "पोरबंदरपेक्षांहि तें वरचढ होअील, मोठमोठ्या नौका दूरदेशचा माल देशाच्या अंतर्भागापर्यंत पोहोचवितील." अशीच आकांक्षा त्यांनीं सेविली असेल. दैव अनुकूल असतें तर भादरला टेम्सची योग्यता प्राप्त झाली नसती काय ? पण नदीची प्रतिष्ठा तिच्या पुत्रांच्या पुरुषार्थावर अवलंबून असते. आज भादरला हिंदुस्थानांतील पश्चिमवाहिनी नद्यांचा अग्रेसरपणा प्राप्त झाला आहे तेंच पुष्कळ आहे.

रंगमती, आजी आणि मच्छु वाटेल तितक्या परोपकारी असल्या आणि नवानगर, राजकोट व मोरवी यांचें वैभव पाहत असल्या तरी त्यांना समुद्राला सोडून लहानशा आखातालाच वरणें भाग पडतें. काठियावाडच्या या साऱ्या नद्यांनीं देशी राज्यांतील खटपटी व लटपटी फार जुन्या काळापासून पाहिल्या असतील. पण काठियावाडच्या भिन्न भिन्न विभागांतील विशिष्ट चालीरीती जर त्या आपणांला दाखवतील, तर ती कथा मोठी मनोरंजक वाटेल खरी. काठियावाडी नदीचें पाणी पिणाऱ्या अेखाद्या सुपुत्राचें हें कर्तव्य आहे कीं, त्यानें नद्यांकडून त्यांचे अनुभव वदवावेत.

# मूळ त्रिवेणी

ब्रह्मा, विष्णु, महेश हे तिघे मिळून ज्याप्रमाणें दत्तात्रेय होतो, त्याप्रमाणें अलकनंदा, मंदाकिनी आणि भागीरथी मिळून गंगामाता बनते. या तिघी गंगेच्या मैत्रिणी नव्हत तर तिचीं अंगें आहेत. भागीरथी स्वतः गंगोत्रीहून आली म्हणून काय झालें? मंदाकिनीचा केदारनाथ आणि अलकनंदेचा बदरीनारायण ह्या दोहोंना गंगेचे अुगम म्हणतां येतील.

ब्रह्मकपालाच्या पुढून जी अकलनंदा वाहते आणि अेकदां श्राद्ध केल्यावर झाडून साऱ्या पूर्वजांना एकदमच नित्याची मुक्ति देते, त्या अलकनंदेचें अुगमस्थान काय गंगोत्रीपेक्षां कमी पवित्र मानावें? ब्रह्मकपालावर अेकदां श्राद्ध केलें कीं मग म्हणे माणसानें पुनः श्राद्ध करतांच कामा नये. मोहानें जर तो करील तर पितर अधोगतीला जातील! केवढें जागृत स्थान!

बदरीनारायणाच्या अुष्ण कुंडांतील पाणी ज्याप्रमाणें अलकनंदा घेअून येते, त्याप्रमाणें मंदाकिनी ही गौरीकुंडाच्या अून पाण्यानें थोडा वेळ कोमट बनते. केदारनाथाच्या देवळाची बांधणी अितर सर्व देवळांपेक्षां वेगळीच वाटते. आंतील शिवलिंगसुद्धां स्वयंभू, वेड्यावांकड्या आकाराचें आहे. तें अेवढें अुंच आहे कीं, त्यावर पडून त्याला हृदयस्पर्श करतां येतो. देवळाअितकेंच मंदाकिनीचेंहि वैशिष्ट्य आहे. येथील दगड निराळे, येथील प्रवाह निराळा आणि येथील स्नानाचा आनंदहि कांहीं निराळाच!

पण कांहीं झालें तरी गंगोत्री ती गंगोत्रीच. या तीनहि प्रवाहांत भागी-रथीचा प्रवाह अधिक वन्य आणि मुग्ध दिसतो. गंगेंत हे तीनच प्रवाह आहेत असें नाहीं. नीलगंगा, ब्रह्मगंगा, व अितरहि किती तरी गंगा आहेत. हिमालयांतून निघणारे सारे प्रवाह गंगाच कीं नाहीं? ज्यांचें ज्यांचें पाणी हरिद्वाराजवळ हरिचरणाला स्पर्श करतें, ते सारे प्रवाह गंगाच होत. वाल्मीकीनें सुद्धां जेव्हां गंगेला आकाशांतून हिमालयाच्या शिखररूपी महादेवाच्या जटेंत पडतांना पाहिलें तेव्हां त्याच्या आर्ष दृष्टीनें सात वेगवेगळे प्रवाह मोजले होते:

> "तस्यां विसृज्यमानायां सप्त स्रोतांसि जज्ञिरे ।
> ह्लादिनी पावनी चैव नलिनी च तथैव च ॥
> सुचक्षुश्चैव सीता च सिन्धुश्चैव महानदी ।
> सप्तमी चान्वगात्तासां भगीरथरथं तदा ॥"

१२८८२४
३९१३१५३



# फल्गु

संस्कृतमध्यें 'फल्गु' शब्दाचे दोन अर्थ होतात. 'फल्गु' म्हणजे निःसार, क्षुद्र, तुच्छ; आणि 'फल्गु' म्हणजे सुंदर! गयेजवळ असलेल्या नदीचें फल्गु नांव दोन्ही अर्थांनीं सार्थ आहे. पुराणांत लिहिलें आहे कीं, तिला सीतेचा शाप भोंवला. सीतेचा नसला तरी सिकतेचा शाप भोंवला आहे हें मात्र आपण उघड्या डोळ्यांनींहि पाहूं शकतों. जेथें पाहावें तेथें रेती. बिचारा क्षीण प्रवाह डोकें वर काढणार तरी कसें? यात्रेकरू जिकडे तिकडे रेती खोदून हेळ सिद्ध करतात. मोठ्या लाकडी फावड्याला लांब दोरी बांधून फाळाप्रमाणें ते हेळांत फिरवतात, म्हणजे गाळ निघून जातो, हेळ अधिक खोल बनतो, आणि अधिक पाणी मिळतें.

फल्गूच्या पात्रांत असंख्य श्रद्धाळू यात्रेकरू स्नान करून पितरांसाठीं भात शिजवतात आणि पिंड तयार करतात. तांदूळ, पाणी, मडकें व गोवऱ्या या सर्वांचें प्रमाण पंड्यांनीं नित्याचेंच ठरवून टाकलें आहे. नियमाप्रमाणें पैसे दिले कीं पंड्या सर्व सामग्री घेऊन येतो. गोवऱ्या रचून पेटवून त्यावर भाताचें मडकें ठेवून द्यायचें. अमुक विधि पूर्ण होतात तेवढ्यांत चरु शिजून सिद्ध होतो.

फल्गूच्या कांठीं देवळें व धर्मशाळा यांची विलक्षण शोभा दिसून येते. त्यांतहि श्रीगदाधराच्या देवळाचें शिखर तर चटकन् लक्ष वेधून घेतें.

गयेहून बुद्धगयेकडे जातेवेळीं फल्गूची खरी शोभा बघून घ्यावी. वाळूचें लांबरुंद पुलिन, आसपास ताडांचीं उंच उंच झाडें आणि मधूनच वेडावांकडा जाणारा फल्गूचा क्षीण प्रवाह. पण त्याला क्षुद्र किंवा निःसार कोण म्हणेल? ज्या ठिकाणीं प्रभु रामचंद्र व सीता येऊन गेलीं होतीं, भगवान् बुद्ध हिंडले होते आणि कितीतरी सत्पुरुष श्राद्ध करण्यास येऊन गेले होते त्या महातीर्थास निःसार म्हणतांच येत नाहीं. शेवटीं फल्गु म्हणजे सुंदर हाच अर्थ खरा.

१७

# नदीवर कालवा

श्रावणी पौर्णिमा म्हणजे जानवें बदलण्याचा दिवस; आणि ब्राह्मण्य विसरून म्हणावयाचें म्हणजे राखी (रक्षाबंधना)चा* दिवस. त्या दिवशीं आम्ही रुडकी येथें पोहोचलों. खेळकर वृत्तीच्या वेणीप्रसादानें पाहतां पाहतांच माझ्याशीं परिचय करून घेतला, आणि तो म्हणूं लागला, "अजी काकाजी, आज तो आपके हाथसे ही जनोअी लेंगे. यहां के ब्राह्मण वेदमंत्र बराबर बोलते ही नहीं. आप 'महाराष्टर' हों. आप ही हमें जनोअी दीजिअेगा." वेणीप्रसादाचे मामा गोड भक्त होते. त्यांच्याशीं जानव्यासंबंधीं चर्चा सुरू झाली. अुत्तर हिंदुस्थानांतील ब्राह्मणांची अिच्छा असते कीं, तिन्ही द्विज वर्गांनीं नियमितपणें जानवें घालावें आणि संध्यादि नित्यकर्में करावींत; पण तिकडील लोकांना याविषयीं फार अनास्था असते. अुलट अिकडे दक्षिणेंत ब्राह्मणेतर लोक जानव्याचा अधिकार मागत असतांना महाराष्ट्रांतील ब्राह्मण "कलौ आद्यन्त्योः स्थितिः" (कलियुगांत आरंभाचा व शेवटचा (ब्राह्मण व शूद्र) असे दोनच वर्ण राहतात) या वचनाच्या आधारावर मधले दोन वर्ण मुळीं नाहींतच, असा भलताच हट्ट धरून बसतात. सुदैवानें आज ही स्थिति राहिली नाहीं. ज्यांना जानवें मिळतें ते तें घालण्यास अुत्सुक नसतात आणि जे मारामारी सुद्धां करून जानवें घालण्याचा हक्क मिळवूं पाहतात त्यांना स्वतःचें द्विजत्व सिद्ध करण्याची अडचण पडते! ही चर्चा अैकल्यावर वेणीला वाटलें कीं, आपल्याला आज जानवें मिळणार नाहीं. त्यानें युक्तिवाद केला, "कलियुगांत काय होअूं शकत नाहीं? जर नदीवर नदी स्वार होअूं शकते, तर महाराष्ट्र ब्राह्मणाला सुद्धां आम्हांला जानवें देतां येअील."

विषय बदलला आणि कलियुगांतील भगीरथांच्या पराक्रमाचा (अिरिगेशन् अेंजिनियरिंगचा) नमुना म्हणून असलेल्या गंगेच्या कालव्याविषयीं गोष्टी चालू झाल्या.

---

* श्रावणी पौर्णिमेच्या दिवशीं वहीण भावाचा सत्कार करते आणि आपलें रक्षण करण्याच्या त्याच्या कर्तव्याची त्याला आठवण देण्यासाठीं खूण म्हणून त्याच्या हातांत सूत्र बांधते; त्याला 'राखी' म्हणतात.

दुपारीं आम्ही हा मानवी पराक्रम पाहण्यास निघालों. गंगेचा कालवा शहराजवळून जातो. मुलें या कालव्यांत माशाप्रमाणें छापा-पाणीचा खेळ खेळत होतीं. कालव्याच्या कांठाकांठानें आम्ही त्या प्रसिद्ध पुलापर्यंत गेलों. खरोखर तो देखावा भव्य होता. अेखाद्या गरीब ब्राह्मणीसारखी दिसणारी सोलाना नदी पुलाखालून वाहत होती आणि वर गंगेचा कालवा आपलें रुंद पात्र थोडेंसुद्धां संकुचित न करतां पुलावरून वेगानें वाहत होता. पुलावर पाण्याचा भार अितका असावासें वाटत होतें कीं, आतां त्याच्या दोहों बाजूंकडील भिंती कोसळून पडतील आणि हत्तीवरून दोहों बाजूंनीं झूल लटकत असते त्याप्रमाणें पाण्याचे दोन रुंद प्रवाह पुलावरून पडूं लागतील! पुलाच्या भिंतीवर अुभें राहून कालव्याच्या प्रवाहाकडे अेकसारखें पाहत राहिल्यानें मेंदूवर परिणाम होतो. दुःखी मनुष्याला ज्याप्रमाणें अुद्वेगाचे नवेनवे अुमाळे येतात, त्याप्रमाणें कालव्याच्या पाण्यांतून अुमाळे येत होते. पण सासरीं नवीनच आलेली सून जशी आपल्या सर्व भावना दाबून टाकते, तशी गंगानदीची ही पराधीन कन्या त्या सगळ्या अुमाळ्यांना दाबून टाकीत होती! प्रथमच तिचा हा विस्तार पाहून ही कोणी श्रीमंत पतीची गर्विष्ठ राणी आहे असें वाटत होतें. पण जवळ जाअून पाहिल्यावर श्रीमंतीखालीं झांकलेलें पारतंत्र्याचें दुःख तिच्या मुखावर स्पष्ट दिसत होतें.

वरून पाहतां निम्नगा सोलानेचा क्षीण पण स्वतंत्र प्रवाह दोन्हीं बाजूंनीं आकर्षक वाटत होता. मात्र अेकच गोष्ट मनाला टोचत होती; ती ही कीं, कालव्याच्या दोन्ही बाजूंच्या भिंतींना परीवाह म्हणून कित्येक छिद्रें ठेवलीं होतीं, त्यांतून कालव्याचें थोडेंसें पाणी जणूं काय अुपकार करण्यासाटीं सोलानेंत पडत होतें.

आम्ही पुलावरून खालीं अुतरलों आणि सोलानेच्या कांठावर जाअून बसलों. अुच्च स्थानावरून करण्यांत आलेल्या अुपकाराला दूर लोटण्या-अितकी सोलाना मानिनी नव्हती. पण कांहीं कृपा अवतरेल काय अशी आशाळभूत दृष्टि टाकण्याअितकी ती हीनहि नव्हती. तिच्यांत हीनता नव्हतीच आणि मानिनीपणा तिला शोभला नसता. तिचा निर्व्याज

स्वाभाविकपणाच्च अुलट शिकवून आणलेल्या अुदात्त चारित्र्यापेक्षांहि अधिक शोभून दिसत होता.

भगीरथविद्येंत (अिरिगेशन अेंजिनियरिंगमध्यें) पाण्याचा प्रवाह घेअून जाण्याचे सहा मार्ग सांगितले आहेत. त्यांतील सर्वांत विलक्षण व कठिण प्रकार म्हणजे अेका प्रवाहावरून दुसरा प्रवाह घेअून जाणें हा आहे. आगगाड्यांचे मार्ग अशा रीतीनें नेलेले आपण पुष्कळदां पाहिले आहेत. पण माझ्या माहितीप्रमाणें हिंदुस्थानांत अशा जलप्रवाहाचें हें अेकच अुदाहरण आहे. सांस्कृतिक प्रवाहाच्या दृष्टीनें पाहिल्यास सारें भरतखंड अशाच प्रकारानें भरलें आहे. प्रत्येक जातीची संस्कृति वेगळी आहे आणि या संस्कृति अनेक वेळां समोरासमोर येअूनहि अेकमेकींत न मिसळतां अस्पृष्टच राहूं शकल्या आहेत.

## १८

# सिंधूचा विषाद

हिमालयाच्या पलीकडील बाजूस, आणि पृथ्वीच्या या मानदंडाच्या जवळजवळ अगदीं मध्यभागीं, कैलासनाथाच्या नजरेखालीं चिरहिमाच्छादित असा अेक पुण्यपावन प्रदेश आहे कीं, ज्याच्या छोट्याशा क्षेत्रांत आर्यावर्तांतील चार लोकमातांचा अुगम होतो. अैल व पैल बाजूंचा हिशोब केला नाहीं तर अुत्तर भारतांतील जवळजवळ सार्‍या नद्या येथूनच झरतात असें म्हटल्यास चालेल.

हिमालय हिंदुस्थानाचाच आहे, दुसर्‍या कोणत्याहि देशाचा नाहीं, हे सिद्ध करण्यासाठीं हिमालयाच्या अुत्तरेकडे सांडणार्‍या पाण्याचा अेकूण अेक थेंब गोळा करून ते सर्व हिमालयाच्या दोनहि टोंकांना प्रदक्षिणा घालून हिंदी महासागरापर्यंत पोंचविण्याचें काम सिंधु आणि ब्रह्मपुत्रा ह्या दोन नद्या-नद-करीत असतात.

श्रीकैलासनाथानें भारतवर्षाला आपल्या छातीशीं धरण्यासाठींच जणूं काय हे दोन कारुण्यबाहु पसरले आहेत ! हिमालयाचें आडवें येणें सहन

न झाल्यामुळेंच कीं काय सतलज व घोग्रा त्या नगाधिराजाच्या कुशींतूनच सरळ वाट काढून मानससरोवराचें पाणी भारतवर्षांतील दोन मोठ्या प्रांतांना पुरविण्यासाठीं आणतात. गंगा, यमुना व त्यांच्या असंख्य मैत्रिणी तेंच काम वडिलांचा मान राखून या बाजूस करतात. पंजाबच्या पांच नद्या आणि संयुक्त प्रांतांतील पांच नद्या मिळून दाही जणी भारतवर्षाची समृद्धि दसपट करतात. या दहाहि नद्या भारतीय आहेत. फक्त सिंधु व ब्रह्मपुत्रा यांना अतिभारतीय म्हणजे भारतापलीकडून येणाऱ्या म्हणतां येईल.

गंगामाईचा लाभ होतांच सिंधूचा जणूं काय भारतवासीयांना विसरच पडला. सिंधूच्या कांठीं आर्यांचीं धर्मप्रसिद्ध तीर्थें नाहींतच मुळीं. ज्याप्रमाणें वैदिक देवांचा देव अिंद्र याला आपण विसरून गेलों आहों, त्याचप्रमाणें वैदिक सप्तसिंधूंतील मुख्य नदीला सुद्धां आपण जणूं काय विसरून गेलों आहों. दक्षिण व पूर्व या दिशांना मोठमोठीं साम्राज्यें स्थापून प्राचीन आर्यलोक वायव्य दिशेविषयीं कांहींसे अुदासीन राहिले आणि त्यामुळें सदा संकटांत पडत गेले. अुत्तरेकडे हिमालयाची तटबंदी आहेच. पश्चिमेकडे राजपुतान्याची मरुभूमि आणि रजपूत व डोगरा जातींचें शौर्य यांमुळें पुरेसें रक्षण मिळत असे. त्या बाहेर वेगवती सिंधूची राखण होती. त्याच्याहि पुढें खीरथरपासून हिंदुकुशपर्यंत लागलेल्या प्रचंड पर्वतश्रेणीच्या योगानें रक्षण होत असे. पहाडी परोपनिसदी* लोकांची स्वातंत्र्यप्रियताहि विदेशीयांना या बाजूस फिरकूं देत नसे. परंतु जेथें देशवासीच उदासीन बनले तेथें तट आणि नद्या या कितीसें रक्षण करणार? परोपनिसदी लोकांना यवन येअून मिळाले आणि बाल्हीकपर्यंत असलेली हिंदुस्थानची स्वाभाविक सीमा हटत हटत अटकेपर्यंत येअून अटकली; आणि अटकेनें सुद्धां परदेशी लोकांना आंत घुसण्यास अटक करण्याअेवजीं भारतवासीयांनाच बाहेर जाण्यास अटकाव केला! राणी सेमिरामिस हिन्दुस्थानांत येतांना अटकली नाहीं. पारसिक सम्राटांना पंजाब व सिंधु या देशांकडून सुवर्ण-करभार घेतांना कोणीं अटकाव केला नाहीं. शिकंदर पांचहि नद्या ओलांडतांना अडला नाहीं. यूअेची व हूण लोक हिन्दुस्थानांत येतांना अडले नाहींत. महमुद किंवा बाबर यांनाहि अटक नडली नाहीं. काबूल नदीचें पाणीच ज्या नदीनें

* अफगाणिस्थानच्या लोकांचें प्राचीन नांव.

स्वीकारलें ती नदी पश्चिमेकडून येणाऱ्या लोकांना अडविणार नाहीं अेवढी साधी गोष्ट आपल्या लोकांनीं जाणावयास हवी होती.

पश्चिम तिबेटांत कैलासपर्वताच्या पायथ्यापासून सिंधूचा अुगम आहे. तेथून ती सरळ वायव्य दिशेकडे धावते. कारण काय, तर तिला शेवटीं नैर्ऋत्ये-कडे जावयाचें आहे. काश्मिरांत घुसल्यावर लेह येथील लष्करी छावणीची भेट घेअून काराकोरमच्या रखवालीखालीं ती सरळ पुढें जाते. आपल्याला हिन्दुस्थानांत जावयाचें आहे या गोष्टीची तिला स्कार्डूजवळ आठवण होते. गिरगिटचा किल्ला दुरूनच पाहून ती दक्षिणेकडे वळते. चित्रालकडे तिला स्वतःला जावयाचें नाहीं म्हणूनच त्या प्रदेशांत पाणी कसें काय आहे तें तपासण्यासाठीं ती स्वात नदीला आपल्याजवळ बोलावते. स्वात अेकटी कशाची येते ? तिची काबूलवर निष्ठा. सफेद कोह ( पर्वता ) चें पाणी आण-णाऱ्या काबूल नदीशीं मिसळून ती अटकेजवळ सिंधूला मिळते आणि थानंतर मात्र सिंधू पूर्णपणें भारतीय बनते. स्वात आणि काबूल यांच्याकडून अैकण्याजोगा केवढा तरी अितिहास आहे ! खैबरघाटांतून कोण कोण आले व गेले, बॅक्ट्रियाचे ग्रीक लोक कोटल्या मार्गानें आले, तेव्हांपासून तों कर्नल यंगहजबंडनें चित्रालवर कोठून स्वारी केली त्या वेळेपर्यंतचें वृत्त या दोन नद्या सांगू शकतील. अमीर अमानुल्लानें 'वासंतिक वेडांत'§ परवांपरवां जी चढाओी केली तिचा वृत्तान्त विचाराल, तर तो सुद्धां त्या सांगू शकतील; आणि कोहाटचें* क्रौर्य सुद्धां सिंधूला अज्ञात नाहीं. वजिरिस्तान व बन्नू यांमध्यें घडून आलेल्या, क्षात्रधर्माला लाजविणाऱ्या प्रसंगाचें वर्णन कुर्रमच्या तोंडून अैकल्यावर सिंधूचें हृदय थरथर कांपू लागतें ! कुमु वा कुर्रम नदी सिंधूला मिळाल्याबरोबर सिंधूचा प्रवाह

§ गोरें सैन्य अुन्हाळ्याच्या दिवसांत चालविलेल्या मोहिमेंत टिकाव धरूं शकत नाहीं हें ओळखून अफगाणच्या अमीर अमानुल्लानें अेकदां सरहद्दीवर अुन्हाळ्यांतच कुरापत काढली होती. अंतून त्रस्त झालेले, पण बाहेरून हेटाळणी करूं अिच्छिणारे अिंग्रज अधिकारी अमानुल्लाच्या या साहसाला 'midsummer madness' (वासंतिक वेड) म्हणत असत !

* हिंदु-मुसलमानांच्या कोहाट येथें झालेल्या दंग्यांत मुसलमानांनीं हिंदूंचा अनन्वित छळ केला होता.

विघडतो. पर्वताच्या अभावीं त्याला मर्यादा राहते नाहीं. लहानमोठीं बेटें बनवीत बनवीत सिंधू डेराअिस्माअिलखानपासून डेरागाजीखानपर्यंतचा मार्ग कापते.

या पुढची सिंधू पांचहि नद्यांच्या पाण्याची वाट पाहत अरुंद होअून धावते. चिनाब जम्मूकडून येअून काश्मिरी झेलमला मिळते. लाहोरचें वैभव भोगून तृप्त झालेली रावी या दोघींना येथें भेटते. व्यास (बियास)च्या पाण्यानें पुष्ट झालेली सतलज या तिघींच्या पाण्यांत मिसळून जाते आणि मग अुन्मत्त झालेला पंचनद्यांचा हा महाप्रवाह आपल्या सर्व वेगानें मिट्ठणकोट-जवळ सिंधूवर जाअून आदळतो. अेवढा मोठा हल्ला अंगावर झेलून, पचवून आपलेंच नांव वज्रलेप करणाऱ्या सिंधूची शक्ति अर्थात तितकीच मोठी असली पाहिजे !

सिंधू स्वतःचें नांव राखते अितकेंच नव्हे, तर यानंतर अुदार कृपेचा फैलाव करीत करीत आसपासच्या प्रदेशालाहि स्वतःचेंच नांव अर्पण करते. “त्यागाय संभृतार्थानाम्” [त्यागाकरितांच ज्यांचा अर्थ (धन) संग्रह आहे] अशा आर्य राजांचेंच अनुकरण ती करते. मोठमोठ्या सात खोऱ्यांचें पाणी ती गोळा करते खरी, पण तें सर्व अनेक मुखांनीं महासागराला अर्पण करण्या-साठींच; आणि वाटेनें जात असतां अर्थार्थी लोकांनीं त्यांतून हवें तेवढें पाणी पाट बांधून नेलें तरी त्याहि गोष्टीला सिंधूची ना नाहीं.

तरी सुद्धां गंगामातेचें औदार्य सिंधूमध्यें नाहीं. म्हणूनच अटक व सक्करपासून हैदराबाद-कोटरीपर्यंत तिच्यावर पूल बांधण्यांत येअू शकले. सक्करचा पूल लष्करी दृष्टीनें फारच महत्त्वाचा आहे. सिंधूंत असणाऱ्या अेका मोठ्या बेटाचा अुपयोग करून हा पूल बांधण्यांत आला आहे. पण जेथें रोहरीच्या अंगाला पाणी खोल आहे तेथें हा पूल पंख्यासारखा वाटेल तेव्हां ओढून घेतां येतो. सिंधूवरून सैन्याला जाअू द्यावयाचें नसेल तेव्हां जणूं काय अेक मंत्र म्हटल्याबरोबर सगळा पूल अदृश्य करतां येतो. मग शिकारपूर-सक्कर वेगळें आणि रोहरी-शरीफ वेगळें. शिकारपूर-सक्करला अिंग्रजांनींच महत्त्व दिलें आहे अशांतला कांहीं भाग नाहीं. येथील हिन्दु व्यापारी प्राचीन काळापासून बोलनघाटाच्या मार्गानें कंदाहारवरून मध्य-आशियांत व्यापार करण्यासाठीं जात आले आहेत. हिरात अथवा मर्व,

स्वीकारलें ती नदी पश्चिमेकडून येणाऱ्या लोकांना अडविणार नाहीं अेवढी साधी गोष्ट आपल्या लोकांनीं जाणावयास हवी होती.

पश्चिम तिबेटांत कैलासपर्वताच्या पायथ्यापासून सिंधूचा अुगम आहे. तेथून ती सरळ वायव्य दिशेकडे धावते. कारण काय, तर तिला शेवटीं नैर्ऋत्येकडे जावयाचें आहे. काश्मिरांत घुसल्यावर लेह येथील लष्करी छावणीची भेट घेअून काराकोरमच्या रखवालीखालीं ती सरळ पुढें जाते. आपल्याला हिन्दुस्थानांत जावयाचें आहे या गोष्टीची तिला स्कार्डूजवळ आठवण होते. गिरगिटचा किल्ला दुरूनच पाहून ती दक्षिणेकडे वळते. चित्रालकडे तिला स्वतःला जावयाचें नाहीं म्हणूनच त्या प्रदेशांत पाणी कसें काय आहे तें तपासण्यासाठीं ती स्वात नदीला आपल्याजवळ बोलावते. स्वात अेकटी कशाची येते? तिची काबूलवर निष्ठा. सफेद कोह (पर्वता) चें पाणी आणणाऱ्या काबूल नदीशीं मिसळून ती अटकेजवळ सिंधूला मिळते आणि यानंतर मात्र सिंधू पूर्णपणें भारतीय बनते. स्वात आणि काबूल यांच्याकडून अैकण्याजोगा केवढा तरी अितिहास आहे! खैबरघाटांतून कोण कोण आले व गेले, बॅक्ट्रियाचे ग्रीक लोक कोठल्या मार्गानें आले, तेव्हांपासून तों कर्नल यंगहजबंडनें चित्रालवर कोठून स्वारी केली त्या वेळेपर्यंतचें वृत्त या दोन नद्या सांगू शकतील. अमीर अमानुल्लानें 'वासंतिक वेडांत'§ परवांपरवां जी चढाअी केली तिचा वृत्तान्त विचाराल, तर तो सुद्धां त्या सांगू शकतील; आणि कोहाटचें* क्रौर्य सुद्धां सिंधूला अज्ञात नाहीं. वजिरिस्तान व बन्नू यांमध्यें घडून आलेल्या, क्षात्रधर्माला लाजविणाऱ्या प्रसंगाचें वर्णन कुर्रमच्या तोंडून अैकल्यावर सिंधूचें हृदय थरथर कांपू लागतें! क्रुमु वा कुर्रम नदी सिंधूला मिळाल्याबरोबर सिंधूचा प्रवाह

---

§ गोरें सैन्य अुन्हाळ्याच्या दिवसांत चालविलेल्या मोहिमेंत टिकाव धरूं शकत नाहीं हें ओळखून अफगाणच्या अमीर अमानुल्लानें अेकदां सरहद्दीवर अुन्हाळ्यांतच कुरापत काढली होती. आंतून त्रस्त झालेले, पण बाहेरून हेटाळणी करूं अिच्छिणारे अिंग्रज अधिकारी अमानुल्लाच्या या साहसाला 'midsummer madness' (वासंतिक वेड) म्हणत असत!

* हिंदु-मुसलमानांच्या कोहाट येथें झालेल्या दंग्यांत मुसलमानांनीं हिंदूंचा अनन्वित छळ केला होता.

विघडतो. पर्वताच्या अभावीं त्याला मर्यादा राहते नाहीं. लहानमोठीं बेटें बनवीत बनवीत सिंधू डेराअिस्माअिलखानपासून डेरागाजीखानपर्यंतचा मार्ग कापते.

या पुढची सिंधू पांचहि नद्यांच्या पाण्याची वाट पाहत अरुंद होअून धावते. चिनाब जम्मूकडून येअून काश्मिरी झेलमला मिळते. लाहोरचें वैभव भोगून तृप्त झालेली रावी या दोघींना येथें भेटते. व्यास ( बियास )च्या पाण्यानें पुष्ट झालेली सतलज या तिघींच्या पाण्यांत मिसळून जाते आणि मग अुन्मत्त झालेला पंचनद्यांचा हा महाप्रवाह आपल्या सर्व वेगानें मिठ्ठणकोट-जवळ सिंधूवर जाअून आदळतो. अेवढा मोठा हल्ला अंगावर झेलून, पचवून आपलेंच नांव वज्रलेप करणाऱ्या सिंधूची शक्ति अर्थात तितकीच मोठी असली पाहिजे !

सिंधू स्वतःचें नांव राखते अितकेंच नव्हे, तर यानंतर अुदार कृपेचा फैलाव करीत करीत आसपासच्या प्रदेशालाहि स्वतःचेंच नांव अर्पण करते. “त्यागाय संभृतार्थानाम्” [ त्यागाकरितांच ज्यांचा अर्थ (धन) संग्रह आहे ] अशा आर्य राजांचेंच अनुकरण ती करते. मोठमोठ्या सात खोऱ्यांचें पाणी ती गोळा करते खरी, पण तें सर्व अनेक मुखांनीं महासागराला अर्पण करण्या-साठींच; आणि वाटेनें जात असतां अर्थार्थी लोकांनीं त्यांतून हवें तेवढें पाणी पाट बांधून नेलें तरी त्याहि गोष्टीला सिंधूची ना नाहीं.

तरी सुद्धां गंगामातेचें औदार्य सिंधूमध्यें नाहीं. म्हणूनच अटक व सक्करपासून हैदराबाद-कोटरीपर्यंत तिच्यावर पूल बांधण्यांत येअू शकले. सक्करचा पूल लष्करी दृष्टीनें फारच महत्त्वाचा आहे. सिंधूंत असणाऱ्या अेका मोठ्या बेटाचा अुपयोग करून हा पूल बांधण्यांत आला आहे. पण जेथें रोहरीच्या अंगाला पाणी खोल आहे तेथें हा पूल पंख्यासारखा वाटेल तेव्हां ओढून घेतां येतो. सिंधूवरून सैन्याला जाअू द्यावयाचें नसेल तेव्हां जणू काय अेक मंत्र म्हटल्याबरोबर सगळा पूल अदृश्य करतां येतो. मग शिकारपूर-सक्कर वेगळें आणि रोहरी-शरीफ वेगळें. शिकारपूर-सक्करला अिंग्रजांनींच महत्त्व दिलें आहे अशांतला कांहीं भाग नाहीं. येथील हिन्दु व्यापारी प्राचीन काळापासून बोलनघाटाच्या मार्गानें कंदाहारवरून मध्य-आशियांत व्यापार करण्यासाठीं जात आले आहेत. हिरात अथवा मर्व,

बोखारा किंवा समरकंद या ठिकाणीं शिकारपुरचे व्यापारी सांपडायचेच. शिकारपुरी हुंडी मॉस्को व सेंट पीटर्सबर्ग (आजचें लेनिनग्राड) पर्यंत अनिर्बंध चालत असे.

सक्करची आठवण काढतांच अेका मोठ्या जहाजाप्रमाणें पाण्यांत तरंगणाऱ्या साधुबेला नांवाच्या बेटाचें स्मरण झाल्यावांचून राहत नाहीं. साधूंची काव्यमय अभिरुचि सदैव सर्वांत सुंदर स्थळ पसंत करते. साधुबेलाच्या सौंदर्याचा हेवा सम्राटांनाहि वाटेल!

सिंधूला विश्रांति घेण्याची अिच्छा झाली, कीं शिंगाडे खावेसे वाटले, कोण जाणे; ती येथून मंछर सरोवराकडे धाव घेते. पण वेळींच भानावर येअून म्हणा अथवा खीरथरनें सांगितलें म्हणून म्हणा, ती मागें फिरते आणि शेवणपासून आग्नेय दिशा धरून हैदराबादपर्यंत जाते. ह्या प्रदेशानें किती तरी युद्धें पाहिलीं आहेत. जयद्रथाच्या काळांत येथील स्थिति कशी होती कोण जाणे, पण जच्च व दाहिर* यांच्या काळांत हा प्रांत पुष्कळच मागसलेला असावा. चंद्रगुप्तापूर्वीं अिराणी साम्राज्याला सोनें देअून निःसत्त्व झाल्यामुळें म्हणा किंवा तेथील ब्राह्मण राजांच्या अनाचारामुळें म्हणा, प्रजा अगदीं पिळून निघाली होती. अिराणचा बादशाह येवो किंवा शिकंदर येवो, बगदादचा महंमद बिन कासिम येवो किंवा सर चार्ल्स नेपियर येवो, सिंधूकांठचे लोक प्रत्येक खेपेस हरले आहेत!

सिंकदरानें जेव्हा नावेंत बसून सिंधुमार्गें गमन केलें तेव्हां स्वसंरक्षणासाठीं त्यानें नदीच्या दोन्ही तीरांनीं आपल्या सेना चालविल्या होत्या. आज अिंग्रजांनीं केवळ सिंधूच्याच रक्षणासाठीं नव्हे, तर पंजाबांतील गहूं विलायतेस घेअून जाण्यासाठीं तिच्या दोन्ही तीरांवरून आगगाडी धावविली आहे. सिंधूच्या तरुण प्रवाहाला ओढ फार असल्यामुळें गंगेप्रमाणें तिच्यांत नावा चालत नाहींत. म्हणूनच कराचीपुढें केटी बंदराला मुळींच महत्त्व राहिलें नाहीं. सिंधूच्या मुखाजवळील प्रदेश सिंधूच्याच पराक्रमानें बनलेला आहे. दूरदुरून गाळ व रेती आणून ती पसरत गेली आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, अरबी समुद्राला सूक्ष्म प्रमाणांत कां होअीना 'शौर्यानें मागें हटावें लागलें' आहे!

* सिंधचे दोन प्राचीन ब्राह्मण राजे.

सिंधूचा प्रवाह ‘ सिंधु ’ या नांवाला साजेल असाच विस्तीर्ण व तरस्वी ( ओढीचा ) आहे. अुन्हाळ्यांत वितळलेल्या बर्फाच्या पाण्याचा पूर जेव्हां सिंधूला येतो तेव्हां समुद्राच्या लाटा अुसळाव्या तशा सिंधूच्या लाटा अुसळतात. जलचरांचे गुरु शोभतील असे पट्टीचे पोहणारे लोक सुद्धां अशा वेळीं पाण्यांत अुडी टाकण्याचें साहस करणार नाहींत. प्रेमवेड्या सती–सुहिणीचेंच* व्याकुळ हृदय कच्च्या मडक्याच्या आधारानें अशा प्रवाहांत अुतरण्याचें साहस करील. प्रेमाचा प्रवाह, प्रेमाचा वेग व परिणामाविषयींची प्रेमाची बेपर्वाअी ही महासिंधूपेक्षांहि महानच असणार !

१९

# बिहारची गंडकी

गंडकी नदी नेपाळांतून येते आणि तिच्यांत शाळिग्राम सांपडतात अेवढेंच लहानपणीं अेकलें होतें. शाळिग्राम हे अेक प्रकारचे शंखासारखेच प्राणी असतात, त्यांना तुळशीचीं पानें फारच आवडतात. पाण्यांत तुळशीचीं पानें टाकलीं कीं हे प्राणी हळूहळू बाहेर येअून तीं खाअूं लागतात; तेव्हां शाळिग्रामांना पकडून आंतल्या प्राण्यांस मारून फेंकून देतात, आणि काळ्या दगडासारखे हे शंख स्वच्छ करून पूजेसाठीं विकतात. आजकाल लुच्चे लोक साध्या काळ्या शिळेचा अेक वाटोळा तुकडा घेअून त्याला लहानसा खळगा

---

* सिंध प्रांतांत सतीसुहिणीची प्रेमकथा प्रसिद्ध आहे. सुहिणीच्या पित्यानें तिच्या प्रियकराला गांवांतून हाकून लावलें होतें. पण तो रात्रींचा नदी ओलांडून गुप्तपणें येत असे. पुढें कांहीं कारणानें त्याचें येणें अशक्य झालें, तेव्हां सुहिणी अेक मोठें मडकें पोटाखालीं घालून रात्रीची नदी पार करूं लागली ! तिच्या नणंदेच्या हें लक्षांत आलें तेव्हां तिनें भाजलेल्या मडक्याच्या जागीं अेक कच्चें मडकें ठेवून दिलें. सुहिणी नित्याप्रमाणें तें घेअून नदी ओलांडूं लागली. अर्धी नदी ओलांडली आणि मडकें भिजून पाण्यांत विरघळलें. बुडतां बुडतां तिनें मेहारच्या नांवानें आरोळी ठोकली. ती अैकतांच मेहारनेंहि पुरांत अुडी टाकली. दुसरे दिवशीं दोघांचीं आलिंगन-बद्ध प्रेतें कोळी लोकांनीं बाहेर काढून त्यांची त्यांनीं अेकत्र अंत्यक्रिया केली !

पाडून त्याचा शाळिग्राम बनवितात, पण तो खरा शाळिग्राम नव्हे, अित्यादि गोष्टी मीं अेकल्या होत्या; आणि म्हणून अशी नदी अेकदां पाहिली पाहिजे असें फार दिवस मनांत होतें.

स्वामी विवेकानंदांनीं कोठेंसें लिहिलें आहे कीं, बौद्ध धर्म जेव्हां अुत्तर-हिंदुस्थानांत पसरला तेव्हां गंडकी व नर्मदा या दोन त्याच्या सीमान्त नद्या होत्या, म्हणून लोक गंडकींतील शाळिग्राम व नर्मदेंतील वाटोळे बाण घेअून त्यांची पूजा करीत. हे बौद्ध स्तूपांचे प्रतीक समजले जात. अेका पाश्चात्य विद्वानानें लिंगपूजेचा व शाळिग्रामपूजेचा शिश्नपूजा व योनिपूजा म्हणून भलताच अर्थ केलेला पाहून पारिसच्या प्रदर्शनाच्या वेळीं स्वामीजींनीं वरील अर्थ स्पष्ट केला होता.

गंगा नदी जेथून निघते तेथूनच दोहों बाजूंकडून लहान मोठे करभार घेत जाते. तिच्या मांडलिक नद्या बहुधा अुत्तरेकडील व डाव्या बाजूकडून येणाऱ्या असतात. चंबळ व शोण सोडल्यास अेकहि मोटी नदी दक्षिणेकडून अुत्तरेकडे जात नाहीं. गंगेच्या दक्षिणवाहिनी मांडलिक नद्यांपैकीं गंडकी बिहारचें पाणी गंगेसाठीं घेअून येते. बिहारची भूमि म्हणजे अनासक्तीचे आद्य प्रवर्तक सम्राट् जनक यांची कर्मभूमि, दयाधर्माचे महान् प्रचारक महावीर यांची तपोभूमि, अष्टांगिक मार्गाचे शोधक अथवा संशोधक बुद्ध भगवान् यांची विहार-भूमि ! हे सगळे धर्मसम्राट् याच नदीच्या तीरावर अहर्निश विहरत. त्यांच्या असंख्य साहाय्यकांनीं व अनुयायांनीं या नदींत स्नानपान केलें असेल. सीतामाअीनें बाळपणांत येथें कितीतरी जलक्रीडा केली असेल ! तीच ही गंडकी नदी मला आपल्या शैत्यपावनत्वानें कृतार्थ करो, असा संकल्प म्हणून मीं या नदींत स्नान केलें. नदीच्या पाण्याला कोठल्याहि प्रकारची घाअी नव्हती, तिला कसलाहि धिंगाणा घालावयाचा नव्हता. ती शांतपणें वाहत होती. जणूं काय माराला जिंकल्यावर भगवान बुद्धांनीं चालविलेलें अखंड ध्यानच !

## २०

# सागर सरितांचा संगम

लहानपणीं भोजराजा आणि कालिदास यांच्या गोष्टी मला वाचावयाला मिळाल्या होत्या. भोजराजा विचारतो, "ही नदी अितकी रडते कां?" नदीचें पाणी दगडावरून वाहत असेल अणि त्यामुळें आवाज होत असेल. पण राजाला वाटलें, कवीसमोर अेक कल्पना फेकूं द्या, म्हणून त्यानें वरील प्रश्न विचारला. लोककथेंतील कालिदास लोकमानसाला रुचेल असेंच अुत्तर द्यावयाचा. त्यानें सांगितलें "रडण्याचें कारण काय विचारतां? ही मुलगी माहेराहून सासरीं चालली आहे. मग रडणार नाहीं तर काय?"

त्या वेळीं मला वाटलें, "सासरीं जाणें आवडत नाहीं तर जावेंच कशाला?" कोणीं तरी अुत्तर दिलें, "मुलींचें जिणें सासरीं जाण्यासाठींच असतें."

नदी जेव्हां सागराला मिळते तेव्हां तिचें सगळें स्वरूप पालटून जातें. त्या प्रवाहाला नदी म्हणून ओळखणें कठीण पडतें. साताऱ्याजवळ माहुलीपाशीं कृष्णावेण्यांचा संगम मीं पाहिला होता आणि पुण्यांत मुळा-मुठांचा. पण सागर-सरितांचा संगम प्रथमच पाहिला तो कारवारला—अुत्तर बाजूस सूरूच्या बनाच्या टोंकाला. आम्ही दोघे भाअू समुद्रकिनाऱ्यावरून वाळूंत खेळत खेळत, फिरत फिरत पुढें जात होतों. रोजच्यापेक्षां खूप दूर गेलों आणि अकस्मात् अेक सुंदर नदी समुद्राला येअून मिळतांना पाहिली. दोन नद्यांच्या संगमापेक्षां नदी-समुद्रांचा संगम अधिक काव्यमय असतो. दोन नद्यांच्या संगमाचा आनंद गूढ, शांत असतो; पण सागरसरिता भेटतात तेव्हां दोहोंतहि केवळ अुन्मादच दिसून येतो. आणि या अुन्मादाची धुंदी आपणांसहि अचूक चढतेच. नदीचें पाणी शांत आग्रहानें समुद्राकडे वाहत असतें. अिकडे आपली मर्यादा कधींच न सोडल्याविषयीं नांवाज-लेल्या समुद्राचें पाणी चंद्राच्या चिथावणीनें घटकेंत नदीला वाट करून देतें, तर घटकेंत टक्कर देतें. नदी व सागर यांचा अेकमेकाविरुद्ध सत्याग्रह चालत असतांना अनेक प्रकारचीं दृश्यें पाहावयाला मिळतात. समुद्राच्या लाटा नदीच्या पाण्याला तिरक्या कापीत जाअूं लागल्या म्हणजे पाण्याचा

अेक फवारा अेका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत धावत जातें. कांहीं कांहीं ठिकाणीं पाणी गोल गोल फिरून भोंवरे निर्माण करतें. सागराचा जोर वाढतांच नदीचें पाणी मागें हटत जातें. दोन्ही बाजूंच्या कांठावर या फुगणाऱ्या पाण्याचा मारा फार जोराचा असतो. नदीच्या गतीची विपरीत दशा पाहतांच त्याचा फायदा घेणाऱ्या मतलबी होड्या वेगानें नदीप्रवाहांत आंतवर घुसतात. त्यांना ठाअूक असतें कीं, या भाग्याच्या भरतीबरोबर जितकें आंत जातां येअील तितकें खरें. आणि मग जेव्हां ओहोटी सुरू होते आणि सागराच्या लाटा आपला विरोध सोडून बाहू पसरून नदीच्या पाण्याचें स्वागत करतात, तेव्हां मतलबी होड्यांना पगडी फिरविण्यास अुशीर लागत नाहीं ! वारा वाटेल त्या दिशेला कां वाहीना, जोंपर्यंत तो समोरूनच अुलटा वाहत नाहीं तोंपर्यंत त्यांतून कोणताना कोणता तरी फायदा अुकळण्याची युक्ति या वैश्यवृत्ति होड्यांत असतेच. त्यांच्या पगडीची अर्थात् शिडांची रचनाच अशा प्रकारची केलेली असते.

आम्ही गेलों तेव्हां होड्या अशाच रीतीनें नदींत प्रवेश करीत होत्या. पण या समुद्रांतील फुलपांखरांना पाहत राहण्यांत आम्हांला गोडी वाटत नव्हती. संगमाच्या जोडीला सूर्यास्त कसा शोभून दिसतो तें पाहण्यांत आम्ही गढून गेलों होतों. सोनेरी रंग सर्वत्र शोभतो; पण हिरव्या रंगाबरोबर त्याची बादशाही शोभा कांहीं विशेषच दिसते. अुंच अुंच झाडांवर जेव्हां संध्येचे सुवर्णकिरण आरोहण करतात, तेव्हां ही मानवी सृष्टि नसून पऱ्यांची—अप्सरांची—सृष्टि आहे असा भास होतो. समुद्र तर जणूं कांचनरसाचें सरोवर तळपत असावें तसा शोभूं लागतो ! आम्ही ही शोभा पाहून संतृप्त झालों; अथवा खरें सांगावयाचें म्हणजे जसजशी ही शोभा पाहत राहिलों तसतसें हृदय अधिकाधिक अस्वस्थ होत गेलें. सौंदर्यपान करतां करतां आम्ही गुदमरून गेलों !

सूर्यास्तानंतर हेच रंग ओसरले आणि सौम्य होअूं लागले. आम्हीहि भानावर आलों आणि मागें फिरण्याचा विचार केला. पण भरती वाढल्यानें मागें जाण्याची सोय नव्हती. म्हणून आम्ही नदीच्या कांठाकांठानें वर चढलों. तेथें नदीचें पाणी दोन्ही अंगांस फुगत होतें—जशी काय रेड्यावरील पखाल ! आम्ही जसजसें वर चाललों तसतसें पाणी अधिक शान्त दिसूं लागलें. काळोखहि

वाढत होता. या कांठाकडून त्या कांठाकडे जा-ये करणारें अेक होडकें कोपऱ्यांत पडलें होतें; आणि खेड्यांतील कित्येक मजूर लंगोटीच्या दोरींत मागल्या बाजूस अेक लांकडी चक्र ओंवून त्यांत आपला कोयता टांगून चालले होते. या लोकांचा पेहराव म्हणजे अेक लंगोटी व अेक जाकीट. नदीपार जावयाचें असेल तेव्हां जाकीट काढून डोक्यावर घेतलें की झालें काम. निसर्गाचीं मुलें तीं! त्यांना जमीन व पाणी सारखींच!

घरीं जावयाची तांतडी केवळ आम्हांलाच नव्हती. या खेडवळांनाहि घाओी असल्याचें दिसत होतें. आणि नदीच्या कांठीं धावणाऱ्या लहान लहान लेंकड्यांना सुद्धां आमच्या अितकीच घाओी झाली होती! रात्र पडली आणि आम्ही लगबगीनें घरीं आलों. पण मनांत विचार आल्यावांचून राहिला नाहीं कीं, कधीं तरी या नदीच्या कांठाकांठानें वर दूरवर गेलें पाहिजे. हातांत कांदा किंवा कोबी येतांच त्याचे सर्व पापुदरे अुकलून पाहण्याची जशी अचूक अिच्छा होते, तसेंच नदी पाहतांच अुगमाकडे जाण्याचें माणसाच्या मनांत येतें. अुगमाचा शोध हा सनातन शोध आहे. अशाच रीतीनें गंगोत्री, जम्नोत्री व महाबळेश्वर किंवा त्र्यंबक यांचा शोध लागला आहे.

## २१

# यमुनाराणी

हिमालय म्हणजे भव्यतेचें भंडार! सर्वत्र भव्यपणाचें प्रदर्शन करून भव्यतेची भव्यता कमी करणें हाच जणूं त्याचा व्यवसाय आहे. तरी सुद्धां अशा हिमालयांतहि अेक स्थळ असें आहे कीं, ज्याची अूर्जस्विता हिमालयांत वास करणाऱ्यांचा सुद्धां डोळ्यांत भरते. तें स्थळ म्हणजे यमराजाच्या भगिनीचें अुगमस्थान होय. अुंचीवरून बर्फ वितळून मोठा धबधबा खालीं पडत आहे; आसमंतात् गगनचुंबी नव्हे, तर गगनभेदी जरठ महावृक्ष आडवे पडून कुजत आहेत; अुत्तुंग पहाड यमदूतांप्रमाणें रक्षण करण्यास अुभे आहेत; घटकेंत पाणी थिजून त्याचें बर्फ होत आहे आणि घटकेंत बर्फ वितळून त्याचें बर्फाअितकेंच थंड पाणी होत आहे; अशा ठिकाणीं भुअींतून

विलक्षण रीतीनें अुकळणारें पाणी अुसळून वर येतें. बाष्पयंत्रांतून क्रुद्ध झालेली वाफ बाहेर पडत असतांना व्हावा तसा शब्द भुअींतून निघतो आणि झऱ्यांतून पुरुषभर अुंच अुडणारे मोठमोठे तुषार अशा थंडींत सुद्धां माणसाला भाजून काढतात! अशा चमत्कृतिजनक ठिकाणीं असित ऋषीनें यमुनेचें मूळ शोधून काढलें. या स्थळीं प्रवाहांत स्नान करणें अशक्यप्रायच आहे. गार पाण्यानें आंघोळ करावी तर सदैवच गार होअून जाण्याची भीति आणि अुन पाण्यांत आंघोळ करावी तर तेथेंच बटाट्याप्रमाणें अुकडलें जाण्याचा संभव! अेवढ्याचसाटीं येथें मिश्र पाण्याचीं कुंडें तयार केलीं आहेत. अेका झऱ्यावर अेक गुंफा आहे. तींत लाकडांच्या फळ्या टाकून झोपतां येतें. मात्र रात्रभर मधून मधून कूस बदलली पाहिजे. कारण, वरची थंडी व खालची अुष्णता दोन्ही असह्य!

दोघी बहिणींत गंगेपेक्षां यमुना मोठी आहे, प्रौढ व गंभीर आहे. कृष्णभगिनी द्रौपदीप्रमाणें ती सांवळी, तशीच मानिनी आहे. गंगा जणूं काय गरीब बिचारी मुग्ध शकुंतलाच! पण देवाधिदेव महादेवांनीं तिचा स्वीकार केला म्हणून यमुनेनें आपलें वडीलपण सोडून गंगेलाच ज्येष्ठत्व दिलें. या दोघी बहिणी अेकमेकींना भेटावयास आतुर झालेल्या दिसतात. हिमालयांत तर अेका स्थळीं त्या फार जवळ येतात. पण मत्सरी दंडाल-पर्वत विघ्नसंतोष्यासारखा मध्येंच आडवा येअून पडल्यामुळें त्यांचें तेथें मीलन होत नाहीं. अेक सहृदय ऋषि यमुनाकांठीं राहत असे आणि प्रत्यहीं गंगास्नानास जात असे; पण जेवीत होता पुनः यमुनेच्याच घरीं येअून! तो म्हातारा झाला—ऋषीसुद्धां शेवटीं म्हातारे होतात!—तेव्हां त्याच्या थकलेल्या पायांची कींव करून गंगेनें आपला प्रतिनिधि म्हणून अेक ल्हानसा झरा यमुनाकांठीं पाठवून दिला. आजहि हा चिमुकला धवल प्रवाह या ऋषीचें स्मरण करीत वाहत आहे.

डेहराडूनजवळ आपणाला पुनः आशा वाटते कीं, या दोन नद्या अेकमेकींस मिळतील. पण नाहीं. आपल्या शैत्यपावनत्वानें अखिल अंत-र्वेदीचा* प्रदेश पुनीत करण्याचें कर्तव्य पार पाडण्यापूर्वीं त्यांना अेकमेकींना

* (१) गंगा व यमुना या दोन नद्यांच्या मधील प्रदेशाचें प्राचीन नांव; लाक्षणिक अर्थानें (२) संगम पावणाऱ्या कोणत्याहि दोन नद्यांमधील प्रदेश, दोआब.

३।३।५३ ४७

भेटून रिकामपणच्या गुजगोष्टी करण्याचें सुचावेंच कसें ? गंगा ही अुत्तरकाशी, टेहरी, श्रीनगर, हरद्वार, कनोज, ब्रह्मावर्त, कानपूर अित्यादि जुन्या व अितिहासप्रसिद्ध स्थळांना स्तन्यदान करीत धावते, तर यमुना कुरुक्षेत्राला व पानीपतच्या हिंसक भूप्रदेशाला न्याहाळीत भारतवर्षाच्या राजधानीजवळ येअून पोंचते. यमुनेच्या पाण्यांत साम्राज्याची शक्ति असली पाहिजे. तिच्या स्मरणसंग्रहालयांत पांडवांपासून मोंगल साम्राज्यापर्यंतचा आणि बंडाच्या काळापासून तों स्वामी श्रद्धानंदजींच्या हत्येपर्यंतचा सारा अितिहास भरलेला आहे. दिल्लीपासून आग्र्यापर्यंत बाबरचे वंशजच आपल्याबरोबर वार्तालाप करूं अिच्छितात असें वाटतें. दोन्ही नगरांचे किल्ले साम्राज्याच्या रक्षणासाठीं नव्हे, तर यमुनेची शोभा पाहाण्यासाठींच बांधले असावेत असें भासतें. मोंगल साम्राज्याचे नगारे आतां शांत झाले आहेत, पण मथुरा–वृंदावनांतील मुरली अद्यापि वाजत आहे ! यमुनाकांठच्या मथुरा–वृंदावनांची शोभा कांहीं वेगळीच आहे. हा प्रदेश जितका रमणीय तितकाच समृद्ध आहे. हरियाणी प्रदेशांतील गाअी आपल्या गोड, सकस दुधाविषयीं हिंदुस्थानांत विख्यात आहेत. यशोदामाता किंवा गोपराज नंद यांनीं हें स्थळ पसंत केलें होतें, ही गोष्ट जणूं काय अिथली भूमि विसरूंच शकत नाहीं. मथुरा–वृंदावन म्हणजे बाळकृष्णाची क्रीडाभूमि, वीरकृष्णाची विक्रमभूमि. अेक द्वारकावास सोडून दिला तर श्रीकृष्णाच्या जीवनाशीं जास्तींत जास्त सहकार कालिंदीनेंच केला आहे. ज्या यमुनेनें कालियामर्दन पाहिलें त्याच यमुनेनें कंसाचा शिरच्छेद बघितला. ज्या यमुनेनें हस्तिनापुराच्या राजसभेंत श्रीकृष्णाची शिष्टाअी अैकली त्याच यमुनेनें युद्धकुशल श्रीकृष्णाची योगमूर्ति कुरुक्षेत्रावर संचार करीत असतांना पाहिली. ज्या यमुनेनें वृंदावनाच्या प्रणयबासरीशीं आपला कलरव मिळविला त्याच यमुनेनें कुरुक्षेत्रावर रोमहर्षण गीतावाणीला पडसाद दिला. यमराजाच्या भगिनीचें बंधुत्व श्रीकृष्णालाच शोभतें.

भारतवर्षांतील क्षत्रिय कुलांचा संहार अनेक वेळां जिनें पाहिला त्या यमुनेला पारिजातकाच्या फुलाप्रमाणें सुकुमार अशा ताजबिबीचा मृत्यु कितीसा मर्मभेदक वाटणार ? तरीसुद्धां प्रेमसम्राट् शहाजहांच्या थिजलेल्या अश्रूंना प्रतिबिंबित करीत राहण्याचें कार्य तिनें स्वीकारिलें आहे.

भारतकाळीं विख्यात झालेल्या वैदिक नदी चर्मण्वतीचा करभार घेऊन यमुना पुढें चालूं लागते तोंच मध्ययुगीन अितिहासाचें ओझरतें दर्शन देत चिमुकली सिंधू नदी पुढें येअून अुभी राहते.

येथून यमुना अुतावळी झाली आहे. कितीतरी दिवस झाले, गंगाताअीचें दर्शन नाहीं. सांठत गेलेल्या गोष्टी आतां पोटांत मावत नाहींत. कितीतरी विचारायाचे प्रश्न सांचून राहिले आहेत. कानपूर आणि काल्पी फारशीं दूर नाहींत. येथें गंगेची वार्ता कानीं पडली. त्या आनंदांतच खडीसाखरेचा खडा तोंडांत टाकून यमुना जी धावत सुटली ती प्रयागराज येथें अेकदम गंगेच्या गळ्यांत जाअून पडली. काय दोघींचा अुन्माद! भेटल्या तरी आपण भेटलों हें त्यांना जणूं खरेंच वाटेना. भारतवर्षांतील अेकूणअेक साधुसंत हा प्रेमसंगम पाहण्यास गोळा झाले आहेत; पण त्या बहिणींना त्याचें भानच नाहीं! अंगणांत अक्षयवट* अुभा आहे त्याची त्यांना दखल नाहीं. वृद्ध अकबर छावणी × ठोकून पडला आहे त्याला विचारतो कोण? आणि अशोकाचा शिलास्तंभ+ तेथें आणून अुभा केलांत तरी या बहिणी थोड्याच त्याच्याकडे दृष्टिक्षेप करणार आहेत?

त्यांच्या प्रेमाचा प्रवाह अखंड वाहतच असतो; आणि त्याचबरोबर कविसम्राट् कालिदासाची सरस्वती अखंड स्रवत असते!

**क्वचित्प्रभालेपिभिरिन्द्रनीलैर् मुक्तामयी यष्टिरिवानुविद्धा ।**
**अन्यत्र माला सितपंकजानाम् अिन्दीवरैरुत्खचितान्तरेव ॥**
**क्वचित् खगानां प्रियमानसानां कादंबसंसर्गवतीव पंक्तिः ।**
**अन्यत्र कालागरुदत्तपत्रा भक्तिर्भुवश्चन्दनकल्पितेव ॥**

---

* प्रयाग येथें त्रिवेणीसंगमावर अकबर बादशाहानें बांधलेला किल्ला आहे. या किल्ल्याच्या भुयारांत अेका प्रचंड जुन्या वटवृक्षाचें नुसतें खोडच अुभें असून त्याच्या शाखा बोधिगयेंत आहेत अशी समजूत आहे.


× संगमावर अकबरानें बांधलेला किल्ला.

+ याच किल्ल्यांत अेके ठिकाणीं बौद्धधर्मी सम्राट् अशोक याचा अेक शिलास्तंभ असून त्यावर अशोकाची धर्मलिपि कोरलेली आहे. समुद्रगुप्ताचा राजकवि हरिषेण यानें लिहिलेले कित्येक श्लोकहि याच स्तंभावर कोरलेले आहेत.

क्वचित् प्रभा चान्द्रमसी तमोभिः छायाविलीनैः शबलीकृतेव ।
अन्यत्र शुभ्रा शरदभ्रलेखा रन्ध्रेष्विवालक्ष्यनभःप्रदेशा ॥
क्वचिच्च कृष्णोरगभूषणेव भस्मांगरागा तनुरीश्वरस्य ।
पश्यानवद्यांगि ! विभाति गंगा भिन्नप्रवाहा यमुनातरंगैः ॥

[ हे निर्दोषतनु सीते ! या गंगेच्या प्रवाहांत यमुनेचे तरंग घुसून त्याला खंडित करीत आहेत, तें कसें दिसतें पाहा ! कोठें असें भासतें कीं, जणूं मोत्यांच्या माळेंत ओंवलेले अिंद्रनीलमणि त्यांच्या प्रभेला निस्तेज करून टाकीत आहेत. कोठें असें वाटतें कीं, जणूं श्वेतकमलांच्या हारांत नीलकमलें गुंफिलीं आहेत. कोठें मानस-सरोवराकडे जाणाऱ्या शुभ्र हंसां-बरोबर काळे कादंब पक्षी अुडत आहेतसें वाटतें, तर कोठें शुभ्र चंदनानें सारविलेल्या भूमीवर कृष्णागरूचीं चित्रें काढिलीं आहेत असें दिसतें. कोठें असें वाटतें कीं, चंद्राच्या प्रभेबरोबर छायेंत झोंपलेल्या अंधकाराची क्रीडा चालली आहे, तर कोठें जणूं शरदृतूंतील शुभ्र मेघांच्या पाठीमागून आकाश थोडथोडें दिसत आहे. आणि कोठें असें दिसतें कीं जणूं काय महादेवाच्या भस्मचर्चित देहावर कृष्णसर्पांचीं आभूषणें धारण केलीं गेलीं आहेत. ]

किती सुंदर देखावा ! वर पुष्पक विमानांत मेघश्याम रामचंद्र आणि धवलशीला जानकी चौदा वर्षांच्या वियोगानंतर अयोध्येंत पोहोंचण्यास आतुर झालीं आहेत; आणि खालीं अिन्दीवरश्यामा कालिन्दी व सुधाजला जाह्नवी अेकमेकींचा परिरंभ न मोडतां नामरूपांचा त्याग करून सागरांत विलीन होण्यास धावत आहेत ! हें दृश्य पाहून स्वर्गांतून पुष्पवृष्टि झाली असेल आणि भूतलावर कवींच्या प्रतिभासृष्टीचीं कारंजीं अुडालीं असतील !



# तावी

ऐखाद्या नदीविषयीं सांगण्यासारखें कांहींच नसलें म्हणून काय झालें ? तींत स्नान केल्याचा आनंद थोडाच कमी होणार आहे ? नदीचा महिमा स्वतःसिद्ध आहे. तिच्या नांवाला कांहीं थोडा अितिहास चिकटला असला तर तें त्या अितिहासाचें भाग्य ! नदीला काय त्याचें ? अितिहासाला विग्रहांची अधिक गोडी वाटते, तर नदीचें कार्य संधीचें असतें. असंख्य शेतकरी, पांथस्थ, पशु व पक्षी यांना आपल्या जलानें संतुष्ट करणारी नदी वाहते तेव्हां ती 'आत्मरति', 'आत्मक्रीड' व 'आत्मन्येव च संतुष्टा' अशी दिसते. नदीला जर म्हटलें कीं, 'तुझा अितिहास सांग.' तर ती सांगेल, "मी पर्वताची कन्या आहें, असंख्य मानव व तिर्यक् प्राण्यांची मी माता आहें. मी समुद्राची सेवा करतें आणि आकाशांतील मेघ हाच माझा स्वर्ग आहे. अितका अितिहास माझ्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे; बाकी तुम्हां वेड्यांचा अितिहास तुम्हांला टाअूक. वैर आणि वेड यांचा अितिहास काय लिहावयाचा असतो ? त्या सार्‍या विसरण्याच्या गोष्टी असतात. वैराचें विष सदैव राखून ठेवण्यासाठीं अितिहास लिहितां काय ? त्याला पुरून टाका किंवा धुअून टाका. सेवेचा अितिहास तेवढाच खरा अितिहास."

काश्मीरचा प्रवास संपवून आम्ही जम्मूला आलों आणि रघुनाथजीच्या देवळांत वसति केली. जवळच तावी वाहत होती. जम्मूच्या अंगाला तावीचा कांठ बराच अुंच आहे. पुष्कळशा नद्या असतात तशी तावी ही अेक आहे. तिच्यांत असाधारण असें कांहींच नाहीं. अिंजिनियर दाणींनीं सांगितलें कीं, "तावीवर विजेचीं यंत्रें बसविलीं आहेत. या विजेच्या योगानें पुष्कळ काम होण्यासारखें आहे." पण तावीला त्याचें काय ? ती आपली वाहतच असते.

क्र. नं. १५३

# स्तन्यदायिनी चिनाब

काश्मीरहून परत फिरतेवेळीं पाय अुचलत नाहीं. जातेवेळीं जो अुत्साह असतो तो मागें फिरतांना कोठून असणार? ही अडचण टाळण्यासाठीं जातेवेळीं जो मार्ग धरला होता तो सोडून पीर पुंजालचा डोंगर ओलांडून जम्मूच्या मार्गानें आम्ही परतत होतों. श्रीनगरहून जम्मूला गाडीरस्ता नाहीं. हिंमत असेल तर पायीं चालावें, नाहीं तर काश्मिरी तट्टावर स्वार व्हावें. वाटेंत निसर्गाचें सौंदर्य व जहांगीरची विलासप्रियता यांचा अनुभव पावलोंपावलीं येतो. जिकडे पाहावें तिकडे जलाशय बांधलेले, डोंगरांत रस्ते तयार केलेले. आज सिमल्याचा जो लौकिक आहे तोच किंवा त्याहूनहि अधिक जहांगीरच्या वेळीं श्रीनगरचा होता. अशा बादशाही डोंगरी रस्त्यानें परत येत असतां आम्हांला भगवती चंद्रभागेचें दर्शन झालें होतें. लोक आज तिला 'चिनाव' या नांवानें ओळखतात.

मीं चुकत नसेन तर, मला वाटतें आम्ही रामबनच्या आसमंतात् कोठेंसे होतों. सारा दिवस व सारी रात्र चालावयाचें होतें. चांदणें सुरेख पडलें होतें. अगदीं थकूनभागून गेल्यामुळें आम्हीं झिंगलेल्या माणसासारखे रस्त्यावरून अडखळत चालत होतों. तळपायांना फोड आले होते; गुडघ्यांत कळा येत होत्या; आणि निराश झालेल्या निद्रेचें रूपांतर अर्धवट गुंगींत झालें होतें. निद्रा सुखावह असली तरी तन्द्रा तशी नसते.

अशा स्थितींत चालत असतां रस्त्याच्या अुजव्या अंगास खोल दरींतून गंभीर ध्वनि अैकूं आला. समोरच्या टेकडीवरून कमान खाअून आलेला वारा शीतल-सुरभि भासूं लागला. गुंगी अुडाली, अंगांत प्राण संचरला, आणि दृष्टि या कलरवाचें मूळ शोधूं लागली. किती मनोहर तें दृश्य! वरून दुधासारख्या चांदण्याची वृष्टि होत आहे, खालून चंद्रभागेचें पाणी दगडांवर आपटून पांढरा शुभ्र फेंस अुसळत आहे, आणि त्याचा आस्वाद घेअून तृप्त झालेला वायु तिथल्या शीतलपणाचा आम्हाला अनुभव देत आहे.

बरोबरच्या अेका माणसाला विचारलें, "ही नदी आहे कीं पहाडी प्रवाह आहे?" त्यानें सांगितलें, "दोन्ही. आपली चिनाबमैया आहे ती." मीं नमस्कार केला. खालीं अुतरणें शक्यच नव्हतें. दुरून दर्शन घेअूनच पावन झालों, नमस्कार करून कृतार्थ झालों आणि पुढें चाललों.

काय हीच ती वेदकालीन भगवती चंद्रभागा? कितीतरी ऋषींनीं आपली ध्यानधारणा व आपल्या गाअी येथें पुष्ट केल्या असतील! आणि आज सुद्धां अुदमी लोक या नदीमातेचें दोहन थोडेथोडकें करीत नाहींत. माझ्या जीवनाच्या स्मृतीचा ज्या काळापासून प्रारंभ होतो त्याच काळांत पहाडासारखे पंजाबी लोक या नदीच्या कांठीं कालवे खोदीत होते. आज २५ लाख अेकर जमीन या मातेच्या दुधापासून रस-कस प्राप्त करून घेत आहे आणि पंजाबी वीरांचें पोषण करीत आहे. वेदकालीन चिनाबचें सत्त्व आर्यांचा अुत्कर्ष करण्यास कारणीभूत होत असे. रणजितसिंगाच्या कालांत याच पाण्यांतून "वाह गुरुकी फतेह"चा जयघोष निघत असे. आजचा रंग हा कांहीं शेवटचा नाहीं. चिनाबचें पाणी अगदींच निःसत्त्व झालेलें नाहीं. पांच नद्यांची प्रतिष्ठा पुनः जागृत होअील आणि आणि सप्त-सिंधूंचा प्रदेश भारतवर्षाला भाग्याचे दिवस दाखवील.

## २४

## नेपाळची गंगा

जशी काश्मीरची दूधगंगा तशी नेपाळची वागमती किंवा वाघमती. अेवढ्या छोट्या नदीकडे कोणाचें लक्षहि जाणार नाहीं. पण वागमतीनें असें अेक अितिहासप्रसिद्ध स्थळ आपलेंसें केलें आहे कीं, तिचें नांव लाखों लोकांच्या तोंडीं झालें आहे. नेपाळची अुपत्यका म्हणजे अठरा कोसांचा घेर असलेलें व चोहों बाजूंस पर्वतांनीं रक्षण केलेलें रमणीय असें लंबवर्तुळ मैदान. दक्षिणेस फरपिंगनारायण त्याचें रक्षण करतो, तर अुत्तरेस गौरीशंकराच्या छायेखालीं असलेला चंगूनारायण त्याची राखण करतो. पूर्वेस विशंगूनारायण व पश्चिमेस अिचंगू.

हिमालयाच्या मांडीवर बसलेल्या स्वतंत्र हिंदु राज्याच्या या प्रदेशांत तीन अंडीं घातल्याप्रमाणें तीन राजधान्या आहेत. सर्वांत जुनी राजधानी पट्टन, त्यानंतरची भादगांव आणि सध्यांची काठमांडु अथवा काष्ठमंडप. नेपाळांतील देवळांची बांधणी हिंदुस्थानांतील अितर ठिकाणच्या बांधणी-सारखी नसते. देवळावरून पागोळ्या जेथें गळतात तेथेंच पाणपट्टीला नेपाळी लोक लहान लहान घंटा टांगतात; आणि मध्यें लोंबणाऱ्या लोलकाला पातळ पितळी पत्र्याचीं पिंपळपानें बसवितात. वाऱ्याची झुळूक आली कीं कसें नाचावें तें पिंपळपानाला शिकवावें लागत नाहीं. यामुळें अेकाच वेळीं पुष्कळ घंटा किणकिण निनाद करूं लागतात ! ह्या मंजुळ ध्वनीनें देवळांतील शांतीचा भंग होत नाहीं. अुलट तो शांतीला अधिक स्पष्ट व मुखरित करतो. भादगांवच्या कित्येक मूर्ति तर शिल्पकलेचे अुत्कृष्ट आदर्श आहेत. शिल्पशास्त्राचे सगळे नियम पाळूनहि कलावंत आपल्या प्रतिभेला किती मोकळीक देअू शकतो याचें अुदाहरण पाहावयाचें असेल तर या मूर्ति पाहाव्यात. मात्र कला ही अतिमानुषीच असली पाहिजे, असें येथील मूर्तिकारांचें मत असावेंसें वाटतें. शेतांत दूरवर भव्याकृति स्तूप समाधिसुख अनुभवीत असल्याप्रमाणें बसलेले दिसतात, आणि काठमांडु म्हणजे आजच्या नेपाळी राज्याचें वैभव.

नेपाळांत प्रवेश करण्यास सहजासहजीं परवानगी मिळत नाहीं; आणि म्हणूनच पडद्यामागें काय आहे, अवगुंठनाच्या आंत कसल्या प्रकारचें सौंदर्य लपून आहे तें समजून घेण्याची जशी स्वाभाविकपणेंच अुत्सुकता अुत्पन्न होते, तशीच नेपाळच्या संबंधांतहि वाटते. आठ दिवस राहावयाला मिळाले, पाहावयाचें असेल तें अेवढ्यांत पाहून घ्या, अेकदां परत फिरल्यावर पुनः यावयाला मिळावयाचें नाहीं, अशा मनःस्थितींत जिकडेतिकडे काव्यच दिसतें.

पशुपतिनाथाचें मंदिर काठमांडूपासून दूर नाहीं. लहानमोठ्या अनेक मंदिरांच्या कळपांत जणूं काय अेखादा मोठा पोळच बसला आहे असें तें दिसतें. जवळच वागमती वाहत आहे. रेताड मातींतून हें पाणी येत असतें म्हणूनच पाणी अेवढें गढूळ दिसतें. त्यांत पोहोवेंसें वाटतें खरें, पण पाणी तितकें खोल असेल तर ना ! हा प्रवाह गुह्येश्वरी व पशुपतिनाथ यांच्यामधून वाहतो, म्हणूनच त्याचा अेवढा महिमा !

पशुपतिनाथाहून सरळ पश्चिमेला शिंगुभगवानाचें दर्शन घेण्यास आम्ही गेलों. रस्त्यांत भेटली वागमतीची बहीण विष्णुमती. ह्या नदीवर जिकडेतिकडे पूल पसरलेले होते. पूल म्हणजे काय? नदीच्या पात्रावर पाण्यापासून अेक हात अुंचीवर लाकडाच्या वीत वीत रुंदीच्या फळ्या. समोरून अेखादा मनुष्य आपल्यापुढें आला तर वीतभर रुंदीच्या पुलावरून दोघांनीं कसें जावयाचें? दोघांपैकीं अेकानें पाण्यांत अुतरलें पाहिजे. कित्येक ठिकाणीं पाणी बरेंच खोल आहे. त्यांत मनुष्य चांगला गुडघ्यापर्यंत भिजतो!

शिंगुभगवानाच्या पायथ्याशीं भगवान् बुद्धाची अेक मोठी मूर्ति अुन्हातान्हांत तप करीत आहे. टेकडीवर अेक देअूळ आहे. त्यांत तीन मूर्ति आहेत. अेक बुद्धभगवानाची, दुसरी धर्मभगवानाची व तिसरी संघभगवानाची. प्रत्येक मूर्तीसमोर तुपाचा दिवा जळत असतो. अेका कोपऱ्यांत "ॐ मामे पामे हुम्" (ॐ मणिपद्मेऽहम्) चा पवित्र मंत्र ज्यावर अनेकदां कोरलेला आहे असें अेक पितळेचें नळकांडें लांकडाच्या चौकटींत अुभें करून ठेविलें आहे. अेक मूठ फिरविली कीं नळकांडें गर गर फिरूं लागतें. प्रत्येक फेऱ्याबरोबर त्यावर जितक्या वेळां मंत्र लिहिला असेल तितक्या वेळां मंत्र जपल्याचें पुण्य आपोआपच तुम्हांला मिळेल याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं! तथागताला स्वतःच्या संदेशाचें हें स्वरूप पाहण्यास सांपडलें नाहीं हें त्याचें दुर्भाग्य, दुसरें काय? याच देवळासमोर पितळेचें बनविलेलें अिंद्राचें वज्र अेका चबुतऱ्यावर ठेवलें आहे. भगिनी निवेदितांना या वज्राचा आकार फारच आवडला होता. भारतवर्षाच्या राष्ट्रध्वजावर हें वज्र काढावें अशी सूचना त्यांनीं केली होती.

वागमतीच्या तीरावर भात, गहूं, मका व अुडीद यांचें मोठें पीक येतें. तूर तेथें पिकतच नाहीं. त्या लोकांनीं प्रयत्न करून पाहिला कीं नाहीं तें माहीत नाहीं. कापसाचें पीक करण्याची खटपट अलीकडे तेथें चालू झाली आहे. वागमती ही नेपाळी लोकांची गंगा आहे, गोरक्षनाथ हा त्यांचा पिता आहे.

# २५

# दक्षिणगंगा गोदावरी

लहानपणीं सकाळीं अुठून आम्ही भूपाळ्या गात असूं. त्यांतील चार ओळी अजून स्मरणांत राहिल्या आहेत:—

"अुठोनिया प्रातःकाळीं । वदनीं वदा चंद्रमौळी ॥
श्रीबिंदुमाधवाजवळीं । स्नान करा गंगेचें ॥
स्नान करा गोदेचें ॥ ध्रु० ॥

* * *

कृष्णा वेण्या तुंगभद्रा । शरयू कालिंदी नर्मदा ॥
भीमा भामा मुख्य गोदा । करा स्नान गंगेचें ॥"

गंगा व गोदा अेकच आहेत. दोघींच्या माहात्म्यांत थोडासुद्धां भेद नाहीं. भेद असला तर अेवढाच कीं, कलिकाळांत वाढत्या पापामुळें गंगेचें माहात्म्य कमी होअू शकेल, गोदावरीचें मात्र केव्हांहि कमी होणार नाहीं. रामचंद्रांचे अतिशय सुखाचे दिवस या गोदावरीच्या कांठींच गेले होते; आणि आयुष्यांतील दारुण आघातहि त्यांच्यावर येथेंच झाला होता. गोदावरी म्हणजे दक्षिणगंगा.

कृष्णा व गोदावरी या दोन नद्यांनीं दोन महाप्रजांना पोसलें आहे. महाराष्ट्राचें स्वराज्य व आंध्राचें साम्राज्य या दोन नद्यांमुळेंच भरभराटलें असें म्हटल्यास त्यांत तिळमात्र अतिशयोक्ति होणार नाहीं. साम्राज्यें अुभारलीं गेलीं आणि भंगलीं; महाप्रजा अुन्नतीस चढल्या आणि पडल्या; पण या अैतिहासिक भूमींत या दोन नद्या भूतकालाच्या गौरवशाली अितिहासाच्या जशा साक्षी आहेत तशाच त्या भविष्यकालीन महान् आशांच्याहि प्रेरक आहेत. त्यांतहि गोदावरीचें माहात्म्य कांहीं वेगळेंच आहे. ती जितकी सलिलसमृद्ध आहे तितकीच अितिहाससमृद्धहि आहे. श्रीकृष्णाच्या जीवनांत ज्याप्रमाणें जिकडे पाहावें तिकडे विविधताच भरलेली दिसून येते आणि अेकसारखा अुत्कर्षच दिसून येतो, त्याचप्रमाणें गोदावरीच्या अतिदीर्घ प्रवाहाच्या

कांठींहि सृष्टिसौंदर्याची विविधता व विपुलता भरलेली आहे. ब्रह्मदेवाच्या अेका कल्पनेंतून जसा सृष्टीचा विस्तार झाला, वाल्मीकीच्या अेका करूण भावनेंतून जशी रामायणी सृष्टी विस्तार पावली, त्याचप्रमाणें त्र्यंबकच्या डोंगरांतील भेगेंतून स्रवणाऱ्या गोदावरींतूनच पुढें राजमहेंद्रीचा विशाल जलराशि विस्तार पावला आहे. सिंधु व ब्रह्मपुत्रा यांनीं हिमालयास विळखा घातला, नर्मदा व तापी यांनीं विंध्यसातपुड्यांना द्रव आणला, त्याप्रमाणें गोदावरी व कृष्णा यांना दक्षिणेच्या अुन्नत प्रदेशाला भिजवून त्याला धनधान्यांनीं समृद्ध करण्याची बुद्धि सुचली. सह्याद्रि पक्षपात करून पश्चिमेकडे झुकला तें न रुचल्यामुळेंच जणूं काय त्याला पूर्वेकडे ओढण्याचा सतत प्रयत्न या दोन नद्या करीत असतात असे वाटतें. या दोन्ही नद्यांचा अुगम पश्चिम समुद्राहून पन्नासपाअुणशें मैलांपेक्षां अधिक दूर नाहीं, तरीसुद्धां दोघी आठनअुशें मैलांचा प्रवास करून आपला जलभार किंवा करभार पूर्वसमुद्रालाच अर्पण करतात. आणि हा करभार कांहीं थोडाथोडका नाहीं. त्यांत अखिल महाराष्ट्र देश येतो, हैदराबाद व म्हैसूर राज्यांचा त्यांत अंतर्भाव होतो, आणि आंध्रदेश तर सगळ्याचा सगळाच त्यांत समाविष्ट होतो. मिश्र संस्कृतीची माता नाअील नदी गोदावरीच्या पासंगालाहि पुरणार नाहीं.

त्र्यंबकजवळ पर्वताच्या अेका मोठ्या कपारींतून गोदेचा अुगम होतो. त्र्यंबकपासून जी चढण लागते ती गोदामाअीच्या मूर्तीच्या चरणांपर्यंत चालूच असते. तेथून वर जाण्यास डाव्या बाजूला अवघड पायऱ्या बांधल्या आहेत, आणि त्यानंतर मनुष्य ब्रह्मगिरीपर्यंत पोचूं शकतो. पण तें जगच निराळें. गोदावरीच्या अुगमाकडून जे दृश्य आढळतें तेंच आपल्या परिस्थितीस विशेष अनुकूल आहे. महाराष्ट्रांतील तपस्व्यांनीं व राजांनीं सारख्याच प्रमाणांत या स्थानीं आपली भक्ति ओतली आहे. कृष्णाकांठीं वाअी व सातारा आणि गोदाकांठीं नाशिक व पैठण या महाराष्ट्राच्या खऱ्या राजधान्या आहेत.

पण गोदावरीच्या अितिहासाला सहनवीर रामचंद्र व दुःखमूर्ति सीतामाअी यांच्या वृत्तान्तापासूनच प्रारंभ होतो. राज्याचा त्याग करतांना रामाला दुःख वाटलें नाहीं. पण गोदातीरीं सीता व लक्ष्मण यांच्यासह

अुपभोगलेला आनंदाचा शेवट होतांच त्याचें हृदय अेकदम शतधा विदीर्ण झालें! वाघ व लांडगे यांच्या अभावामुळें निर्भय झालेलीं हरणें आर्य रामभद्राचे दुःखोन्मत्त डोळे पाहून दूर पळून गेलीं असतील; सीतेच्या शोधासाठीं लक्ष्मणभावोजींनीं मोठ्यानें मारलेल्या हांका अैकून मोठमोठे हत्तीहि भयभीत झाले असतील; आणि गोदावरीचें तरल जल पशुपक्ष्यांच्या दुःखाश्रूंनीं कषाय बनलें असेल! हिमालयांत पार्वती, तशी जनस्थानांत सीता अशेष विश्वाची अधिष्ठात्री होती. ती गेल्यावर कल्पांतिक दुःख सार्वभौम झालें असल्यास त्यांत नवल तें काय?

राम आणि सीता यांचें निदान पुनर्मीलन तरी झालें; परंतु जनस्थानाचा वियोग नित्यच राहिला. आजहि नाशिक-पंचवटींत फिरून पहा. पावसाळ्यांत जा किंवा अुन्हाळ्यांत, सारी पंचवटी जटायूप्रमाणें "सीते! सीते!" अशी अुदास वाणी उच्चारीत असल्याचा भास होतो. महाराष्ट्रांतील साधुसंतांनीं जर आपल्या मंगल वाणीचा प्रसार येथें केला नसता तर जनस्थान हा अेक भयंकर अुजाड प्रदेश होअून गेला असता! अुन्हाळ्यांतील अुष्णता झांकण्यासाठीं ज्याप्रमाणें तृणसृष्टि चहूंबाजूंस पसरते, त्याचप्रमाणें साधुसंत जीवनांतील विषमतेचा विसर पाडण्यासाठीं सर्वत्र संचार करतात हें केवढें भाग्य आहे! जेव्हां जेव्हां नाशिक-त्र्यंबकच्या बाजूला जाण्याचा प्रसंग येतो तेव्हां तेव्हां वनवासार्थ हें स्थळ पसंत करणाऱ्या राम-लक्ष्मणांच्या नेत्रांनीं आपण सारा प्रदेश न्याहाळून पाहावा अशी अिच्छा होते. पण दर खेपेस थरथरणाऱ्या तृणांकुरांतून सुद्धां सीतामाअीची कातर तनुयष्टीच दृष्टीच पडते. रामभक्त समर्थ रामदास जेव्हां येथें राहत होते तेव्हां त्यांच्या हृदयांत कसल्या अूर्मि अुठत असतील बरें! श्रीसमर्थांनीं गोदावरीच्या कांठीं शेणाचा हनुमान् स्थापिला आहे तो कोणत्या हेतूनें? पंचवटींत हनुमान् असता तर सीतेचें हरण त्यानें मुळींच होअूं दिलें नसतें हें सांगण्यासाठीं? सीतामाअीनें कठोर वचन बोलून लक्ष्मणाला ताडन केलें आणि स्वतःवर महासंकट ओढवून घेतलें; हनुमानाला असें कांहींच ती बोलूं शकली नसती. पण जनस्थान व किष्किंधा यांच्यामध्यें अंतर पुष्कळ आहे आणि गोदावरी कांहीं तुंगभद्रा नव्हे.

## २

रामकथेचा करुणरस द्वापरयुगापासून आजपर्यंत सारखा वाहत आला आहे. त्याला कोण आटवूं शकेल? म्हणून आपण अंत्यज जातीच्या रेड्याकरवीं वेद बोलविणाऱ्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांचें दर्शन घेण्यास पैठण येथें जाऊं. गोदावरी जशी दक्षिणगंगा तशी तिच्या कांठीं वसलेली प्रतिष्ठान-नगरी दक्षिणेंतील काशी समजली जात असे. येथील दशग्रंथी ब्राह्मण जो निर्णय देत तो चारहि वर्गांना मान्य करावा लागे. मोठमोठ्या सम्राटांनीं दिलेल्या ताम्रपटांपेक्षांहि येथील ब्राह्मणांची व्यवस्थापत्रकें अधिक महत्त्वाचीं मानिलीं जात. अशा ठिकाणीं शास्त्रधर्मावर हृदयधर्माला विजयी करून दाखविण्याचें काम ज्ञानरायांनींच करावें. पैठणांत ज्ञानेश्वरांना जानवें मिळालें नाहीं! संन्यासी शंकराचार्यांच्या छळानें नित्याचें स्मारक करण्यासाठीं ज्याप्रमाणें तेथल्या राजानें नांबुद्री ब्राह्मणांवर कित्येक चालीरीती लादल्या,*

* संन्यास घेण्याला आओची अनुज्ञा मिळाल्यानंतर मगराच्या जबड्यांतून शंकराचार्य सुटले! ते पूर्ण मातृभक्त होते. पण संन्यासधर्माप्रमाणें आओजवळ राहतां येत नाहीं. तेव्हां आओला सोडून जातांना "तूं संकटांत असतांना मला बोलावशील त्यावेळीं मी धावून येओन," असें आश्वासन देऊन त्यांनीं आओचा निरोप घेतला. पुष्कळ दिवस लोटल्यानंतर वृद्ध माता आजारी पडली व मुलाला भेटण्याचा तिनें ध्यास घेतला. आश्वासनाप्रमाणें शंकराचार्य आले. आओ कैलासवासी होओपर्यंत त्यांनीं तिची सेवा केली. आओनें सुखानें प्राण सोडला!

पण आता पंचाओीत आली. प्रेत स्मशानांत नेण्याला गांवचे ब्राह्मण तयार होओनात आणि आपल्या स्मशानांत प्रेतदहनाला परवानगी देओनात! लांकडें पण मिळेनात! संन्यास घेतल्यानंतर जो मनुष्य पुनः पूर्वाश्रमींच्या आपल्या आओला भेटावयास येतो त्याचें हें कृत्य शास्त्रबाह्य आहे, त्याच्यावर बहिष्कारच टाकला पाहिजे, असें ब्राह्मणांनीं ठरविलें. तेव्हा शंकराचार्यांनीं आपल्या आओच्या देहाचे चार तुकडे केले, केळीचे बुंध तोडून आणिले, व त्यांवर तुकडे ठेवून आपल्या आओच्या घरच्या अंगणांतच त्यांनीं योगाग्नि चेतविला आणि अशा रीतीनें आपल्या तपस्तेजानें तिला सद्गति दिली!

शंकराचार्यांचें गांव ज्या राजाच्या आधिपत्याखालीं होतें तो राजा त्यांचा शिष्य होता. आपल्या पूज्य गुरूच्या छळाची ही वार्ता त्याला कळतांच त्यानें आपल्या राज्यांतील नांबुद्री ब्राह्मणांना शिक्षा ठोठावली कीं, त्यांनीं आपल्या घरांतील माणसांचीं

त्याप्रमाणें संन्यासीपुत्र ज्ञानेश्वरांचा अेखादा शिष्य राजा असता तर त्यानें महाराष्ट्रीय ब्राह्मणांना "तुम्हीं जानवें घालतां कामा नये," अशी शिक्षा ठोठावली असती !

हाताच्या बोटांचा ज्याप्रमाणें पंखा होतो त्याप्रमाणें मोठमोठ्या नद्यांना मिळणाऱ्या आणि आत्मविलोपनाचा अवघड योग साधून दाखविणाऱ्या लहान नद्यांचाहि पंखा होतो. सह्याद्रि व अजिंठ्याचे डोंगर यांच्यामुळें बनलेल्या कोपऱ्यांत जितकें पाणी पडतें तें सारें खेचून नेण्याचें काम या नद्या करतात धारणा व कादवा, प्रवरा व मुळा यांना सोडून दिलें तरी मध्यभारतामधून दूरदूरचें पाणी आणणाऱ्या वर्धा व वैनगंगा यांना कसें विसरतां येअील ? दोन्ही मिळून अेक झालेल्या नदीला ज्यानें प्राणहिता हें नांव दिलें त्याच्या मनांत किती कृतज्ञता, किती काव्य, किती आनंद भरला असेल ! आणि थेट अीशान्येकडील कोपऱ्याहून पूर्व घाटांतील पाणी आणून देणाऱ्या अष्टवक्रा अिंद्रावतीला आणि तिची सखी श्रमणी तपस्विनी शबरी हिला प्रणाम केल्याशिवाय कसें चालेल ?

गोदावरीची संपूर्ण कला भद्राचलंहून पाहतां येते. अेक ते दोन मैल रुंद पात्र असलेली गोदावरी अुंच अुंच डोंगरांमधून आपला मार्ग काढीत केवळ शंभर वावांच्या दरींतून निघते तेव्हां तिला कसें वाटत असेल ? आपली संपूर्ण शक्ति व युक्ति यांचा अुपयोग करून आणीबाणीच्या प्रसंगांतून आपल्या राष्ट्राला पुढें घेअून जाणाऱ्या राष्ट्रपुरुषाप्रमाणें जगाला विस्मित करणारी गर्जना करीत ती तेथून मार्ग काढते. प्रचंड महापुरांच्या गोष्टी आपण अेकतों. पण अेकाअेकीं पन्नास फूट चढलेल्या पुराची कल्पना तरी आपल्याच्यानें करवेल काय ? पण जें कल्पनेला शक्य नाहीं तें गोदावरीच्या प्रवाहाला शक्य आहे. अरुंद दरींतून वाट काढीत असतां पाण्याला आपला पृष्ठभागसुद्धां सपाट राखणें अशक्य होअून जातें. अर्घ्य देतांना

---

प्रेतें स्मशानांत न नेतां आपल्या घराच्या अंगणांतच त्या प्रेताचे चार तुकडे करून जाळलीं पाहिजेत; आणि ही शिक्षा त्यानें कडकपणें अंमलांत आणण्यास आरंभ केला. ब्राह्मणांचें धाबें दणाणलें ! त्यांनीं राजाजवळ क्षमायाचना केली. तेव्हां त्यानें प्रेताचे तुकडे करण्याअैवजीं प्रेतावर चार ओरखडे काढावे अशी मर्यादा घालून दिली आणि प्रेतें स्मशानांत नेण्यास परवानगी दिली.

अंजलीचें पन्हाळें बनतें. तसें दरींतून निघणाऱ्या पाण्याच्या पृष्ठभागांचेंहि भयानक पन्हाळें बनतें. पण अद्‌भुत रस अजून यापुढें आहे. या पन्हाळ्यांतून आपली होडी घेअून जाणारे निधड्या छातीचे नाविक तेथें किती तरी आहेत. होडीच्या दोन्ही अंगांस पाण्याच्या अुंच अुंच भिंती होडीच्या वेगानेंच धावत असतांना मनुष्याच्या हृदयांत काय होत असेल!

भद्राचलंपासून राजमहेंद्रीपर्यंत अथवा धवलेश्वरापर्यंत गोदावरीचा प्रवाह अखंड वाहतो. मग मात्र "त्यागाय संभृतार्थानाम्" हा सनातन सिद्धान्त तिला आठवला असावा. येथून गोदावरीनें जीवनवितरण चालू केलें आहे. अेका बाजूस गौतमी गोदावरी, दुसरीकडे वसिष्ठ गोदावरी. मध्यें किती तरी बेटें व अंतर्वेदी प्रदेश आहेत. आणि या प्रदेशांत गोदेचें गोड पाणी व सकस गाळांतून अुगवणार सोन्यासारखें शालिधान्य यांवर परिपुष्ट होअून वेदघोष करणारे ब्राह्मण वास्तव्य करीत आले आहेत. अशा समृद्ध देशाला स्वतंत्र राखण्याची शक्ति जेव्हां आपले लोक गमावून बसले तेव्हांच डच, अिंग्रज व फ्रेंच लोक गोदावरीच्या तीरीं तळ द्यावयास सिद्ध झाले. आज यानानमध्यें फ्रान्सचा तिरंगी झेंडा फडकत आहे.

२

मद्रासहून राजमहेंद्रीला जात असतांना कृष्णाकाठीं नांदणाऱ्या बेझवाड्याजवळ सूर्योदय झाला. पावसाळ्याचे दिवस, मग काय विचारावें! जिकडे पाहावें तिकडे विविध छटांनीं खुलणारा हिरवा रंग पसरलेला होता; आणि जणू काय हिरवा रंग असा जमिनीवर पसरलेला असह्य वाटून त्याचे मोठमोठे गुच्छ हातांत घेअून वर फेकणारीं ताडांचीं झाडें सर्वत्र दिसत होतीं! पूर्वेकडे अेक कालवा लोहमार्गाच्या कांठाकांठानें वाहत होता. पण कांठ कांहींसा अुंच असल्यामुळें त्याचें पाणी क्वचितच दिसत होतें. फुलपाखरांप्रमाणें आपलीं शिडें पसरून रांगेनें अुभ्या असलेल्या होड्यांवरूनच या कालव्याचें अस्तित्व लक्षांत येत होतें. मधून मधून पाण्याची लहानमोठीं तळीं लागत होतीं. रंगबेरंगी ढगांनीं नटलेलें आकाश तळ्यांत स्नान करण्यास अुतरल्यामुळें पाण्याची खोली अनंतपटींनीं खोल भासत होती. कोटेंकोटें चंचल कमलांमधून निस्तब्ध बगळे अुभे असलेले पाहून प्रभातवायूचें अभिनंदन करावयाची अिच्छा होअी.

अशा काव्यप्रवाहांतून मार्ग काढीत कोव्वूर स्टेशनपर्यंत आलों. येथूनच आतां आपल्याला गोदामाअीचें दर्शन होअील अशी अुत्सुकता जागृत झाली.

पुलावरून जाअूँ तेव्हां अुजवीकडे पाहावें का डावीकडे असा मनाचा गोंधळ चालला होता अितक्यांत पूल आला आणि भगवती गोदावरीचा सुविशाल विस्तार दृष्टीस पडला ! गंगा, सिंधु, शोणभद्र, अैरावती यांचे विशाल प्रवाह मीं पोटभर पाहिले आहेत; बेझवाडा येथें झालेल्या कृष्णाबाअीच्या दर्शनाविषयीं मला नित्य अभिमान वाटतो; पण राजमहेंद्रीजवळ गोदावरीची शोभा कांहीं वेगळीच दिसत होती. या ठिकाणीं जें भव्य काव्य अनुभवास आलें, तें क्वचितच दुसऱ्या कोठल्या ठिकाणीं प्रकट झालेलें पाहिलें असेल ! पश्चिमेकडे दृष्टि फेंकली तों दूरवर टेकड्यांची अेक सुंदर रांग दिसली. आकाश ढगांनीं झांकलें गेल्यामुळें कोठेंहि अून पडलें नव्हतें. काळ्या गडद मेघांमुळें गोदावरीच्या धूलिधूसर पाण्याचा गडदपणा अधिकच वाढला होता. मग भवभूतीचें स्मरण कां होणार नाहीं ? खालवरच्या या कालिम्यामुळें अेकंदर दृश्यावर वैदिक प्रभातकालाची सौम्य सुंदरता पसरली होती आणि टेकडीवर अवतरलेले कित्येक ढवळे ढग तर अगदीं ऋषीप्रमाणेंच दिसत होते. या सर्व देखाव्याचें वर्णन करणें शक्य तरी आहे कां !

अितकें अपरंपार पाणी कोठून येत असेल ? संकटांतून विजय मिळवून बाहेर पडलेलें राष्ट्र जसें वैभवाच्या नवीन नवीन छटा दाखवीत चहूंबाजूंस समृद्धीचा फैलाव करीत जातें, तद्वतच गोदावरीचा प्रवाह पर्वतामधून निघून आपल्या पूर्ण गौरवानें येत असलेला दिसत होता. लहानमोठ्या नावा म्हणजे नदीचीं मुलें. आअीचा स्वभाव ओळखून घेतल्यानंतर तिच्या मांडीवर वाटेल तशीं तीं नाचलीं तरी त्यांना कोण आडवणार ? पण मुलांची अुपमा त्या नावांना देण्यापेक्षां प्रवाहांत ठिकठिकाणीं फिरणाऱ्या भोंवऱ्यांना देणें अधिक योग्य होअील. ते घटकेंत दिसत, प्रचंड तुफान करण्याचा आविर्भाव करीत आणि लगेच दुसऱ्या क्षणीं हसूं लागत; ते वाटेल तेथून येत आणि वाटेल तिकडे जात.

अेवढ्या मोठ्या विशाल पात्रांत बेटें नसतीं तर तेवढी अुणीवच राहिली असती. गोदावरींतील बेटें प्रसिद्ध आहेत. कित्येक बेटें जुन्या धर्माप्रमाणें स्थिररूप होअून बसलीं आहेत. पण पुष्कळशीं कवीच्या प्रतिभेप्रमाणें

दर खेपेस नवीन नवीन स्थानें पसंत करतात आणि नवीन नवीन रूपें धारण करतात. त्यांच्यावर अनासक्त बगळ्यांशिवाय दुसरें कोण अुभें राहणार? आणि बगळे चालतात तेव्हां आपलीं पावलें खोल अुमटविल्यावांचून कसे राहतील? आपल्या धवल चरित्राचें* अनुकरण करणाऱ्याला त्यानें दिग्दर्शन केलें नाहीं तर तो बगळा कसला?

नदीचा कांठ म्हणजे मानवी कृतज्ञतेचा अखंड अुत्सव! पांढरे शुभ्र प्रासाद व अुंच अुंच शिखरें हीच अेक अखंड अुपासना आहे. पण अेवढ्यानेंच काव्य पूर्ण होत नाहीं. म्हणून भक्तगण देवळांतील घंटांचे नादतरंग नदीच्या तरंगांवरून अैलतीरापासून पैलतीरापर्यंत पाठवीत असतात. संस्कृतीचे अुपासक भारतवासी याच ठिकाणीं गंगाजलाचे कलश अर्धे गोदावरींत ओततात आणि फिरून गोदेच्या पाण्यानें कलश पुरते भरून घेअून जातात. किती भव्य विधि हा! किती पवित्र काव्य! हा भक्तिरव प्रत्येक हृदयांत भरून राहिलेला आहे. हा घंटानाद व हा भक्तिरव मला पूर्वस्मृतीनें अैकविला. प्रत्यक्ष मात्र अग्निरथाचा ध्वनि अैकूं येत होता! आधुनिक संस्कृतीच्या या प्रतिनिधीबद्दलची खंत जर आपण सोडून दिली तर आगगाडीच्या चाकांचा ताल कांहीं कमी आकर्षक नसतो, आणि पुलावर तर त्याचा विजयनाद सांसर्गिक झाल्यावांचून राहत नाहीं.

पुलावर गाडी बरीच चालून गेल्यावर मला वाटलें कीं, पूर्व बाजू पाहावयाची राहूनच गेली. आम्ही त्या बाजूस फिरलों. तेथें तर अेक नवीनच शोभा! पश्चिमेस गोदावरी जितकी रुंद होती त्यापेक्षांहि पूर्वेस ती अधिक रुंद दिसली. तिला अनेक मार्गांनीं सागराला मिळावयाचें होतें. सरित्पतीला भेटण्यास सरिता जाते तेव्हां तिला संभ्रम (लज्जावश) अुत्पन्न होणारच. पण गोदावरी कांहीं झालें तरी धीरोदात्त माता! तिचा संभ्रम सुद्धां अुदात्त रूपानेंच व्यक्त व्हावयाचा. या बाजूचीं बेटें वेगळ्याच प्रकारचीं होतीं. त्यांत वनश्रीची शोभा पूर्णपणें विकसलेली होती. ब्राह्मणांच्या किंवा शेत-कऱ्यांच्या झोपड्या या अंगास दिसत नव्हत्या. वेगानें येणाऱ्या पाण्याच्या ओघाशीं टक्कर देणाऱ्या या बेटावर कोणीं अुंच वाडे बांधले असते तर

* वेदामध्यें चरित्र म्हणजे चालण्याचें साधन, पाअूल.

ते कदाचित् दुरून दिसले असते. केवळ निसर्गानेंच अुंच वृक्षांच्या विजय-पताका अुभ्या केल्या होत्या; आणि डाव्या अंगास राजमहेंद्रीची व धवलेश्वराची सुखी जनता आनंद करीत होती. या अनुपम दृश्यानें तृप्ति होण्यापूर्वींच अुजव्या बाजूस नदीच्या कांठावर अुन्मत्तपणें वाहत असल्या-सारख्या दिसणाऱ्या काश तृणांच्या शुभ्र तुऱ्यांचा प्रवाह दूरवर जातांना दिसला. नदीच्या पाण्यांत अुन्माद होता, पण त्यावर लाटा नव्हत्या. या तुऱ्यांच्या प्रवाहानें वाऱ्याशीं संगनमत केल्यामुळें तो हव्या तेवढ्या लाटा अुसळवूं शकत होता. दृष्टि पोंचेल तेथवर पाहिलें — आणि दृष्टीची पोंच येथें कमी काय म्हणून असेल ? — तुऱ्यांचा प्रवाह आपला चाललाच होता ! गोदावरीच्या प्रवाहासारख्या प्रवाहाबरोबर स्पर्धा करतांना त्याला संकोच वाटत नव्हता. आणि त्याला संकोच तरी कां वाटावा ? गोदावरीमातेच्या विशाल पुलिनावर त्यानें तिचें थोडें का स्तन्यपान केलें आहे ?

माते गोदावरि ! राम, लक्ष्मण, सीता यांच्यापासून तों वृद्ध जटायू-पर्यंत सर्वांना तूं आपलें स्तन्यपान करविलें आहेस. तुझ्या कांठीं जसे शूर वीर झाले तसे तत्त्वचिंतकहि झाले; संत झाले आणि मुत्सद्दी झाले; देशभक्त झाले आणि अीशभक्तहि झाले. चारहि वर्णांची तू माता आहेस. माझ्या पूर्वजांची तूं अधिष्ठात्री देवता आहेस. नवनव्या आशा मनांत बाळगून तुझें दर्शन घेण्यास मी आलों आहें. दर्शनानें कृतार्थ झालों तरी आशा अजून तृप्त झाल्या नाहींत. ज्याप्रमाणें तुझ्या तीरावर श्रीरामचंद्रांनीं दुष्ट रावणाचा नाश करण्याचा संकल्प केला तसा संकल्प कधींपासून मी मनांत बाळगीत आहें. तुझी कृपा असेल तर हृदयांतून, व देशांतून रावणाचें राज्य नाहींसें होअील, रामराज्याची स्थापना झालेली दिसेल, आणि फिरून तुझ्या दर्शनाला येअीन. कांहीं नाहीं तर निदान काश तृणाच्या तुऱ्यांच्या प्रवाहाप्रमाणें मला अुन्मत्त कर — जेणेंकरून निःसंकोच-पण, अेकाग्र चित्तानें मातेच्या सेवेंत मीं निमग्न राहीन आणि बाकीचें सारें विसरून जाअीन. तुझ्या पाण्यांत अमोघ शक्ति आहे, तुझ्या पाण्याच्या अेका बिंदूचेंहि सेवन व्यर्थ जाणार नाहीं !'

# २६

# सुवर्णदेशाची माता

अिरावती कीं अैरावती ? मला वाटतें नदीचें नांव अिरा जातीच्या गवतावरून अिरावती पडलें असलें पाहिजे. या नदीच्या कांठावरील पौष्टिक गवत खाअून मदोन्मत्त झालेल्या हत्तींना अैरावत म्हणत असतील; अथवा अिंद्राच्या अैरावताप्रमाणें महाकाय, आणि गजगतीनें चालणारी ही नदी पाहून अेखाद्या बौद्ध भिक्षूला वाटलें असेल, "चला हिलाच आपण अैरावती म्हणूं."

पण अैतिहासिक कल्पनातरंग चालविण्याचें काम वेड्या लोकांचें आहे; प्रवाशाला तें परवडणार नाहीं.

अैरावती जर हिंदुस्थानांत असती तर संस्कृत कवींनीं तिच्याविषयीं अैरावतीअेवढाच लांबरुंद काव्यप्रवाह वाहविला असता. ब्रह्मदेशाच्या कवींनीं अनेक काव्यें लिहिलीं असलीं तरी तीं आपणांस कोठून माहीत असणार ? ब्रह्मी भाषा आपली जन्मभाषा नाहीं आणि शास्त्रभाषा किंवा राजभाषाहि नाहीं. शेजाऱ्याची भाषा आस्थेनें शिकून घेण्याचा स्वभाव आपला होताच कधीं ? अेखाद्या अिंग्रजानें बर्मी भाषा शिकून बर्मी कवितेचें अिंग्रजींत भाषांतर करून दिलें तर वाचूं आपण तें कदाचित् !

कोणत्याहि देशाला अैरावतीसारख्या नदीसंबंधीं अभिमान व कृतज्ञता वाटावी. ब्रह्मदेशांत रंगूनहून अुत्तरेकडे थेट मंडालेपर्यंत आम्ही आगगाडींतून गेलों होतों. तेथून जवळच अमरापुराला जाअून आम्ही अैरावतीचें पहिलें दर्शन घेतलें. अमरापुराजवळ प्रचंड बौद्ध मूर्ति आहेत याचा आम्हांला अगोदरच सुगावा लागला असता तर भगवान् बुद्धांच्या दर्शनानेंच आम्हीं अैरावतीच्या विहारास प्रारंभ केला असता.

येथेंहि नदीचें पात्र फारच रुंद आहे. आसपासची जमीन सपाट असल्यामुळें नदी गंभीर दिसते. नदीचा प्रवाह धीरोदात्त गजगतीनें चालतो. अशा नदीच्या पृष्ठभागावर होडींत किंवा वाफरांत (स्टीमलॉंचमध्यें) बसून प्रवास करणें म्हणजे आयुष्यांतील अेक मोठा 'लाहो'च आहे.

अमरापुराहून परत मंडालेला येऊन आम्ही वाफरांत बसलों. समुद्रावरील प्रवास वेगळा आणि नदीवरील वेगळा. नदींत लाटा नसतात. दोन्ही बाजूंचे कांठ आपल्या सोबतीला असतात; आणि आपणांला असें कधींच वाटत नाहीं कीं, आपण जीवनाचें नांव धारण करणाऱ्या, परंतु जीव घेणाऱ्या अेका महाभूताच्या तावडींत सांपडलों आहों! नदीचा प्रवास हा हवेंत चालणाऱ्या भूगोलाच्या सनातन प्रवासाअितकाच शांत आणि आह्लादकर असतो. या घटकेस अैरावतीच्या त्या प्रवासाची आठवण करीत असतां द्रौपदीसारख्या मानिनी नर्मदेवरील चाणोद-कर्नाळीकडील प्रवास, सीतेसारख्या शोभणाऱ्या तापीवरील सूरतेपासून सागर-संगमापर्यंतचा प्रवास, काशीतलवाहिनी भारतमाता गंगेवरील प्रवास, मथुरा-वृंदावनाकडील कृष्णसखी कालिंदीवरील प्रवास, काश्मीरच्या नंदनवनांत केलेल्या पार्वती-वितस्तेवरील प्रवास आणि वनश्रीचें माहेरघर जो गोमंतक प्रदेश तेथील खाड्यांमधील प्रवास या सर्वांचें स्मरणसंमेलन होतें. यांपैकीं तृप्ति होओीपर्यंत केलेला असा लांबवरचा प्रवास वितस्ता व अैरावती यांवरचाच. सिंधु, गंगा, ब्रह्मपुत्रा व नर्मदा यांच्या रांगेंत बसण्यासारखी ही नदी आहे. अैरावतीचें पात्र व प्रवाह पाहतांच अेखाद्या मोठ्या साम्राज्यावर स्वामित्व गाजवणारी ही साम्राज्ञीच असावी असा भाव मनांत अुपजतो. आराकान व पेगुयोमा (योमा = पर्वत) तिचें रक्षण करतात खरे; पण अैरावतीची प्रतिष्ठा राखण्यासाठीं ते आदरानें दूरचे दूर अुभे आहेत.

आमचें जहाज निघालें. ज्याप्रमाणें कामधेनूचीं वासरें सांज पडतांच आओीजवळ धावत येतात, त्याप्रमाणें आसपासच्या विस्तीर्ण प्रदेशांतील श्रमजीवी कृषीवल अैरावतीच्या कांठावर गोळा होतात. आमचें जहाज म्हणजे अेक मोठा जंगम आठवड्याचा बाजारच म्हणतां येअील. लहान-मोठें कसलेंहि बंदर आलें कीं, जहाज शिटी फुंकून लोकांना निमंत्रण देओी. लगेच मुंग्यांचा थवा लोटावा तसे लोक धावत येत! खाद्य पदार्थ, कपडे, वेताचीं भांडीं, कलाकौशल्याच्या वस्तु, अित्यादि नानातऱ्हेचे पदार्थ जहाजावर पसरले जात. जहाजांतहि कित्येक व्यापारी आपला माल घेऊन तयार बसलेलेच असत. पांखरें किलबिल करतात त्याप्रमाणें देववेवीचा गोंगाट चालू होओी. आपल्याला भाषा अवगत असेल तरच या गोंगाटाचा कंटाळा येणार! येथें लोक रडोत, ओरडोत अथवा भांडोत, आपल्याला

सगळेंच सारखें ! जणूं काय अेक मोठें नाटकच चाललें आहे ! विक्री संपली कीं जहाज निघे. आमचें जहाज विण्याच्या तयारींत असलेल्या म्हशीसारखें डुलत डुलत चाले. जहाजांतील अेका हलकट गोऱ्या अधिकाऱ्या-बरोबर आमचें थोडें बिनसल्यामुळें आमच्या प्रवासाचा प्रारंभ गोड्या पाण्यांत सुद्धां खारट झाला होता ! पण मंद मंद वाऱ्याबरोबर तें सर्व अुडून गेलें आणि आम्हीहि निसर्गाप्रमाणें पुनः प्रसन्न झालों. पुनः अेक बंदर आलें. येथें कसला तरी विशेष व्यापार चालत असावा. लहानमोठ्या शेंकडों होड्यांचा कळप म्हशींप्रमाणें नदीच्या कांठीं चिखलांत डुंबत होता. गुरांच्या पाठीवर व डोक्यावर माशा घोंघावतात त्याप्रमाणें खेड्यांतील मुलें या होड्यांच्या मध्यें पाण्यांत अुड्या मारीत खेळत होतीं. ब्रह्मी लोकांना गोंदून घेण्याचें वेड फार आहे. त्यांच्या केवड्यासारख्या कातडीवर लाल व हिरवें गोंदणें शोभूनहि दिसतें. महाराष्ट्रांतील खेड्यांत अशी समजूत असते कीं, या जन्मीं अंगावर दागिने गोंदून घेतले तर पुढच्या जन्मीं सोन्याचे दागिने मिळतात, आणि कपाळावर टिळा व चंद्र गोंदून घेत-ल्यास अखंड सौभाग्य प्राप्त होतें. येथील लोकांतहि अशीच कांहीं समजूत असावी. कारण, पुष्कळ खेडवळ लोक कमरेपासून गुडघ्यापर्यंतच्या साऱ्या अंगावर तऱ्हेतऱ्हेची कशिदा काढलेली लुंगी गोंदून घेतात. त्यामुळें कित्येक-जण, जे नदींत अुघड्या अंगांनीं न्हात होते ते वस्त्र नसतांना सुद्धां नग्न वाटत नव्हते. जहाज अधिक वेळ थांबावयाचें असल्यास आम्ही तीरावर जाअून जवळच्या खेड्यांत जरा फिरून येत असूं. ब्रम्ही घरें व गल्ल्या यांची आमच्या डोळ्यांना संवय झाली होती. त्यांची भाषा आम्हांला येत नसे तरी त्या निर्व्याज खेडवळांचें जीवन आम्हांला परिचित असल्यासारखेंच वाटत असें. मुत्सद्दी व व्यापारी लोकांचे रागद्वेष सोडले आणि धार्मिक व अधार्मिक लोकांची कल्पनासृष्टि अेकीकडे ठेवली तर मनुष्यजात सर्वत्र सारखीच असते. मला तर वाटतें कीं, पृथ्वीच्या पाठीवर खेडीं सारीं सारखींच असलीं पाहिजेत.

प्रवाहाबरोबर जणूं काय ताल धरीत असल्याप्रमाणें स्तूप व देवळें मधूनमधून येअून जात. अुंच टेकड्या व शिखरें मनुष्याला सदैव प्रिय असतातच. त्यांत पुनः नाअील नदीसारखी अैरावती जेव्हां चारी दिशांना

आपल्या कृपेचा अुपप्लव पसरून देते तेव्हां तर अुच अुच जागाच मनुष्याचें आश्रयस्थान होअून बसतात. त्या जागांसंबंधीं वाटणारी कृतज्ञता मनुष्यानें त्यांच्यावर देवळें बांधून करायची नाहीं तर कोणत्या रीतीनें व्यक्त करायची ? निसर्गानें आपणास शिकवलें आहे कीं, हिरव्या पानांत पिवळें पिकलेलें फळ आपली सगळी खुमारी दाखवूं शकते. या शिकवणीचा लाभ घेअून येथील लोकांनीं झाडांमध्यें देवळें बांधून त्यांच्या शिखरांवर 'तें पाहा' म्हणून आकाशाचें आनंत्य दाखविणारीं सोन्याचीं पिवळीं बोटें केलीं आहेत. निसर्गाच्या शोभेला मानवाच्या हातून अलंकार चढवितां यावयाचा नाहीं असें समजणाऱ्या लोकांनीं हीं शिखरें अेकदां अवश्य पाहावींत.

दुपारची वेळ होती. अिंग्रजी समजणाऱ्या अेका ब्रम्ही कॉलेजियन-बरोबर आम्ही बोलत होतों, अितक्यांत अेक नीरव नाद कानीं पडला. छिंदवीन नदी आपला करभार घेअून अैरावतीला भेटण्यास आली होती. काय तो दोघींचा प्रेमसंगम ! रामदास व तुकाराम अेकमेकांस भेटत आहेत, किंवा बुद्धिबळें खेळणाऱ्या कालिदासाला भवभूति आपलें 'अुत्तर-रामचरित' वाचून दाखवीत आहे,* असेंच होतें तें दृश्य !

---

* कालिदास व भवभूति हे समकालीन नव्हेत. कालिदास भवभूतीच्या पुष्कळच पूर्वीं होअून गेला. पण काव्यप्रदेशांत काळाची काय किंमत ? लोककथेंत भवभूति खुशाल कविकुलगुरुला भेटूं शकतो !

अेकदां भवभूति आपलें 'अुत्तररामचरित' खाकोटीस मारून कालिदासाच्या भेटीस गेला. कालिदासाची स्वारी त्यावेळीं बुद्धिबळें खेळण्यांत मग्न होती. भवभूतीनें "नाटक अैकावें," अशी त्या राजकवीला विनंती केली. कालिदास म्हणाला, "ठीक." भवभूतीनें आपलें नाटक अथपासून अितीपर्यंत वाचून दाखविलें; आणि अिकडे कालिदास राजाला सर्व बाजूंनीं अडकवून प्यादाचा शह देण्याच्या खटपटींत होता ! भवभूतीला वाटलें, या बुद्धिबळ-पटाच्या बरोबरीला आपला बहुमोल रंगपट (नाटक) आपण मांडला हेंच अुचित झालें नाहीं. अितक्यांत कालिदासानें वर मान करून म्हटलें, 'आपलें नाटक फारच अुत्तम वठलें आहे. पण त्यांत फक्त अेक अनुस्वारच अधिक पडला आहे असें मला वाटतें. आपण 'अविदितगतयामा रात्रिरेवं व्यरंसीत्' असें म्हटलें आहे, त्या अैवजीं 'रात्रिरेव व्यरंसीत्' असें म्हटलें असतें तर अुत्तम झालें असतें." भवभूति कवीच होता. कालिदासानें आपलें नाटक अत्यंत लक्षपूर्वक अैकलें अितकेंच नव्हे, तर मार्मिक निरीक्षणहि केलें हें त्यानें जाणलें.

कल्पनेनेंच मी छिंदवीनच्या अज्ञात प्रदेशांत ज्ञानराज्यापर्यंत जाऊनहि आलों. हातांत तीरकमठा किंवा कुऱ्हाड घेऊन फिरणारे निश्चित व निर्भय असे कितीतरी वनवासी मला तेथें भेटले. संशय आल्यास जीव घेणाऱ्या आणि विश्वास बसल्यास जीव देणाऱ्या या निसर्गाच्या बालकांचें हें दर्शन म्हणजे सुधारणेचा चिखल धुऊन काढणारें मंगलस्नानच होतें. पण जहाजावरील पक्षी वाटेल तितका अुडाला तरी शेवटीं जहाजावरच फिरून येतो, तद्वत् माझी कल्पनाहि वनांत सहल करून जहाजावर परत आली; कारण, आम्ही पकोकु बंदरावर येऊन पोंचलों होतों.

पकोकूजवळच्या चिखली नदींत स्नान करून आणि ब्रम्ही पाहुणचाराचा स्वीकार करून आम्ही परत जहाजावर चढलों आणि 'घासलेट' तेलाच्या विहिरी पाहण्यास येननजांवपर्यंत गेलों. येथें अमेरिकन मजुरांचें राज्य चालतें असें म्हणावयास हरकत नाहीं. आसपास वनश्री नसल्यासारखीच. येथें अेकीकडे या घासलेटच्या विहीरींचें आधुनिक क्षेत्र आणि दुसरीकडे टेकडीवर बांधलेल्या चिमुकल्या प्राचीन बौद्ध देवळांचें तीर्थक्षेत्र, हीं दोन्हीं पाहून कितीतरी विचार मनांत आले! देवळांतील नक्षीकामांत हत्तीचें तोंड असलेला अेक पक्षी कोरलेला होता. दुसरेहि अनेक संकर येथें दिसून आले. जवळच्या अेका मठांत कित्येक बौद्ध भिक्षु भसाड्या रागांत संध्याकाळची प्रार्थना किंवा असाच कांहीं विधि करीत होते. अैरावतीला जणू काय कोणाचाच पक्षपात नाहीं अशा रीतीनें ती घासलेटच्या विहिरीवरील पंपाचा धाड धाड आवाजहि आपल्या हृदयावर वहन करिते, आणि "अनिच्चा वत संखारा अुप्पादव्वयधम्मिणो"[१] चा श्रांत[२] अथवा चिरंतन[३] संदेशहि वहन करिते. अमेरिकेचें सामर्थ्य खुशाल अद्वितीय असो, पण कांहीं झालें तरी तें खंड म्हणजे अद्यापि बालकच आहे! जीवनाचें रहस्य अितक्यांतच कोठून त्याच्या हातीं लागायला? त्याला केवळ नदीच्या

१ "अनित्या वत संस्कारा अुत्पत्तिव्ययधर्मिणः ॥"
(संस्कार म्हणजे अुत्पन्न झालेल्या वस्तु या अनित्य आहेत्— अुत्पत्ति व नाश या धर्मांनीं बाधित आहेत.)

२ श्रांत—थकलेला. हरलेल्यांचें तत्त्वज्ञान.

३ चिरंतन—चिरकाळ टिकणारा. संपूर्ण ज्ञान झालेल्यांचें तत्त्वज्ञान.

कांठीं तीन हजार फूट खोल विहिरी खोदून घासलेट काढण्याचेंच सुचा-वयाचें ! जगांतील सर्व सृष्ट पदार्थ अुत्पन्न होतात व नाश पावतात, त्यांतील सगळेंच नश्वर व व्यर्थ आहे, असार आहे, सार केवळ यांतून सुटका करून घेअून निर्वाण प्राप्त करून घेण्यांतच आहे, ही गोष्ट कोणत्या अमेरिकनाला पटेल बरें ? पण अैरावती नदी अुत्साहाच्या भरांत ज्ञानाचा निषेधहि करीत नाहीं आणि ज्ञानाच्या भरामुळें अुत्साह घालवूनहि बसत नाहीं. तिला तर महासागरांत विलीन व्हावयाचें आहे; आणि वर पुन्हां विलीन होत राहण्याचा आनंदहि अखंड अनुभवावयाचा आहे.

यननजांवहून आम्ही प्रोमपर्यंत गेलों आणि तेथें अैरावतीचा निरोप घेअून रेलवेचा रस्ता धरला. येथून पुढें जाअून ही महानदी अनेक मुखांनीं सागरास मिळते. अैरावती खरोखर सुवर्णदेशाची माता आहे.

## २७

# जोगचा धबधबा

अगदीं बालपणींच कारवार येथें असतांना गिरसप्पाविषयीं अैकलें होतें. त्या वेळीं असें अैकलें होतें कीं, कावेरीनदी पर्वतावरून खालीं पडते आणि त्यामुळें अेवढा मोठा आवाज होतो कीं दोन मैलांवर घागरींची अुतरंड रचली असली तर ती हवेच्या धक्क्यानेंच कोसळून जाअील ! मग या धबधब्याचा आवाज कोठपर्यंत अैकूं येत असेल ? पुढें जेव्हां मी भूगोल शिकलों तेव्हां मनांत शंका आली कीं, कावेरी तर थेट कुर्ग प्रांतांत अुगम पावून पूर्व समुद्राला मिळते. ती पश्चिम घाटाच्या कड्यावरून खालीं पडणें शक्यच नाहीं. तर मग गिरसप्प्यांत अुडी घेणारी नदी दुसरी असावी. या नदीला शक्य तितकी घाअी करून होन्नावरजवळच पश्चिम समुद्राला मिळावयाचें होतें. अेवढ्याचसाठीं तिने सवाशेंदीडशें पुरुष अुंचीवरून धाडकन् अुडी घेतली आहे. या नदीचें नांव काय ?

नायगऱ्याच्या धबधब्याचीं कितीतरी वर्णनें माझ्या वाचण्यांत आलीं होतीं. प्रकृतिमातेनें अमेरिकेला दिलेला हा अेक अद्भुत अलंकार आहे. सर्व पृथ्वीवरील लोक त्याची यात्रा करण्यासाठीं येतात, मोठ्या मजबूत

पिपांत बसून या धबधब्यांतून पार होण्याचे कित्येक लोकांनीं प्रयत्न केले आहेत, अित्यादि वर्णनें जसजशीं अधिक वाचावीं तसतशी अुत्सुकता वळावतच्च जाअी. निरनिराळ्या बाजूंनीं घेतलेलीं चित्रें व त्याचे अक्षिपट (bioscopes) नायगऱ्याला डोळ्यांसमोर मूर्तिमंत करूं लागले. जसजस नायगऱ्याचें दर्शन याप्रमाणें वाढूं लागलें तसतशी लहानपणीं अैकलेल्या गिरसप्पाच्या धबधब्याची मानसपूजा वाढत गेली. मग जेव्हां कळलें कीं, नायगरा केवळ १६४ फूट अुंचीवरून खालीं पडतो आणि आमच्या गिरसप्पाची अुंची ९६० फूट आहे, तेव्हां मला केवढा अभिमान वाटला! सर्वांत मुख्य व जगांत सर्वांत अुंच असा पर्वत हिंदुस्थानांत आहे. नदीविषयीं सुद्धां असेंच म्हणतां येअील. सिंधु, गंगा व ब्रह्मपुत्रा यांच्यासारख्या नद्यांचा कोठल्याहि देशाला अभिमान वाटावा. सर्वांत लांब नदी आपल्याच येथें आहे हें सिद्ध करण्यासाठीं अमेरिकेला दोन नद्यांच्या लांबीची बेरीज करावी लागली! मिसूरी व मिसिसिपी यांना वेगळ्या करून त्यांची लांबी मोजली तर ती किती भरेल? ज्याप्रमाणें हिंदुस्थानचा अितिहास पृथ्वी-तलावर सर्वांत जुना आहे त्याचप्रमाणें हिंदुस्थानची भूरचनाहि साऱ्या जगांत अद्‌भुत आहे.

हिंदुस्थान काय अेका धबधब्याच्या बाबतींत हार खाअील? साऱ्या जगानें असें मान्य केलें आहे कीं, अशोकासारखा दुसरा सम्राट् झाला नाहीं. तद्वत् भूगोलांत सुद्धां लोकांना मान्य करणें भाग आहे कीं, भव्यतेत गिरसप्पाचा (त्याचें खरें नांव जोग आहे) पंक्तींत बसेल असा अेकहि धबधबा नाहीं.

कारकळ राजकीय परिषदेसाठीं मी दक्षिण कानड्यांत गेलों होतों, तेव्हां मनांत आशा बाळगली होती कीं, अगुंबा घाट चढून शिमोग्यावरून गिरसप्पा पाहण्यास जाअूं. पण तसें घडलें नाहीं. मी निराश झालों; वाटलें कीं, चिरसंचित आशा शेवटीं कायमची वंचित झाली आणि गिरसप्पाचें दर्शन मला आतां मनांतल्या मनांतच घेणें भाग आहे!

"मनसा चिन्तितं कार्यं दैवेनान्यत्र नीयते।"

पण अेवढें मात्र जाणून घेतलें होतें कीं, जोग म्हैसूर संस्थानच्या सीमेवर आहे. तेथें जाण्याचे मार्ग दोन. वरचा मार्ग शिमोगा-सागरवरून आणि दुसरा मुखाकडचा. त्यानें होन्नावर बंदरावरून होडींत बसून राना-

वनांतून पार व्हावयाचें आणि गिरसप्पा खेड्यापर्यंत जावयाचें आणि तेथून घाट चढावयाचा. दोन्ही बाजूंनीं जाऊन आलेले लोक सांगतात कीं, अेका बाजूची शोभा दुसरीकडे मिळावयाची नाहीं. अेकीपेक्षां दुसरी वरचढ किंवा अुतरती असें मुळींच म्हणतां येणार नाहीं. आज मला मान्य करणें भाग आहे कीं, मीं जोगचें अर्धेंच दर्शन घेतलें आहे.

गुजरात जलप्रलयाच्या संकटांत सांपडला होता त्याच वेळीं गांधीजी बंगळुरास आजारी होते. मी त्यांना भेटण्यास गेलों होतों. तेथून म्हैसूर संस्थानांत फिरत फिरत गांधीजी सागरपर्यंत गेले होते. बरोबर श्री. गंगाधरराव व राजगोपालाचार्य होते. सागरला गेल्यानंतर गिरसप्पा बघायला न जाणें मला अगदीं अशक्य होतें. मोटारीनें केवळ अेका तासाचीच वाट. शिमोगा येथें तुंगेच्या तीरावर फिरावयास गेलों तेव्हां मीं गांधीजींना आग्रह केला कीं, "आपण गिरसप्पा पाहण्यास कां चलत नाहीं? लॉर्ड कर्झन केवळ गिरसप्पा पाहण्यासाठींच या बाजूला बुध्द्या आले होते. आपलें पुनः अिकडे कधीं येणें होणार?" गांधीजी म्हणाले, "मला तेवढा सुद्धां स्वच्छंद करतां येणार नाहीं. तुम्ही अवश्य जा. तुम्ही पाहून याल तर विद्यार्थ्यांना भूगोलाचा अेखादा धडा तरी शिकवाल." मीं पुनः म्हटलें, "पण या जगामध्यें हें अेक अद्भुत दृश्य आहे. नायगऱ्यापेक्षां जोग सहापट अुंच आहे. ९६० फुटांवरून पाणी खालीं पडतें! आपण अेकदां तरी पाहिला पाहिजे." गांधीजींनीं विचारलें, "पावसाचें पाणी आकाशांतून पडतें तें किती अुंचीवरून पडतें?" मी मनांत म्हटलें. यांना ललचावणें व्यर्थ आहे.

"स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ।"

मला माहीत होतें कीं, संगीताप्रमाणेंच सृष्टिसौंदर्याचीहि गांधीजींना पराकाष्ठेची आवड आहे. फिरावयास गेलों असतां सूर्यास्ताची किंवा ढगांतून लुकलुकणाऱ्या अेखाद्या अेकाकी नक्षत्राची शोभा त्यांनीं मला कधींच दाखविली नव्हती असें नाहीं. पण जनसेवेसाठीं बाहेर पडलेले गांधीजी मनास येअील तसें कसें वागतील?

"कुलशिखरिणः क्षुद्रा नैते न वा जलराशयः ।"

या अेका गोष्टीचा असा निकाल लागल्यावर मी दुसरी पुढें ठेविली. "आपण येत नाहीं म्हटल्यावर महादेवभाअी सुद्धां येत नाहींत. आपण

त्यांना सांगाल तरच ते येतील." "महादेवाची अिच्छा असेल तर खुशाल त्यानें तुमच्याबरोबर जावें; माझी ना नाहीं. पण तो येणार नाहीं. मीच त्याचा गिरसप्पा आहें!"

आम्ही बाकीचे लोक व्यावहारिक आदर्शाला भजणारे! चर्मचक्षूंनीं पर्वतावरील धबधबा पाहिल्याशिवाय आमचें समाधान झालेंच नसतें. म्हणून जेवणापूर्वींच आम्ही सागरहून निघालों आणि मोटरींतून अरण्याचा मार्ग कापीत सुटलों. डोंगर पोखरून आगगाडीसाठीं बोगदे तयार करण्यांत येतात तेव्हां आपणांस फार आश्चर्य वाटतें. पण मुंबअीच्या वस्तींपेक्षांहि भरगच्च अशा सह्याद्रीच्या रानावनांतून रस्ता तयार करणें अधिक अवघड काम आहे. तेथें तुमचा डायनामाअिट (सुरुंग) चालत नाहीं. बुंधा कापल्यानंतर सुद्धां अेक अेक झाड फांद्यांच्या जाळ्यांतून मोकळें करणें हें काम हिंदु-मुसलमानांमधील भांडण मिटविण्याअितकेंच कठीण आहे. खंडाळ्याच्या घाटांतील खोल बोगद्यांत मध्यभागीं पोंचल्यावर जी अेक प्रकारची भयानक रमणीयता मनुष्याच्या अनुभवाला येते तीच स्थिति या अरण्यांत अनुभवास येते. असल्या अरण्यांत शोभणारे प्राणी म्हणजे हत्ती, वाघ व अजगर. त्यांत माणूस अितका क्षुद्र प्राणी भासतो कीं, तो येथें कोठून चुकून आला असेंच वाटूं लागतें. असो.

अरण्य ओलांडून अेकदांचें आम्ही शरावतीच्या तीरावर आलों. या भागांत तिला भारंगी असेंहि म्हणतात. भारंगी म्हणजे बारगंगे. या नदीचें माहात्म्य गंगानदीपेक्षां बारापट आहे असें येथील लोक मानीत असल्यास आपण त्यांच्याशीं भांडणार नाहीं. प्रत्येक मुलाला आपलीच आअी सर्वश्रेष्ठ वाटणार! झिमझिम पाअूस पडत होता. येथें जसे गगनभेदी महावृक्षही होते, तशींच लहानमोठीं झुडपेंहि होतीं. अमर तृणहि होतें आणि भुअीवर व झाडांच्या जून सालीवर अुगवणारें शेवाळहि होतें. समोरच्या कांठावर लहानमोठीं झाडें नदीचें पाणी कितीसें गार आहे अथवा खोल आहे हें पाहण्यासाठीं आपले पर्णाच्छादित हात पाण्यांत बुडवीत होतीं; आणि धुक्याचे कित्येक ढग आळशी पोळांसारखे अिकडून तिकडे मस्तपणें भटकत होते.

नदी पाहतांच पहिला प्रश्न हा अुपस्थित होतो कीं, ही नदी कोठून आली आणि कोठें जात आहे? मला सदानूकदा नदी कोठून आली हाच

प्रश्न प्रथम समोर दिसतो. पुष्कळांना असेंच वाटत असेल. काय बरें त्याचें कारण? नदी कोठें जाते हें शोधून काढणें सोपें आहे. स्वतःस नदींत सोडून दिलें कीं ती अनायासें आपणाला बरोबर घेऊन जाते. धीर होत नसेल तर अेखाद्या झाडाचें खोड पोखरून बरोबर घेतलें म्हणजे झालें. पण नदी कोठून येते तें पाहण्यास प्रतीप गतीनें जावें लागतें. ही गोष्ट ऋषीच करूं शकतात. भारंगीचें अथवा शरावतीचें पाणी पर्वतांतून येत आहे कीं ढगांतून अशी शंका अुत्पन्न व्हावी असें त्या दिवशींचें तें दृश्य होतें.

होडींत बसून आम्ही पलीकडच्या कांठावर गेलों. कांठावरच्या जमिनीवरून कितीतरी वाळझरे अुडया घेत घेत नदींत पडत होते! त्यावरून आम्हीं स्वाभाविकपणेंच अनुमान काढलें कीं, आदल्या दिवशीं पाऊस पडून नदीचें पाणी खूप वाढलें असावें. आज तें जवळ जवळ ५ फूट अुतरलें होतें. आम्हांस खालीं अुतरवून होडी बाकी राहिलेल्यांना आणण्यासाठीं परत गेली. शांत पाण्यांत वल्ह्यांचा डब् डब् आवाज करीत होडी येरझाऱ्या करीत होती, तें दृश्य किती मजेदार होतें! आणि आपल्या प्रियजनांना होडी जेव्हां स्वतःच्या पोटांत स्थान देऊन खोल पाण्याच्या पृष्ठभागावरून ओढीत घेऊन येते, तेव्हां चिंतेचें कांहींच कारण नसतांहि मनाला भीति वाटल्याशिवाय राहत नाहीं. राजगोपालाचार्य आपल्या मुलाला व मुलीला बरोबर घेऊन होडींत बसत होते, तेव्हा मीं त्यांना सांगितलें कीं, "अेका कुटुंबांतील सारींच माणसें अेका होडींत बसणें योग्य नाहीं, असें वाडवडिलांनीं सांगितलें आहे. आमच्याबरोबर बापानें तरी यावें नाहींतर मुलानें; दोघांनीं अेकदम येऊं नये." आमचे सोबती या चालीची चर्चा करूं लागले. कोणाला हींत प्रतिष्ठेचा दर्प आला तर कोणाला दुसरेंच कांहीं सुचलें. सर्वनाशाचा संभव टाळण्यासाठीं हा नियम करण्यांत आला आहे अितकी साधी गोष्ट मात्र कोणाच्याच ध्यानांत आली नाहीं. मला त्याचें स्पष्टीकरण करून सभोंवतालीं विषण्णता आणणें बरें वाटलें नाहीं, म्हणून वाडवडिलांची निंदा अैकत अैकतच मी पैलतीरास पोंचलों! होडी प्रवाहाच्या मध्यावर पोंचली तेव्हां मंत्र म्हणून आचमन करण्यास मी विसरलों नाहीं. नदीच्या दर्शनाबरोबर स्नान, पान व दान हे विधि झालेच पाहिजेत. तरच नदीचा साक्षात्कार झाला असें म्हणतां येअील.

दुसरी तुकडी येअून पोहोंचली. आम्ही अुजवीकडील वाटेनें चालूं लागलों. नदीचा तो डावा कांठ होता. रस्त्यावरील मोठमोठीं झाडें मशीदीच्या खांबांप्रमाणें सरळ अुंच जात असलेलीं पाहून आम्हांला आनंद वाटला. आमची टोळी अेवढी मोठी होती कीं, त्या निर्जन अरण्यांत पाहतां पाहतां आमचा गप्पाविनोद व आमचें अट्टहास्य यांनीं चारहि दिशा दणाणून गेल्या! पण किती वेळ? आम्ही थोडें दूर गेलों नाहीं तोंच नदीनें आपला गंभीर ध्वनि कानीं पाडला. या ध्वनीला कशाची अुपमा द्यावी? अितका गंभीर आवाज दुसरीकडे कोठें अैकला असेल तर अुपमा सुचेल ना? मेघगर्जना भीषण असते खरी, आणि ती सारें आकाश व्यापून टाकतें हेंहि खरें; पण ती सतत टिकत नाहीं. येथें तुम्ही अैकून थकलांत तरी आवाज थांबावयाचा नाहीं. काय, या ठिकाणीं ढग फुटत आहेत? कीं तोफा अुडत आहेत? कीं पर्वतावरील मोठमोठ्या खडकांच्या लाह्या फुटत आहेत? कीं नदी आपलें ध्यानमौन सोडून महारुद्राचा स्तवराज गात आहे?

आतां दृश्य कसें दिसेल, आतां कसला देखावा पाहावयास मिळेल, अशा तीव्र अुत्कंठेनें आम्ही डोळे ताणून चोहींकडे पाहत पाहत पथिकाश्रमापर्यंत पोंचलों. जेथून धबधब्याचें दर्शन सर्वांत अुत्कृष्ट प्रकारें होतें त्याच ठिकाणीं म्हैसूर-सरकारनें ही अतिथिशाळा बांधली आहे. ज्यावरून निरीक्षण करावयाचें त्या चबुतऱ्यावर आम्ही जाअून पोंचलों. पण काय? सर्वव्यापी धुक्याशिवाय कांहींच दिसेना, आणि धबधब्याचा गंभीर ध्वनि तर सारी दरी दणाणून टाकीत होता! भर दुपारीं सुद्धां सूर्यदर्शन होत नव्हतें. जिकडे पाहावें तिकडे धुकेंच धुकें! धुक्याचे लोटच्या लोट जणूं काय कुरुक्षेत्रावरील महायुद्धाची दंगल माजवीत आहेत आणि जोग त्याला आपल्या तालाचा 'जोग' (योग=साथ) देत आहे! अितक्या आशेनें यावें आणि अशी निराशा व्हावी असें पूर्वी कधीं घडलें नव्हतें. मिनिटांमागून मिनिटें धावूं लागलीं आणि आमच्या निराशेबरोबर धुकेंहि वाढतच चाललें! शेवटीं आम्ही मौन सोडून आपसांत बोलूं लागलों. बोलावयास कांहीं खास विषय होता असें नाहीं. पण निराशेची पोकळी भरून काढण्यास कांहींतरी हवें होतें अितकेंच.

इंद्रदेव कोपला आहे कीं वरुणदेव चिडला आहे याचा मी विचार करीत होतों, अितक्यांत वायुदेवानें साह्य केलें आणि अेक क्षणभर – केवळ

क्षणभरच – धुक्याचा तो जाड पडदा दूर झाला; आणि ज्या देखाव्यासाठीं जन्मभर तळमळ लागून राहिली होती तो अद्‌भुत देखावा दृष्टीस पडला! महादेवाच्या डोक्यावर गंगा अवतरावा तसा अेक मोठा धबधबा खालच्या कड्यामधून बाहेर पडलेल्या हत्तीसारख्या खडकावर पडून आपटून पाण्याचा चक्काचूर करीत दश दिशांना त्याच्या चिळकांड्या सोडीत आहे!

छे! या देखाव्याचें वर्णनच करतां येत नाहीं. आश्चर्यमग्न होअून माझ्या तोंडातून अुद्गार निघाले:—

"नमः पुरस्ताद्, अथ पृष्ठतस्ते; नमोऽस्तु तें सर्वत अेव सर्व!।
अनन्तवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि; ततोऽसि सर्वः ॥"

तत्क्षणींच समोरचा हत्तीअेवढा दगड डोक्यावरील धबधब्याच्या जटा अुडवीत अुद्गारला:—

"सुदुर्दर्शम् अिदं रूपं दृष्टवान् असि यन् मम।
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकाङ्क्षिणः ॥"

धुक्याचा पडदा पुनः पहिल्यासारखा जमून बसला; आणि आम्हीं पाहिलें तें 'स्वप्न होतें, कीं माया होती, कीं मतिभ्रम होता,' अशी आमची स्थिति होअून गेली! अेवढी विस्तीर्ण दरी, तें रुंद पात्र, ती भयंकर खोली, आणि यांच्यामध्यें पिठाचा नव्हे मैद्याचा—तो आश्चर्यकारक धबधबा! सारेंच दृश्य कल्पनातीत होतें. अुघड्या डोळ्यांनीं पाहतों तें खरोखरीचें आहे अशी प्रतीति दृढ होण्यापूर्वींच धुक्याचा क्षीरसागर पुनः पसरला आणि समोरच्या काव्यासमवेत आम्हीहि त्यांत बुडून गेलों!

आतां कोणीच कोणाशीं बोलेना. जें आतां पाहिलें त्यावर सारे विचार करूं लागले. कांहीं नव्हतें त्यांतून अेवढी अुंच व खोल सृष्टि कोठून अस्तित्वांत आली आणि बघतां बघतां पुनः कोठें अदृश्य झाली याच आश्चर्यांत आम्ही गुंग झालों.

मनांत म्हटलें, "कां होअीना, अेक क्षणभर तरी, जें पाहण्यास आलों तें पाहिलें—विलक्षण रीतीनें पाहिलें; त्या क्षणमात्र झालेल्या दर्शनाचें स्मरण व ध्यान करण्यांत वाटेल तितक्या घटकांच्याघटका घालवितां येतील."

अितक्यांत तो शुभ्र जटाधारी खडक पुनः निनादला:—

"व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥"

धुक्याचें आवरण दूर झालें आणि आतां या टोकापासून त्या टोकापर्यंत सर्वच स्पष्ट दिसूं लागलें. समोरून थेट डाव्या टोकाला 'राजा' धबधबा अर्धचंद्राकार शिळेवरून खालीं अुडी घेत होता. त्याचें पाणी पावसाळ्यांतील चिखलानें कॉफीच्या रंगासारखें दिसत होतें. पण जास्तींत जास्त पाणी राजालाच मिळतें. छाती फुलवीत फुलवीत जेव्हां तो तीरासारखा सरळ खालीं पडतो तेव्हां निसर्गाची शक्ति किती अतुल आहे याची कल्पना येते. 'राजा' धबधब्याचा विस्तारही कांहीं लहानसहान नाहीं; आणि त्याच्या दोनहि अंगांस मोठमोठ्या मोत्यांचे किती तरी सर लोंबत धावतात ! खरोखर हा धबधबा 'राजा' या नांवाला सर्वपरीनें पात्र आहे.

त्याच्या शेजारच्या धबधब्याचें दर्शन मला सर्वांत अगोदर झालें होतें; आणि मीं ताबडतोब त्याचें 'रुद्र' हें नांव ठेवलें. त्याचा भीषण ध्वनि अैकल्यावर आणि त्याची जटा पाहिल्यावर दुसरें नांव सुचावयाचेंच नाहीं.

थेट अुजव्या अंगास अेक सडपातळ धबधबा आहे. त्याची कंबर फारच बारीक आहे म्हणून त्याचें नांव मीं 'पार्वती' ठेवलें. पोटभर पाहून घेतल्यावर पुनः आमच्या गोष्टी चालू झाल्या. आपण स्वतः जें कांहीं पाहिलें असेल तें दुसऱ्यास दाखविण्याची हौस ज्याला वाटणार नाहीं तो मनुष्य मनुष्यच नव्हे. मनुष्य संचारशील आहे, संवादशील आहे; आपण ज्याचा अनुभव घेतला त्याचा अनुभव दुसरेहि घेतात—घेअू शकतात—अशी खात्री झाल्याशिवाय त्याला पूर्ण संतोष होत नाहीं. राजाजींनीं माझें लक्ष वेधलें, "अिकडे खालीं तर पाहा ! थंड वाफेचे हे लोटच्या लोट कसे वर अुसळून येत आहेत !" देवदास म्हणाला, "ते पक्षी पाहा ! कसे निर्भयपणें अुडत आहेत !" मणिबेननीं असेंच कांहींतरी म्हटलें आणि लक्ष्मीनें आपल्या अण्णाला तामिल भाषेंत असेंच कांहीं तरी कळवून आपला आनंद व्यक्त केला. आमच्याबरोबर अेक गृहस्थ होते ते वाटेंत विनाकारण चिडले होते. आम्ही जेव्हां या स्वर्गीय दृश्याच्या आनदांत वेडे होअून गेलों होतों तेव्हां ते गृहस्थ आपणच मानून घेतलेला अपमान मनांत चघळीत होते ! चंद्रशेकरांनीं त्यांच्या त्या अवस्थेकडे माझें लक्ष वेधलें. मी मनांत म्हणालों :—

"पत्रं नैव यदा करीर-विटपे दोषो वसंतस्य किम् ।
नोलूकोऽप्यवलोकते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणम् ॥"

या जगांत निराशा, अुपासमार, पराजय, अप्रतिष्ठा किंवा वियोग हीं खरीं दुःखें नाहींत; पण अहंकार हेंच सर्वांत मोठें दुःख आहे. अहंकार-रोग मोठ्या धन्वंतऱ्यासहि दूर करवणार नाहीं.

त्या गृहस्थाच्या अनेक प्रकारच्या मानसिक अढी व विकृति मला विदित होत्या. म्हणून गिरसप्प्याच्या धबधब्यासमोरसुद्धां त्याला कांहीं वेळ दिल्याशिवाय माझ्यानें राहवलें नाहीं. मीं त्याला गिरसप्प्याची थोडी माहिती दिली आणि त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न केला.

'राजा'-जोगच्या मागल्या पोकळींत शेकडों पक्षी राहतात आणि दूरदूरच्या शेतांतून टिपून आणलेल्या 'अुच्छिष्ट' दाण्यांचा संग्रह करतात. तो संग्रह अेवढा मोठा असतो कीं, सरकार त्याचा लिलांव करतें असें अेकदां कोणाकडून तरी आम्हीं अैकलें होतें. मधमाशांचा मध लुटणारे मानवी प्राणी पक्ष्यांचाहि धान्यसंग्रह लुटतात यांत आश्चर्य तें काय? जो संग्रह करतो तो लुटला जावा अशी सृष्टीचीच व्यवस्था दिसते : "परिग्रहो भयायैव ।"

पुनः धुकें पसरलें आणि मला अंतर्मुख होअून विचारांत बुडी मारण्याची संधि मिळाली. अशा भव्य देखाव्याचें रहस्य काय असावें? भूगोलशास्त्रज्ञ व भूस्तरशास्त्रज्ञ चटकन् सांगतील कीं, येथील पहाड निस् जातीच्या दगडांच्या थराचा बनला आहे. दरींतून अेखादी कपारी तुटून पडून त्यामुळें आसपासची माती धुवून गेली असावी. अेकदां धबधबा चालू झाला कीं खालच्या भुअीला तो अधिकाधिक खोल खोदीत जाणार आणि जेथून धबधबा चालू होतो त्या कोपऱ्याला घाशीत जाणार. वरचें कपाळ जर कठीण दगडाचें असेल तर अुंची हजारों वर्षें टिकेल. धबधब्यापासून समुद्र फार दूर नसल्यामुळें नदीचा पुढला भाग साफ झाला आहे आणि धबधब्याची अुंची टिकून राहिली आहे. हें धबधब्याचें जड रहस्य झालें. अेखाद्या आधुनिक यांत्रिकाला विचाराल तर तो म्हणेल, अेकट्या गिरसप्प्याच्या धबधब्यांत अेवढें प्रचंड सामर्थ्य आहे कीं, म्हैसूर व दोन्ही कानडा जिल्ह्यांना हवी तेवढी शक्ति तो पुरी पाडील. मग तुम्ही

त्यांतून वीज अुत्पन्न करा, कारखाने चालवा, प्रत्येक नगराला व गांवाला प्रकाशित करा, आणि तुमच्या स्वतःच्या किंवा अितर प्रांतांतल्या वाटेल तेवढ्या लोकांना बेकार ठेवून अुपाशीं मारा.

निसर्गापासून जो कांहीं लाभ होतो तो भूमातेच्या सार्‍याच लेकरांनीं आपसांत सलोख्यानें वांटून घ्यावा आणि जीवनयात्रेचें ओझें हलकें करावें अशी बुद्धि माणसाला सुचेल तेव्हांची गोष्ट वेगळी; पण आज मात्र मनुष्याच्या हातीं कोठल्याहि प्रकारची शक्ति आली कीं लागलीच तो दुसर्‍या मनुष्यांवर सरशी करण्याचाच प्रयत्न करतो. मग ती सरशी त्यांना मारून मिळो, गुलाम बनवून मिळो अथवा त्यांना अर्धपोटी राबवून मिळो.

म्हैसूरचें राज्य सुधारलेलें आहे. मोठमोठ्या अेंजिनियर लोकांनीं तेथील समृद्धि वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. सार्‍या जगाला चंदनाच्या तेलाचा पुरवठा म्हैसूर संस्थानाकडून होतो असें म्हटल्यास विशेष अतिशयोक्ति होणार नाहीं. हिंदुस्थानांतील सर्वांत मोठ्या सोन्याच्या खाणी म्हैसूरमध्येंच आहेत. भद्रावती येथील लोखंडाच्या कारखान्याची कीर्ति वाढतच आहे; आणि कृष्णसागर तलाव हा मानवी पराक्रमाचा अेक सुंदर नमुना आहे. अशा या म्हैसूर संस्थानाला गिरसप्प्याच्या धबधब्यापासून पैसा अुकळण्याचें सुचलें नसेल हें शक्यच नाहीं. पण आतांपर्यंत ती गोष्ट सिद्ध झाली नाहीं अितकेंच. अेवढ्या शक्तीचा अुपयोग कशा रीतीनें करून घ्यावा तें सुचलें नाहीं, कीं सीमाप्रकरणींचें भांडण आडवें येतें, कीं तिसरेंच कांहीं कारण आहे तें मी आतां विसरून गेलों आहे.

पण अेवढें खरें कीं, गिरसप्प्याची शोभा अद्यापि होती तशी भव्य राहिली आहे. भगिनी निवेदिता यांनीं केलेल्या प्रसिद्ध तुलनेची येथें आठवण होते. कोठल्याहि स्थळाच्या रमणीयतेनें हिंदी मनुष्याला आकृष्ट केलें कीं त्यानें लागलीच त्याला धार्मिक स्वरूप दिलेंच म्हणून समजावें. कोठलेंहि आश्चर्यकारक, रमणीय किंवा भव्य दृश्य पाहतांच हिंदी हृदयाला वाटतें कीं, गाअीनें वासराला बोलवावें त्याप्रमाणें हा परमात्मा जीवात्म्याला बोलावीत आहे. नायगर्‍याचा धबधबा जर हिंदुस्थानांत गंगामातेच्या प्रवाहामुळें झाला असता तर येथील लोकांनीं त्याच्याभोंवतीं कशा प्रकारचें वातावरण निर्माण केलें असतें ? आमोद–प्रमोद व वनभोजनें करणार्‍या

टोळ्या किंवा आगगाडीचे प्रवासी यांच्या अैवजीं धबधब्याची पूजा करण्यासाठीं वार्षिक अथवा मासिक यात्रेकरूंचे थवेच्या थवे येथें गोळा झाले असते ! भोगविलासाचीं सर्व साधनें पुरविणाऱ्या पथिकाश्रमांच्या (हॉटेलांच्या) अैवजीं धबधब्याच्या कांठीं, किंवा त्याच्या मधोमध सुद्धां, अुचंबळलेल्या हृदयांतील भक्तिभाव ओतण्यासाठीं त्यांनीं मोठमोठीं देवळें अुभारलीं असतीं. सृष्टीचें वैभव पाहून चित्रविचित्र सुखविलास किंवा मौजमजा अुडविण्याअेवजीं लोकांनीं येथें तपश्चर्या केली असती; आणि अेवढ्या प्रचंड शक्तीला मानवी द्रव्यलाभ व सुखसोयी यांसाठीं बंदिस्त करून ठेवण्या-अैवजीं निसर्गाशीं तद्रूपता अनुभवितांना येणाऱ्या धुंदींत भैरव-झेंप घेअून पाण्याच्या प्रवाहांत आपला जीवनप्रवाह मिसळून देण्याचें त्यांना सुचलें असतें. स्वभावभिन्नतेंत आतां कांहीं बाकी राहिलें आहे ?

पण निसर्गाचा भव्यपणा पाहून त्यांत आपला देह सोडून देणें यांत काय आध्यात्मिकता आहे ? देहाचीं बंधनें तुटून पडावीं, 'वाटेल तें करावें लागलें तरी तें करून जगेन,' अशा प्रकारची पामर जीवनाशा मनुष्यानें टाकून द्यावी यांत आध्यात्मिक प्रगति आहे यांत शंका नाहीं. पण ही वृत्ति स्थायी असली पाहिजे. क्षणिक अुन्मादांत कांहींच अर्थ नसतो. भव्यतेपुढें वेडावून आत्मार्पण करण्याची अिच्छा मनुष्यांत कधीं कधीं अुत्पन्न होतेच. अिच्छाची ती अेक विकृति आहे. तींत आध्यात्मिक तत्त्वाची थोडीशी झांक असलेली पाहून तिचें वेड लागणें हें मात्र मनुष्यजीवनाच्या महत्तेला शोभत नाहीं. भगवान् बुद्धानें आपल्या अचूक दृष्टीनें तिला विभवतृष्णा हें नांव देअून तिचा धिक्कार केला आहे. येथें विभव म्हणजे नाश. भगवान् मनूंनीं सुद्धां हीच गोष्ट स्पष्ट शब्दांत सांगितली आहे :—

"नाभिनन्देत मरणं नाभिनन्देत जीवितम् ।"

गिरसप्पा येथील जोगसारख्या रोमहर्षण दृश्याच्या सहवासांत यंत्रें, अश्वशक्ति (हॉर्सपॉवर), विद्युत्प्रकाश व कारखाने यांचा विचार करणें म्हणजे आत्म्याला विसरून बाह्य वैभवाचें ध्यान करण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. पण आजूबाजूचा प्रदेश दुष्काळानें पीडित असेल, लोक अनेक प्रकारच्या रोगांना बळी पडत असतील, आणि या धबधब्याच्या पाण्याचा

दुसऱ्या कोणत्या तरी रीतीनें अुपयोग करूनच प्रजेचें हें दुःख दूर करण्याचा अुपाय सांपडत असेल, तर आपण अशा वेळीं कशा प्रकारचा आग्रह धरावा? सृष्टिसौंदर्याचा रसास्वाद घेणाऱ्या आपल्या चित्ताचें आह्लादकर साधन असा जो हा धबधबा, त्याला तसाच ठेवावा कीं आपद्ग्रस्त अशा आपल्या बंधुबांधवांना दुःखमुक्त करण्यासाठीं त्याचें बलिदान करावें? पुरेसें धान्य मिळत नाहीं अशा ठिकाणीं धान्याची शेती सोडून गुलाबांचे बगीचे अुठवून दिले तर त्यामुळें आपला हृदयविकास होअील काय? गुलाबांत भूमातेचें काव्य आहे, धान्यांत कारुण्य आहे; दोहोंतून कोणतें पसंत करावें? इंग्लंडच्या अेका प्राचीन राजानें पुष्कळ खेडीं अुध्वस्त करून मृगयेसाठीं त्यांचें अेक मोठें अुपवन तयार केलें. तो राजा पौरुषयुक्त विनोदाचा भोक्ता होता यांत शंका नाहीं. पण त्याला प्रजासेवक म्हणतां येअील किंवा नाहीं हा प्रश्नच आहे. तेव्हां काव्य व कारुण्य यांतील कोणत्या वृत्तीचा परिपोष करावा हें निश्चित करावयाचें असेल त्यावेळीं कोणत्या निकषावर घासून निर्णय द्यावा? रोम जळत आहे व नीरो सारंगी वाजवीत बसला आहे, आणि मिथिला जळत आहे व जनक राजा आध्यात्मिक चर्चा करीत बसला आहे यांत अंतर आहे. प्रजेची सेवा यथाशक्ति केल्यावर व्यर्थ चिंता करीत हृदय जाळण्याअैवजीं हृदयांतील अंतर्यामीचें स्मरण दृढ करण्याचा प्रयत्न करणें हें आर्यवृत्तीचें द्योतक होय. मूठभर लोकांच्या विलासासाठीं अथवा अैश्वर्यासाठीं निसर्गाच्या शक्तीचा अुपयोग करून घेणें आणि प्राकृतिक सौंदर्याचा नाश करणें हा अधर्म होय. पण आर्ति-नाशनाच्या योगानें होणारा हृदयविकास सोडून प्रकृतीच्या विभूति-दर्शनामधून तो प्राप्त करून घेण्याची अिच्छा बाळगणें अिष्ट आहे कीं काय ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे.

ते रुसलेले गृहस्थ स्वतःच मानून घेतलेल्या अपमानाच्या भणभणींत समोरील दृश्य विसरून गेले होते आणि मी माझ्या तात्त्विक कल्पनाविहारांत शून्य दृष्टीनें समोर पाहत होतों. दोघेहि अभागी होतों. कारण, कल्पना अथवा भणभण चालू ठेवण्यास नंतर वाटेल तितका वेळ मिळाला असता. पण धुक्याचा पडदा पुनः पसरला; आतां धबधबा पुनः थोडाच दिसणार आहे?



जोगचा धबधबा – गिरसप्पा



गिरसप्पा

राजाजी म्हणाले, "अुन्हाळ्यांत जेव्हां धबधबा पडतो तेव्हां पाण्याच्या तुषारांवर नानातऱ्हेचीं इंद्रधनुष्यें दिसतात. त्यावेळची शोभा सर्वस्वीं निराळीच असते." आणि चांदण्या रात्रीं सुद्धां धनुष्यें दिसत नाहींत असें नाहीं. म्हैसूरच्या सर्वसंग्रहांत (गॅझेटियर मधें) लिहिलें आहे कीं, गवताचे मोठमोठे भारे पेटवून धबधब्यांत सोडून दिल्यानें अंधाऱ्या रात्रीं साऱ्या दरीनें पेट घेतला आहे असा भास होतो! कित्येक लोकांनीं रात्रीं दारूचे पुष्कळ बाण सोडून येथें मोठीच मजा लुटली आहे.

खोडकर आणि चळवळ्या मानवी प्राणी काय करणार नाहीं? मला मात्र असलें कांहींच आवडत नाहीं. निसर्ग जें अन्न वाढतो त्याची स्वाभाविक रुचि अनुभविण्यांतच खरी रसिकता आहे. मानवी मसाला मिसळल्यानें स्वाद व पचनशक्ति दोन्ही बिघडतात.

आतां आम्ही बंगल्यांत येअून पोंचलों. बरोबर खावयाचें आणलें होतें तें अुदरस्थ केलें. येथील पाणी मात्र पितां कामा नये. लागलीच हिंवताप लागतो. बहुतेकांनीं अून अून कॉफी पिअून तहान भागविली. मीं मात्र त्या दिवशीं चातकाप्रमाणें पावसाचे थोडे थेंब पिअूनच संतोष मानला.

पुन्हा: अेकदां धबधब्यांचें दर्शन घेअूनच आम्ही परत फिरलों. आतां मला आठवण झाली कीं, धबधबे तीन नसून चार आहेत. डाव्या बाजूचा पहिला सरळ मोठा तो 'राजा'. त्याच्या शेजारीं अुजव्या अंगास आक्रोश करीत त्याला येअून मिळणारा 'रोअरर' तो आपला 'रुद्र'. डोक्यावर कारंजासारखी पांढरी पिंजारलेली जटा धारण केलेला तो 'रॉकेट'; त्याला आतां 'वीरभद्र' म्हटल्याशिवाय गत्यंतर नव्हतें. आणि शेवटच्या लहान धबधब्याचें तन्वंगी 'पार्वती' हेंच नांव मीं निश्चित केलें. इंग्रजांनीं रुद्राला 'रोअररर', वीरभद्राला 'रॉकेट' व पार्वतीला 'लेडी' अशीं नांवें दिलीं आहेत.

आतां आम्ही जड पायांनीं मागें फिरलों. पायांना जळवा डसण्याची भीति होती. येथल्या लोकांनीं आम्हां सर्वांना सूचना दिलीच होती कीं, "संभाळून चाला. जळवा डसल्या तर कळणार सुद्धां नाहीं आणि रक्त शोषिलें जाअील." मीं म्हटलें, "त्याची चिंता नका करूं. इंग्रजांना सुद्धां ओळखूं लागलों आहों ते काय जळवांपासून सावधगिरी बाळगणार नाहीं?" तरीहि बहुतेक सर्वांच्या पायांना अेक अेक जळू डसलीच! माझ्या शरीरांतील

रक्ताचें फारसें आकर्षण नसल्यानें म्हणा किंवा माझें रक्त कडू असल्यानें म्हणा, अथवा मी काकदृष्टीनें बघून बघून चालत होतों म्हणून म्हणा, मी मात्र बचावलों खरा. आम्ही थोडे पुढें गेलों, पण मणिबेनच्यानें राहवलें नाहीं. "जरा थांबा, पुनः अेकदां जमल्यास धबधब्याचें दर्शन घेअून येतें." "पण धुकें अुडालें नाहीं तर?" "अुडालें नाहीं तर नाहीं; परत येअू! पण अेकदां पाहूं तर द्या."

परत फिरतांना रस्त्याला अेक फाटा फुटला होता, त्या वाटेनें जाअून कित्येकांनीं पार्वतीचें जवळून दर्शन घेतलें; आणि तेथें भुअी निसरडी असल्यामुळें आअी पार्वतीला "वन्दे मातरम्" म्हणून साष्टांग नमस्कार सुद्धां घातला!

जातेवेळीं ज्या मार्गानें अज्ञात व अननुभूत अवस्थेचें काव्य अनुभविलें होतें त्याच मार्गानें परत येत असतांना संस्मरणाचें स्मृतिकाव्य अनुभवूं लागलों. अर्थात् तेच देखावे अुलट्या दिशेनें पाहण्यांत नाविन्य कमी नव्हतें. जातेवेळीं ज्या झाडांच्या विषयीं आम्ही बोललों होतों तींच झाडें परत फिरतांना आमचें लक्ष वेधीत होतीं. आणि त्या परिचित मित्रांना "कसें काय?" असा प्रश्न केल्याशिवाय आमच्यानें पुढें जाववेल तरी कसें? आणि झाडाझाडांमधून प्रेमाचे पूल बांधणाऱ्या वेली! त्यांच्या नम्रतेला नमन केल्याविना तरी पुढें कसें जाववेल? आम्ही हळूहळू नदीतीरापर्यंत येअून पोंचलों. आतां त्याच या शांत प्रवाहावरून परत जावयाचें होतें. धुक्याचे ढग विखुरले होते. नदीचें शांत पाणी हळूहळू धबधब्याकडे वाहत जात असलेलें पाहून माझ्या मनांत बलिदानासाठीं चाललेल्या मेंढरांच्या कळपाचें चित्र अुभें राहिलें. मी या पाण्याला म्हटलें, "अेवढें मोठें अधःपतन तुमच्या ललाटीं लिहिलें आहे त्याची थोडी सुद्धां कल्पना तुम्हांला नाहीं, म्हणूनच अितक्या स्वस्थ चित्तानें तुम्ही पुढें जात आहां! अथवा नाहीं, मीच चुकलों. तुम्ही जीवनधर्मी आहां, तुम्हांला मरणाचें भय कसलें?"

"प्रायः कन्दुकपातेनोत्पतत्यार्यः पतन्नपि।"

जितक्या अुंचीवरून पडाल तितके अुंच अुसळून याल. तुमची कींव करणारा मी कोण? पवित्र जलाला स्पर्श करण्यासाठीं मीं हात लांबविला. अितक्यांत पाणी खळखळां हसून म्हणालें:—

"न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात! गच्छति।"

होडी अैलतीरावर आली आणि आमच्या मनांत असा विचार आला कीं मोटर या अंगानें थोडीशी खालीं घेतली तर याच धबधब्याला अुजव्या अंगानेंहि प्रदक्षिणा होअील. आम्ही जाअून आलों त्या अंगाला म्हैसूरसीमा म्हणतात आणि अुजव्या अंगानें जाण्यास निघालों तिला मुंबअीसीमा हें नामाभिधान आहे. कारण, जोग दोन्ही हुकूमतीच्या सीमेवर आहे.

येथें तर आम्ही अगदीं निकट येअून पोंचलों. मोठमोठ्या खडकांच्यामधून मी धावूं लागलों. दोन वर्षांचा रुग्णाअीत म्हणून माझी चांगली प्रसिद्धि झाली होती. यामुळें मला धावतांना पाहून राजाजींना आश्चर्य वाटलें. कोणींसें म्हटलें, "हा तर महाराष्ट्राचा मावळा आहे आणि हिमालयाचा यात्रेकरूहि आहे. माशाला पाणी तसा मराठ्याला डोंगर!" परंतु हे शब्द अैकण्यासाठीं थांबण्याची मला कोठें सवड होती? मी तर धावत धावत 'राजा' धबधब्याच्या शेजारीं जो प्रसिद्ध सुळका आहे तेथें जाअून पोंचलों; आणि त्यावर साष्टांग आडवा होअून खालीं पाताळांत पाहूं लागलों. येथें अुभें राहून खालीं पाहणें शक्यच नाहीं. घेरी येअून मनुष्य खालींच पडावयाचा! कानांत चारहि धबधब्यांचे ध्वनि अितके गच्च भरले होते कीं, दुसरें कांहीं अैकण्यापुरता त्यांत अवकाशच अुरला नव्हता. ज्याप्रमाणें नदीचें पाणी वरून खालीं दरींत पडून पुनः वर अुसळत होतें, त्याचप्रमाणें कानांतील ध्वनि सुद्धां पुन्हाः अुसळत असावे. प्रथम माझें लक्ष वेधलें राजाच्या गंडस्थळावर लोंबणाऱ्या मोत्यांचा सरांनीं; आणि मग संकटकाळीं लोकांचें रक्षण करण्यास ज्याप्रमाणें शूर पाणबुड्ये अुड्या घेतात त्याप्रमाणे या धबधब्याच्या मागें पटाअितपणें घुसणाऱ्या पक्ष्यांनीं. या पक्ष्यांना धबधब्याच्या भव्य भीषणतेची कल्पनाच येत नसेल काय? कां अीश्वरानें त्यांच्या हृदयांत अितकें धैर्य सांठवलें असेल? मला वाटतें कीं, आगंतुक पक्षी अेवढें साहस करणार नाहींत. हे जोगवासी येथेंच जन्म पावले असावेत आणि धबधब्याच्या पडद्याच्या सुरक्षित जलावरणांतच वाढले असावेत. सिंहाचे छावे सिंहिणीला थोडेच भिणार? समुद्रांतील माशांना लाटांची मौजच वाटणार. त्याचप्रमाणें हे जोगपुत्र जोगशीं खेळत असावेत!

'राजा' धबधबा म्हैसूरसीमेकडून दुरून पाहिला होता तेव्हां तो वेगळाच दिसत होता. येथें मात्र जणूं काय हत्तीच्या गंडस्थळावरच झोपलों आहोंत अितक्या जवळ आम्ही होतों. वरचें पाणी धबधब्याकडे अशा कांहीं वेगानें धावत होतें कीं, जणूं काय अेखादा महान् लोकसमाज कळत न कळत, अिच्छा असो नसो, प्रचंड क्रांतीकडे धावत आहे! मोठा लोकसमाज जेव्हां सामाजिक अथवा राजकीय सुधारणांच्या ओघांत वाहत जातो तेव्हां पुढें काय वाढून ठेवलें आहे याची त्याला कल्पना नसते. आणि कल्पना असली तरी "आपल्या संबंधांत हें खरें ठरणार नाहीं; आपण कसे तरी निभावून जाअूं," अशी आंधळी आशा तो बाळगतो. मध्यंतरीं सुधारणेचा मद वाढतच जातो. शेवटीं जहाल लोक संयम सुचवितात, तर मवाळ लोक आंधळे होअून बेजबाबदार लोकांशीं संगनमत करतात. मग त्यांची अिच्छा असली तरी ते मागे फिरूं शकत नाहींत. आणि ते स्वतः मागें हटले तरी काय झालें? धनुष्यांतून सुटलेला बाण कधीं तरी मागें घेतां आला आहे काय? जी टाळतां येअील ती क्रांति कसली?

धबधब्याचें पाणी खालीं किती खोल जातें तें पाहणें किंवा समजून घेणें अशक्य होतें. कारण, अुसळणाऱ्या पाण्याचीं मोठमोठीं अभ्रें धबधब्याच्या पायाला विळखा घालून होतीं. काय हा पाण्याचा भयंकर अुन्माद! जणूं काय महादेव प्रलयकालचें तांडवनृत्यच करीत आहे आणि समोरचा 'रुद्र' त्याला ताल देत आहे! पण रोमांचकारी शोभेचा परम अुत्कर्ष समोरचा 'वीरभद्र'च दाखवतो. कोणाला वाटणारहि नाहीं कीं, येथें पाणी पडतें आणि अुडतें. मोठमोठ्या तोफांतून गोळ्याच्या शक्तीनें कोरड्या पिठाचे लोटच्या लोट अुडावे तसाच हा देखावा दिसत होता. त्याचें वर्णन शब्दांनीं करतां येणार नाहीं. कारण, शब्दांची जोपासना शांति व व्यवस्था यांच्यामध्यें झालेली असते.

पडल्या पडल्या आम्हीं हा देखावा पोटभर पाहून घेतला; अथवा खरें सांगावयाचें म्हणजे वाटेल तितकें पडून राहिलों तरी तृप्ति होणें अशक्य आहे अशी खात्री होअीपर्यंत पाहिलें. आम्ही अुठून परत फिरलों; पण मागें फिरणें सोपें नव्हतें. आमच्या पैकीं अेखादा जागेवरून हलायचाच नाहीं. त्याला ओढून आणण्यास दुसरा जाअी तो स्वतःच त्या नयनोत्सवांत मग्न होअी!

पहिला पस्तावून अुठला तरी बोलावण्यासाठीं म्हणून गेलेलाच हलायचा नाहीं; आणि दोघेहि कसेबसे संयम करून मागें वळतात तों त्या दोघांवर चिडून त्यांना रागें भरण्यास आलेला तिसरा क्षणभर डोळे तृप्त करण्यासाठीं तेथेंच अुभा राही; आणि मग पहिले दोघेहि आपला निग्रह थोडा शिथिल करीत ! त्या दोघांनाहि वाटे, अेवढा रागावलेला हा समाजनियंता गृहस्थ जितकी सूट घेत आहे तितकी आपणहि घेतली तर त्यांत काय बिघडलें ? आम्हीं कोठें त्याच्यापेक्षां अधिक निग्रही असल्याचा दावा केला आहे ? मला वाटलें कीं, थोडासा त्या पुढच्या खडकावर गेलों तर राजाच्या पाण्यांत पाय बुडवितां येतील. पण नदीचें पाणी थोडेंथोडें वाढत होतें. त्यांत तो खडक लहानसें बेटच झाला होता म्हणून राजाजींनीं मला जाअूं दिलें नाहीं. मलाहि वाटलें कीं, त्यांचें मी न अैकेन तर दुहेरी अुद्धपटणा होअील. राजाजींच्या आज्ञेचें अुल्लंघन कसें करावें ? आणि 'राजा'च्या डोक्यावर पाय कसा ठेवायचा ! आम्ही परत फिरलों. भक्ति, विस्मय, मानवी जीवनाची क्षणभंगुरता, देखाव्याचा भव्यपणा, त्या क्षणाची धन्यता अित्यादि अनेक वृत्तींचे ढग हृदयांत कोंदले होते आणि तेथून त्या वीरभद्राप्रमाणें आपले बाण माझ्या डोक्यांत सोडीत होते ! विचाराचें हें दारूकाम आश्चर्यकारक असतें. हृदयांतून बाण सुटतो तो तडक डोक्यापर्यंत जाअून तेथें फुटतो ! त्यावेळीं स्वस्थ शरीर कसें अस्वस्थ होअून जातें याचा ज्यानें अनुभव घेतला आहे त्यालाच त्याचा चमत्कार कळून येअील.

या ठिकाणीं देअूळ कसें नाहीं ? आमच्या लोकांचीं देवळें म्हणजे जन्मभूमीचीं काव्यमय स्थानें. अमुक शिखर अुत्तुंग आहे ? मग तेथें ध्यान करण्यासाठीं अेखादा ऋषि जाअून बसलाच आणि भक्तांनीं तेथेंअेक देअूळ बांधलेंच म्हणून समजावें. मग तें शिखर पुण्याजवळील पर्वती असो, चंपानगरी (चांपानेर) जवळील पावागढ असो, जुनागडजवळील गिरनार असो किंवा हिमालयांतील तुंगनाथ असो. दक्षिणेकडे वाहणारी नदी अमुक ठिकाणीं अुत्तरवाहिनी झाली आहे ? चला, बनवा त्या स्थळाला तीर्थ. कोट्यवधि लोकांनीं यावें आणि पावन होअून जावें. मोठमोठ्या दोन नद्या अेकमेकींना भेटतात असें पाहिलें कीं, त्या प्रयागावर आपल्या संतांनीं आपली सरस्वतीहि वाहावयाला लावलीच समजावें. सगळ्या यात्रा पूर्ण झाल्या

आणि समुद्रापर्यंत येअून पोंचला ? तेथें भक्तांनीं जगन्नाथ अथवा सेतुबंध महादेव बसवलाच्च समजा. जेथें भुअीचा शेवट दिसला तेथें अेकतर कन्याकुमारी असेल किंवा देवेन्द्र[1] असेल. मोठमोठ्या वाळूच्या रणांत अेखादें सरोवर दिसलें तर तें नारायणाचें[2] सरोवरच्च असलें पाहिजे; त्याची पूजा झालीच पाहिजे.

आपल्या संतकवींनीं तीर्थस्थळें कोठें कोठें स्थापलीं आहेत तीं शोधूं लागलों तर हिंदुस्थानांतील सगळीं सुंदर आणि भव्य स्थळें आपणाला सांपडतील. मुसल्मान फकीर व रोमन कॅथॉलिक पाद्री यांनींहि आपल्या देशांत अशाच्च प्रकारें अद्‌भुत काव्यमय स्थळें शोधून काढलीं आहेत आणि तेथें पूजा-प्रार्थना करण्याची सोय केली आहे. मग या धबधब्याजवळ देअूळ कसें नाहीं ? काय जीवनराशीचा अेवढा मोठा अधःपात पाहून मुनिगण खिन्न झाले असतील ? भैरवघाटाप्रमाणें येथें देह खालीं सोडून देण्याचा अुन्माद लोकांत अुत्पन्न होअील असें वाटून काय लोकसंग्रहकार ऋषींनीं यात्रेसाठीं हें स्थान नापसंत केलें असेल ? कां डोकें भारून टाकणारी अखंड व भीषण गर्जना ध्यानाला अनुकूल नाहीं असें समजून अुपासक येथून विमुख झाले असतील ? कां हा धबधबा स्वतःच अभयब्रह्माची मूर्ति आहे, याच्या शेजारीं दुसरी कोणती मूर्ति बसवावी, म्हणून गोंधळांत पडून ते मागें फिरले असतील ? कोणीं सांगावें ? पूर्वजांनीं येथें देअूळ बांधलें नाहीं म्हणून मला यत्किंचित् दुःख वाटत नाहीं. परंतु हें स्थळ पाहून वाटलेल्या भावनांचें अेखादें तांडवस्तोत्र त्यांनीं अवश्य लिहावयास पाहिजे होतें. जेथें पार्थिव मूर्तीचा कांहींच अुपयोग होत नाहीं तेथें वाङ्मय मूर्ति अवश्य अुद्दीपक होअूं शकेल.

ही सर्व शोभा आम्ही धबधब्याच्या डोक्यावरून पाहत होतों. होन्नावराकडून येणारे लोक अुत्तर कानडा जिल्ह्यांतील घोर अरण्यांतून येत असतील तेव्हां त्यांना या धबधब्याचें आपादमस्तक दर्शन होत असेल.

---

१ सिंहलद्वीपाच्या दक्षिणेकडील टोकाला देवेंद्र म्हणतात. *'Dundra Head'* हें त्याचेंच्च अिंग्रजीकरण आहे.

२ सिंधप्रांताच्या पूर्वेस व कच्छच्या अुत्तरेस नारायण सरोवर आहे.

कोणतें अधिक सुंदर हें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कोणाला सांगतां येईल ? आणि प्रत्यक्ष पाहिलें तरी काय झालें ? निसर्गाच्या निरनिराळ्या विभूतींची कधीं तरी तुलना होऊं शकली आहे काय ? हिमालयाची भव्यता, सागराची गंभीरता आणि (वालुका) रणाची भीषणता यांमध्यें तुलना अथवा निवड कशी करतां येईल ? म्हणून एकदा होन्नावरमार्गानें जोगचें दर्शन घेण्यास आलेंच पाहिजे. आरमारावरील अनुभव घेऊन कौशल्य संपादन केलेले जे लष्करी अधिकारी धबधब्याचें मोजमाप घेण्यास आले होते आणि पाळण्यांत बसून लटकत लटकत धबधब्याच्या मागील अंगास गेले होते त्यांना काय अनुभव आला असेल ? जोगच्या पक्ष्यांनीं त्यांचें कसें स्वागत केलें असेल ? धबधब्याच्या पडद्यांतून बाहेरून येऊन आंत पसरणारा प्रकाश त्यांना कसा दिसला असेल ? आणि अंधाऱ्या रात्रीं धबधब्यामागें गवत पेटवून जर मोठा उजेड केला तर साऱ्या दरींत कशी गंधर्वनगरी निर्माण होईल याची कल्पना कोणास आली आहे ? जेव्हां येथें विजेचा कारखाना चालू होईल तेव्हां कित्येक कल्पनाशूर या धबधब्यामागें अवश्य विजेच्या दिव्यांच्या माळा पेटवून लावतील आणि जगानें आजवर न पाहिलेलें इंद्रजाल पसरून दाखवतील. त्यावेळीं सगळी दरी एक मोठी रंगभूमि बनेल आणि चारहि खंडांतील भूदेव ती पाहण्यास येथें अवतरतील ! पण त्यावेळीं कोणाला ईश्वराचें स्मरण होईल काय ? मनुष्यानें आपली बुद्धिशक्ति ईश्वराला आळविण्यासाठीं वापरण्याऐवजीं त्याला विसरून जाण्याच्या युक्त्या आणि पद्धति शोधून काढण्यांतच वापरली आहे !

कदाचित् असेंहि असेल कीं, सर्वांगांनीं कुंठित झाल्यानंतरच बुद्धि ईश्वराला चांगल्या रीतीनें समजूं शकत असेल.

प्रत्येक गोष्टीला शेवट असतोच; अर्थात् आमच्या या जोग-यात्रेचाहि शेवट आला. अत्यंत पवित्र व मधुर स्मृति बरोबर घेऊन आम्ही मागें फिरलों. पण पुन्हां एकदां येथें येऊन जाण्याची वासना मात्र राहिलीच. तेव्हां "पुनरागमनाय च" अशा शब्दांनींच आम्हीं भारतवैभवाच्या या असाधारण विभूतीचा निरोप घेतला.

## २८

# जोगचें पुनर्दर्शन

हिमालय, विंध्य व सह्याद्रि यांसारखे अुत्तुंग पर्वत; गंगा, सिंधु, नर्मदा, ब्रह्मपुत्रा यांसारखे सुदीर्घ नदीनद; चिलका, वुलर, मंचर यांसारखीं प्रसन्न सरोवरें हीं ज्या देशांत विराजमान आहेत त्या देशांत अेखादा महान्, भीषण व रोमांचकारी जलप्रपात जर नसला तर प्रकृतिमाता कशी कृतार्थ होअील ? दक्षिणेकडे कारवार जिल्हा व म्हैसूर संस्थान यांच्या सीमेवर असा अेक धबधबा आहे कीं, जो जगामध्यें अनन्यश्रेष्ठ नसला तरी सर्वश्रेष्ठ असणाऱ्यांपैकीं अेक निर्विवाद आहे. अिंग्रज लोक त्याला 'गेरसप्पा फॉल्स' असें म्हणतात. त्याचें देशी नांव 'जोग' असें आहे.

लॉर्ड कर्झन् जेव्हां हिंदुस्थानांत आला तेव्हां जोगचा धबधबा पाहण्यासाठीं तो अितका अुत्सुक होता कीं, या देशांत आल्यानंतर पहिल्याच संधीला जोगकडे जाअून त्या अद्भुत दृश्याचें त्यानें आपल्या नयनांनीं आकंठ पान केलें ! तेव्हांपासून आपल्या देशांत या धबधब्याची प्रतिष्ठा वाढली. ज्या स्थानीं अुभें राहून आपल्या डोळ्यांचें पारणें त्यानें फेडलें तेथें म्हैसूर सरकारनें अेक बांक तयार करविलें आहे; त्याला 'कर्झन् सीट्' असें म्हणतात.

म्हैसूर सरकारनें तेथें जवळच अेक अतिथिशाळा बांधली असून तेथील भेटवहींत देशी व परदेशी निसर्गप्रेमी रसिक प्रवाशांनीं वेळोंवेळीं आप-आपले आनंदोद्गार लिहून ठेवले आहेत. या अुद्गारांचाच अेक संग्रह छापून प्रसिद्ध केला तर तो अेक निसर्ग-काव्याचा असाधारण गुच्छ होअील. हें सारें काव्य अुच्च कोटीचें असतें तरी प्रत्यक्ष जोगचें दर्शन या काव्याची अपूर्णताच सिद्ध करतें आणि मुखांतून अेकदम अुद्गार निघतो: "अेतावान् अस्य महिमा; अतो ज्यायांश्च पूरुषः ।"

लहानशा अिरावती नदीला तीन तीन नांवें कां असावींत ? प्रथम तिचें नांव असतें भारंगी किंवा बारगंगा; मध्यें तिला म्हणतात शरावती; आणि जेथें ती पोक्तपणें समुद्राला जाअून मिळते तेथें तिला बालनदी म्हणतात ! शरावतीच्या प्रवाहानें आपल्या प्रपाताचें तें रोमांचकारी दृश्य

धारण केलें नसतें तरी आपल्या सौंदर्यानें त्यानें मनुष्याचें मन अवश्य हरण केलें असतें. पण मग हिंदुस्थानांतील अितर अनेक नद्यांपैकीं ती अेक अन्यतम नदी झाली असती; या प्रपातामुळें लहानगी शरावती भारतवर्षाची अेक अद्वितीय नदी होअून बसली आहे.

जोगच्या या अलौकिक दृश्याचें दर्शन घेण्यासाठीं राजाजी, गंगाधरराव, मी व कांहीं मित्रमंडळी प्रथम गेलों होतों. त्या यात्रेचें वर्णन 'जोगचा धबधबा' या प्रकरणांत कांहीं वर्षांपूर्वी केलेंच आहे. तें अद्‌भुत दृश्य पाहून अेक कुतूहल तृप्त होतें न होतें अितक्यांत मानवी स्वभावाला अनुसरून मनांत अेक नवा संकल्प अुठला कीं, ही नदी अितक्या अुंचीवरून अुडी टाकल्यानंतर पुढें जाते कोठें ? तेथें ती दिसते कशी ? आणि सरित्पतीशीं तिचा संगम होतो कसा ? हें सर्व अेकदां पाहिलें पाहिजे; आणि साधल्यास बालकाप्रमाणें शरावतीच्या वक्षःस्थलावर नौकाविहार केला पाहिजे. अंतरात्म्याच्या या जिज्ञासेला सत्यसंकल्प परमात्म्यानें आशीर्वाद दिला आणि अेक तपाचा अवधि पुरा होतांच जोगचें दुसऱ्यांदा दर्शन घेण्याचें सद्‌भाग्य मला लाभलें. पहिल्या खेपेला वरच्या बाजूनें आम्ही या प्रपाताकडे गेलों होतों. या खेपेला नदीच्या मुखाकडून प्रवेश करून आम्हीं नावेमध्यें बसून प्रतीप-प्रवास केला, आणि जेथें नाव थांबली तेथून मोटरीच्या साहाय्यानें घाट चढून 'राजा' प्रपाताच्या माथ्यावर पोंचलों.

निघतांना आम्हीं तीन नावा केल्या होत्या. मधल्या नावेंत बायकामुली होत्या आणि आम्हां पुरुषांच्या दोन नावा तिच्या दोन अंगांनीं चालत होत्या. रात्रीची वेळ. चंद्रमा वर हसत होता. त्याचें तें काव्य मुलींच्या हृदयांत शिरलें आणि आलापांच्या रूपानें बाहेर पडूं लागलें. प्रत्येक मुलीनें आपलें आवडतें गाणें नदीच्या पृष्ठभागावर सोडून दिलें. तो नाद कानीं पडतांच नारळाचे व सुपारीचे वृक्ष शहारले आणि आपआपलीं अुंच मस्तकें लववून ते त्या आलापांचें पान करूं लागले. मुलींनीं थकेतोंपर्यंत गाणीं म्हटलीं. पुढें त्या झोंपीं गेल्या. चंद्र अस्ताला गेला; अंधाराचें साम्राज्य सुस्थिर झालें; आणि अनंत तारका आसपासच्या टेकड्यांकडे टकमका पाहूं लागल्या. आसपासची शांति जागी होती किंवा निद्रित होती हें सांगणें कठीण आहे.

जेव्हां जेव्हां झोंपमोड होअी तेव्हां तेव्हां कधीं वल्ह्यांचा आवाज, तर कधीं नावाड्यांच्या बांबूंशीं झोंबी खेळणाऱ्या पाण्याचा खळखळ आवाज, तर कधीं स्वतः नावाड्यांनीं अेकमेकांना दिलेला साद अैकूं येअी. शेवटीं पहाट झाली. पक्ष्यांनीं आपली किलबिल आरंभिली. मला वाटलें, मधल्या नावेंतील कोकिळाहि जाग्या झाल्या तर चांगलें. त्यांनीं माझ्या हांकेला आपल्या आलापांनींच ओ दिली. झाडांनीं सुद्धां रात्रीचे आलाप आठवून "हेंच तें रात्रीचें संगीत!" असें अेकमेकाला सांगण्यासाठीं आपलीं मस्तकें हलविण्यास प्रारंभ केला. रात्रींचा जलविहार सात्विक, शांतिमय व प्रसन्न-यौवनमय होता.

भुकेची वेळ झाली आणि आम्ही अेका खेड्याजवळ येअून पोंचलों. तेथें अेक भात भरडण्याची गिरणी होती. भक् भक्, भक् भक् करीत लोकांची शांति, त्यांचें स्वास्थ्य व त्यांची आजीविका ती भरडून टाकीत होती. आम्हीं पोटभर खालें आणि आमच्यासाठीं वाट पाहत बसलेल्या मोटरींत आरूढ झालों.

वाटेंत आमच्या सारथ्यानें पेट्रोलच्या डब्यांत थोडें तेल असतांना त्यांतच पाणी भरून आणलें आणि मोटरींत ओतलें. पाणी तापलें आणि मोटरीचा धूर पाण्यांत भरला. मग काय विचारावें! पावलोंपावलीं मोटर अडूं लागली, ओरडूं लागली, धुसपुसूं लागली आणि दुर्गंध सोडूं लागली. आम्ही कंटाळलों, चिडलों, रागावलों, आणि कांहींच अुपाय चालत नाहीं असें पाहून शेवटीं शांत झालों! कसेंबसें करून आम्हीं पाणवठ्याच्या जागीं येअून जुनें, बंडखोर पाणी काढून टाकलें, आणि नवें सज्जन पाणी भरलें, तेव्हां आमचा मार्ग सुकर झाला.

या खेपेला आम्ही शरावतीच्या अुजव्या, म्हणजे अुत्तरेकडील अंगाला येअून पोंचलों होतों. अतिथिगृहांत न थांबतां आम्ही सरळ 'राजा' प्रपाताच्या अंगालाच जाअून पोंचलों.

शरावतीच्या या अर्धचंद्राकार दरीमध्यें चार धबधबे आहेत. अुजव्या अंगाला 'राजा' नांवाचा प्रपात जो वरून पडतो तो कोठेंहि मध्यें न थांबतां अेकदम ९६० फुटांच्या खोलींत अुडी घेतो! खरोखर तो 'राजा' च आहे. त्याचा जलराशि, त्याचा अुन्माद व त्याचा डौल हे जगदेक-

सम्राटाला शोभेसे आहेत. त्याच्याच डावीकडे महारुद्राप्रमाणें गर्जना करणारा 'रुद्र' ('रोअरर्') प्रपात राजाच्या चरणांवर येऊन पडतो. रुद्राची गर्जना मैलोंमैल त्या दरीला व आजूबाजूच्या टेकड्यांना निनादित करून टाकते. त्याचा ध्वनि मेघगभीरहि म्हणतां येत नाहीं. मेघगर्जना आकाश-विद्रावी असली तरी क्षणजीवी असते; आणि सागराच्या सनातन घोषणेला भरती-ओहटीचे हेलकावे खावे लागतात. रुद्राचा ध्वनि अविरत, अखंड व धारावाही असतो. अशा ध्वनीची धुंदी ही कांहीं विलक्षण असते !

राजाला व रुद्राला पृथ्वीवर कोठेंहि सम्राटाची पदवी सहज प्राप्त होण्याजोगी आहे. पण जोगचें खरें वैभव आकाशांत अनेक रूपांनीं उडणाऱ्या 'वीरभद्रा' (रॅकिट)च्या शुभ्र जटाजालामुळें आहे. वीरभद्राचा प्रपात हत्तीच्या गंडस्थळासारख्या एका विस्तृत शिलाखंडावर आपटल्या-बरोबर त्यामधून आतशबाजीच्या बाणासारखे फवारे उंच उंच उडत जातात ! हें शंकराचें तांडवनृत्य कीं महाकवि व्यासाच्या प्रतिभेचा नवनवोन्मेषशाली कल्पनाविलास ? कीं सूर्यबिंबाच्या पृष्ठभागापासून निघणाऱ्या सर्वसंहारकारी, पण कल्पनारम्य ज्वाला ? कीं भूमातेच्या वात्सल्याच्या स्तन्यधारांचे फवारे ? खरोखर, पाहणाऱ्याच्या डोळ्यांना वीरभद्र मोहमूढ बनवून टाकतो !

वीरभद्राच्या डाव्या अंगाला कर्पूरगौरा, तन्वंगी व अनुदरी पर्वतकन्या 'पार्वती' (लेडी) आपल्या लावण्यानें प्रत्येकाला आल्हादित करते. चारहि प्रपातांचें जणूं रक्षण करण्याकरितांच डाव्या व उजव्या अंगांना दोन मोठमोठे पर्वत आहेत. उभ्या उभ्या ते आणखी काय करणार ? प्रपातांची अखंड गर्जना प्रतिक्षणीं प्रतिध्वनित करीत राहणें, इंद्रधनुष्यें धारण करणें व लहानमोठ्या वनस्पति अंगांवर लेऊन रोमांचित होत राहणें हाच त्यांचा अविरत उद्योग होऊन बसला आहे !

या खेपेला आम्ही गेलों ते उन्हाळ्याचे दिवस होते. भारंगीचें पाणी पुष्कळसें कमी झालें होतें. वीरभद्राच्या जटा आतां कोठें दिसत नव्हत्या. रुद्राच्या लांब उड्याहि आतां आखूड झालेल्या दिसल्या. पार्वतीनें आतां क्षामा विरहिणीचें रूप धारण केलें होतें. निदान राजाचें वैभव तरी पाहण्यासारखें असेल अशी आम्हांला आशा होती; परंतु विश्वजित् यज्ञ केल्यानंतर एखादा

जेव्हां जेव्हां झोंपमोड होअी तेव्हां तेव्हां कधीं वल्ह्यांचा आवाज, तर कधीं नावाड्यांच्या बांबूशीं झोंबी खेळणाऱ्या पाण्याचा खळखळ आवाज, तर कधीं स्वतः नावाड्यांनीं अेकमेकांना दिलेला साद अैकूं येअी. शेवटीं पहाट झाली. पक्ष्यांनीं आपली किलबिल आरंभिली. मला वाटलें, मधल्या नावेंतील कोकिळाहि जाग्या झाल्या तर चांगलें. त्यांनीं माझ्या हांकेला आपल्या आलापांनींच ओ दिली. झाडांनीं सुद्धां रात्रीचे आलाप आठवून "हेंच तें रात्रीचें संगीत !" असें अेकमेकाला सांगण्यासाठीं आपलीं मस्तकें हलविण्यास प्रारंभ केला. रात्रींचा जलविहार सात्त्विक, शांतिमय व प्रसन्न-यौवनमय होता.

भुकेची वेळ झाली आणि आम्ही अेका खेड्याजवळ येअून पोंचलों. तेथें अेक भात भरडण्याची गिरणी होती. भक् भक्, भक् भक् करीत लोकांची शांति, त्यांचें स्वास्थ्य व त्यांची आजीविका ती भरडून टाकीत होती. आम्हीं पोटभर खाल्लें आणि आमच्यासाठीं वाट पाहत बसलेल्या मोटरींत आरूढ झालों.

वाटेंत आमच्या सारथ्यानें पेट्रोलच्या डब्यांत थोडें तेल असतांना त्यांतच पाणी भरून आणलें आणि मोटरींत ओतलें. पाणी तापलें आणि मोटरीचा धूर पाण्यांत भरला. मग काय विचारावें ! पावलोंपावलीं मोटर अडूं लागली, ओरडूं लागली, धुसपुसूं लागली आणि दुर्गंध सोडूं लागली. आम्ही कंटाळलों, चिडलों, रागावलों, आणि कांहींच अुपाय चालत नाहीं असें पाहून शेवटीं शांत झालों ! कसेंबसें करून आम्हीं पाणवठ्याच्या जागीं येअून जुनें, बंडखोर पाणी काढून टाकलें, आणि नवें सज्जन पाणी भरलें, तेव्हां आमचा मार्ग सुकर झाला.

या खेपेला आम्ही शरावतीच्या अुजव्या, म्हणजे अुत्तरेकडील अंगाला येअून पोंचलों होतों. अतिथिगृहांत न थांबतां आम्ही सरळ 'राजा' प्रपाताच्या अंगालाच जाअून पोंचलों.

शरावतीच्या या अर्धचंद्राकार दरीमध्यें चार धबधबे आहेत. अुजव्या अंगाला 'राजा' नांवाचा प्रपात जो वरून पडतो तो कोठेंहि मध्यें न थांबतां अेकदम ९६० फुटांच्या खोलींत अुडी घेतो ! खरोखर तो 'राजा' च आहे. त्याचा जलराशि, त्याचा अुन्माद व त्याचा डौल हे जगदेक-

सम्राट् जसा अकिंचन बनतो आणि त्यायोगेंच आपलें वैभव व्यक्त करतो, अगदीं तशीच स्थिति 'राजा'ची झाली होती.

अतिथिशालेकडून धावत धावत जाऊन जेव्हां आम्ही राजाकडे पोंचलों, तेव्हां वरून कडक ऊन आणि खालून उडणाऱ्या थंड तुषारांचें थंडगार धुकें यांच्यामध्यें सांपडून आमची जी स्थिति झाली तिचें काय वर्णन करावें बरें! आम्हीं राजाच्या मुकुटाप्रमाणें शोभणाऱ्या ऊनऊन दगडांवर आडवें होऊन खालीं दरींत डोकावलें तों कधीं स्वप्नांत सुद्धां ज्याची कल्पना नव्हती असें दृश्य पाहावयास मिळालें. वरून राजाची जी धारा पडत होती ती खालीं भुईपर्यंत पोंचतच नव्हती. वरून आम्हांला दिसत होतें कीं, एक प्रचंड स्रोत मस्त हत्तीसारखा खालीं पडत आहे. खालीं पडतां पडतां शतधा विदीर्ण होऊन त्याच्या सहस्र धारा बनल्या आहेत आणि थोडें खालीं जातांच त्या धारांचे मोठाले जलबिंदु बनून मौक्तिक मालेची शोभा दाखवीत आहेत, आणि पुढें या मौक्तिकांचेंहि चूर्ण होऊन त्यांचे मोठमोठे कण होत होते. नंतर मात्र सरळ खालीं पडावयाचें सोडून ते थोडा स्वच्छन्द विहार चालू करीत. हे कण सुद्धां पुढें भिन्न होऊन सीकरकुंजांत परिणत होत आणि ढगांसारखे विहार करूं लागत. तरी एवढ्यानें प्रकृतिमातेचें समाधान होत नव्हतें. या ढगांचें पुढें धुकें होई आणि येणाऱ्या वाऱ्याच्या संगतीं उडून उडून तें सारें वातावरण शीतल बनवूं लागे. आश्चर्य हें कीं, एवढ्या मोठ्या जलधारेचा एक थेंबहि भुईपर्यंत पोंचत नव्हता. खालची जमीन ऊन आणि वरची हवा थंड अशी स्थिति असतांना मला राजांच्या दानाचें स्मरण झालें. प्रजेला दुष्काळपीडित पाहून राजा जेव्हां उदार हस्तानें धनवितरण करतो तेव्हां त्याच्या जयजयकारानें सारें वातावरण निनादित होऊन जातें. पण प्रजेच्या — दीन जनतेच्या — तोंडापर्यंत अन्नाचा एक कणहि पोंचत नाहीं.

येथील इंद्रधनुष्याची शोभा मात्र अलकेश्वराच्या मनांतहि ईर्षा उत्पन्न करण्याजोगी होती. हीं इंद्रधनुष्यें स्थायी नव्हतीं. वाऱ्याची लहर जशी दिशा बदले त्याचप्रमाणें सीकरपुंज आपलें स्थान बदलीत आणि इंद्रधनुष्यें पार्वतीसमवेत शंकरानें नाचावें तशी इकडून तिकडे धावत. क्षणांत क्षीण होत तर क्षणांत मयासुराच्या प्रासादाची शोभा धारण करीत. कर्मांबरोबर जसें त्याचें फलहि येतें त्याप्रमाणें प्रत्येक धनुष्याबरोबर त्याचें

प्रतिधनुष्यहि आपला वर्णक्रम बरोबर अुलटा करून अुपस्थित होअीं. आम्हीं स्थान बदललें कीं हीं सुरधनुष्येंहि आपलें स्थान बदलीत. सुरधनु आणि सुरधुनि यांची ही अद्भुत, आह्लादकर लीला आम्ही पुष्कळ वेळपर्यंत विस्मयविमुग्ध भावानें पाहत राहिलों. जितकें अधिक पाहावें तितकी दर्शनाची तहान अधिकच वाढत होती. तास, दोन तासच येथें थांबणें शक्य आहे हें आम्हांला माहीत होतें. आपलें पुण्य क्षीण होत चाललें आहे आणि थोड्याच वेळांत आपण पुनः मर्त्यलोकांत प्रवेश करणार आहोंत हें आम्हीं जाणून होतों. स्वर्गलोभी देव ज्या विषादपूर्ण मनानें स्वर्गसुखाचा अनुभव घेतात, पराक्रमी पुरुष आपल्या यौवनाच्या अुत्तरार्धांत आपल्या संकल्पपूर्तीसाठीं जसे अधीर होतात, त्याच विषादानें आणि तसेच अधीर होअून आम्ही मंडळी त्या गंधर्वदरीचे डोळ्यांनीं, कानांनीं, नाकानें व साऱ्या त्वचेनें सेवन करूं लागलों; आणि त्याचबरोबर आमच्या कल्पनेच्या द्वारां तोच आनंद शतगुणित करून त्याच्या अुपभोग घेत चालूं लागलों. पहाटेचा जलविहार सात्त्विक, शांतिमय व प्रसन्न होता. परंतु प्रपाताचें हें दर्शन मात्र रम्य, भीषण व आश्चर्यजनक होतें! आतां मुलींच्या मुखांवर प्रातःकाळची प्रसन्नता नव्हती. "असें अद्भुत दृश्य सिद्ध झालें कसें? खरोखर, आपण पृथ्वीवर आहोंत कीं स्वप्नसृष्टींत?" अशा तऱ्हेचा विस्मय त्यांच्या तोंडांवर स्पष्ट दिसत होता; आणि त्या अेकमेकींच्या डोळ्यांकडे बघबघून आपला विस्मय वाढवीत होत्या; आणि त्यांचा तो विस्मय पाहून आम्हांला असा कांहीं अभिमान वाटत होता कीं जणूं काय आपणच या काव्यमय सृष्टीचे जनक आहों!

कित्येक वर्षांपासून भवति-न-भवति चालली आहे कीं, गिरसप्प्याच्या धबधब्यापासून वीज अुत्पन्न करावी कीं करूं नये? शरावतीचें पाणी अेका अंगाला घेअून मोठमोठाल्या नळांतून वरून खालीं सोडलें आणि त्याच्या साहाय्यानें यंत्रें चालवून वीज अुत्पन्न केली तर साऱ्या म्हैसूर संस्थानाला ती स्वस्तांत स्वस्त मिळूं लागेल. अुत्तर व दक्षिण कर्नाटकालाहि त्याच्या योगानें वीज पुरविणें येअील. त्यापासून लोकांचें मोठें हित होअील. परंतु असें केल्यानें हें अद्भुत-रम्य प्राकृतिक दृश्य कायमचें नष्ट होअील! अजूनपर्यंत या दोहोंतून कोणतें वांछनीय आहे याचा निर्णय झालेला नाहीं. हजारों, लाखों लोकांना

पोटभर खावयाला मिळेल; शेंकडों महत्त्वाकांक्षी नवयुवकांना आपली योग्यता सिद्ध करण्याची संधि मिळेल; हजारों जनावरांचें दुःख दूर होईल; अेका ठिकाणीं अशा तऱ्हेचा कारखाना यशस्वी रीतीनें चालला तर भारतांतील झाडून साऱ्या प्रपातांचा असाच अुपयोग होअूं लागेल आणि देशाला अेका फार मोठ्या शक्तीचा सदैव लाभ मिळत राहील. मग काय, केवळ अेका भीषण-रम्य दृश्याच्या लोभानें आपण या नाना हितकर गोष्टींना लाथाडावें? सौन्दर्य-विलासाला सुद्धां कांहीं तरी मर्यादा असावी. आपल्या राणीला हसविण्यासाठीं आपली राजधानी जाळणाऱ्या नीरो बादशाहाच्या सुलतानी वृत्तींत व या सौन्दर्यासक्तींत तत्वतः काय भेद आहे?

याला अुत्तर म्हणून जें सांगितलें जातें त्याचा अुल्लेख करण्यापूर्वीं येथें थोडेसें विषयान्तर करणें आवश्यक आहे. युरोपांत जेव्हां महायुद्ध चालू झालें आणि तेथील लाखों तरुण तोफा-बंदुकांचें खाद्य बनले, तेव्हां साहित्यशिरोमणि रोमें रोलांची भूतदया पाझरली आणि तिनें घायाळ लोकांच्या सेवेचा कांहीं थोडासा प्रबंधहि केला. परंतु अुभय पक्षांच्या शत्रूंनीं जेव्हां परस्परांच्या कलापूर्ण अिमारतींवर बाँबचा वर्षाव सुरू केला त्यावेळीं मात्र रोमें रोलाँचा कलात्मा पुण्यप्रकोपानें भडकला; आणि त्यांनीं आपला आवाज अुंचावून साऱ्या युरोपला सांगितलें: "हे करंट्यांनो! तुम्ही परस्परांना मारा — जगांतून नाहींसे व्हावयाचें असेल तर नाहींसे व्हा. पण या कलाकृति म्हणजे आत्म्याच्या अभिव्यक्तीच्या अमर कृति आहेत; यांच्या द्वारां मानवजातीचा आत्मा स्वतःला प्रकट करीत आहे; निदान यांचा तरी नाश करूं नका."

युरोपच्या आत्म्यानें रोमें रोलांची ही आर्षवाणी अेकली आणि कलाकृतींचा संहार त्या लोकांनीं थांबवला. मग काय, कलाकृति या खरोखरीच मानवी आत्म्याच्या द्योतक वा प्रेरक आहेत? — कीं त्या अुच्च अभिरुचीनें झांकलेल्या विलासितेचीच साधनसामग्री आहेत?

कलेला ज्यानें खरोखर जाणलें आहे तो लगेच सांगेल कीं, कला व विलासिता यांच्यामध्यें पृथ्वी व आकाश यांच्या अितकें अंतर आहे, आणि कलाकृतींच्या द्वारां मनुष्याला जो निरतिशय आनंद होतो तो खरोखर सुप्त आत्म्याला जागृत करतो. कोट्यवधि वोल्ट'ची वीज अुत्पन्न

करून लाखों लोकांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणें ही कांहीं अनिष्ट गोष्ट नाहीं; पण कलेच्या द्वारा जो आनंद व संस्कार मनुष्याला मिळतो तो मात्र आत्म्याचेंच खाद्य आहे.

आणि हा जोग म्हणजे कांहीं मानवकृत कलाकृति नव्हे. अुलट कलाकारांना भव्यतेचें व रम्यतेचें अेकसमयावच्छेदें शिक्षण व दीक्षा देणारी प्रकृतिमातेची ती विलक्षण विभूति आहे. त्याला बिघडविणें म्हणजे नास्तिकतापूर्ण विद्रोह करणें आहे. आणि तत्पूर्वी आपल्याला हजार वेळां विचार करावा लागेल! जोगचा प्रपात केवळ या युगाची संपत्ति नाहीं. आमच्या अनेक ऋषि-पूर्वजांनीं याच्यापुढें बसून परमेश्वराचें ध्यान केलें असेल आणि आमच्या वंशजांचे वंशजहि याला पाहून आपल्या जीवनाच्या अज्ञात व सुप्त अंगांचा साक्षात्कार करतील.

अुपयोगितावादाचा आश्रय घेअून "अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन्" असे पढतमूर्ख आपण बनूं नये. हा प्रपात सुरक्षित ठेवून जर यापासून कांहीं लाभ करून घेतां येण्याजोगा असेल तर तो अवश्य करून घ्यावा. मानवबुद्धीला ही गोष्ट असंभाव्य वाटतां अुपयोगी नाहीं. परंतु या तांडव-योगाच्या दर्शनापासून मनुष्यजातीला वंचित करण्याचा धर्मतः कोणालाहि अधिकार नाहीं. देवळांत आपण मूर्तीची स्थापना करतों. निसर्गानेंहि या ठिकाणीं त्याच विराट् स्वरूपाच्या अशा भव्य प्रतिमा आमच्यापुढें अुभ्या केल्या आहेत. येथें केवळ दर्शन, ध्यान, अुपासना करण्याकरितांच यावें आणि हृदयांत तसें सामर्थ्य असेल तर तदाकार होअून जावें!

# शैली-बोधिनी टीका

[ लेखक : प्रिन्सिपॉल सतीश कालेलकर अेम. अे. ( ऑक्सफर्ड ) ]

## मुखपृष्ठावरील श्लोक

**विश्वस्य मातरः** – हे राजन्, अशा प्रकारें आठवत गेल्या तसतशा, अितक्या नद्या मीं सांगितल्या. या सर्व विश्वाच्या माता आहेत, आणि सर्वच महान फल देणाऱ्या आहेत.

( धृतराष्ट्राच्या प्रश्नाला अुत्तर म्हणून संजयानें भारतवर्षाचें वर्णन करतांना जी नद्यांची नामावली दिली तिच्या अुपसंहारार्थ हें वाक्य म्हटलें आहे. महाभारतांतील भीष्मपर्वाच्या नवव्या अध्यायाच्या ३७ व्या व ३८ व्या श्लोकांचे पहिले दोन दोन चरण घेअून हा श्लोक बनविला आहे. )

**यथास्मृति०** : 'नद्या अनेक आहेत. मी फक्त आठवल्या तेवढ्या सांगितल्या,' असा भाव आहे. ३७ व्या श्लोकाच्या शेवटच्या दोन चरणांत हें स्पष्ट आहे : 'तथा नद्यस्त्वप्रकाशाः शतशोऽथ सहस्रशः' ॥

तसेंच विशेष प्रसिद्ध नसलेल्या अशा तर शेंकडों आणि हजारों नद्या आहेत.

[ यांत संजयाची ( आणि लेखकाचीहि ? ) स्वतःच्या देशाबद्दलची अुत्कट देशभक्ति दिसून येते. सुजला सुफला मातेची विपुलता कोणी कमी लेखील अशी अतिस्नेहापासून अुद्भवलेली पापशंका यांत दिसून येते. ]

## अुपस्थान

**अुपस्थान** : पूजा, वंदन, अुपासना. अुदा० सूर्याचें अुपस्थान; संध्येचें अुपस्थान, अि.

**पूर्वजांची नदीभक्ति** : लेखक सरस्वती-पुत्र सारस्वत आहे या गोष्टीचें येथें स्मरण झाल्याशिवाय राहत नाहीं.

**भक्तीचे अुद्‌गार श्रवण करून**: श्रवण-भक्ति करून. त्यांतहि पुण्य सांठविलें आहे असें समजतात.

**संस्कृतिपुष्ट**: जगांतील जवळ जवळ सर्वच संस्कृत्या नदीकांठींच विकास पावल्या आहेत. अुदा० अीजिप्तची नाअीलच्या कांठीं, खाल्डियाची युफ्रेटिस व टायग्रिसच्या कांठीं, चीनच्या यांगसे क्यांग व होआंगहोच्या कांठीं, मध्य अेशियाची अमुदरिया व सरदरिया यांच्या कांठीं; हिन्दुस्थानची पंचसिंधु, गंगा-यमुना, आणि कृष्णा-गोदेच्या कांठीं.

## सखी मार्कंडी

**पृ. ३ मार्कंडी**: बेळगांव पासून नअू मैलांवर असलेल्या लेखकाच्या बेळगुंदी गांवाजवळून वाहणारी अेक चिमुकली नदी.

**प्रपात**: धबधबा.

**वैजनाथ** ( सं.वैद्यनाथ ) बेळगांव जवळील अेक डोंगर. यांत अनेक अमूल्य वनस्पत्यौषधि सांपडतात असें वैद्यलोक म्हणतात.

**पृ. ४ जिज्ञासा**: जाणण्याची अिच्छा. ( 'पिपासा' प्रमाणें )

**मृत्युंजय**: महादेवाचें अेक नांव. ( ज्यांत विभक्तीच्या प्रत्ययाचा लोप होत नाहीं असा अलुक् समास. धनंजय, गणंजय अि. प्रमाणें )

**आयुर्धारा**: मार्कंडेय 'सप्तकल्पान्तजीविन्' म्हणजे सात कल्पें आयुष्य मिळालेला झाला असें आख्यानांत आहे. त्यावरून अेखाद्यास दीर्घायुषी हो असा आशीर्वाद देतांना 'मार्कंडेयायुर्भव' असा आशीर्वाद देण्याची देखील चाल आहे. आयुर्धारा मार्कंडीच्या रूपानें वाहत आहे ही लेखकाची कल्पना.

**भाअूबीज**: कार्तिक शुद्ध द्वितीयेच्या दिवशीं यमुनेनें स्वतःच्या भावाला म्हणजे यमाला घरीं बोलावून पूजा करून जेवूं घातलें होतें म्हणून या दिवसाला यमद्वितीया देखील म्हणतात. त्या दिवशीं बहीण स्वतःच्या भावाची पूजा करून भोजनापूर्वी खालील श्लोक म्हणून संकल्प सोडते :

भ्रातस्तवानुजाताऽहं भुंक्ष्व भुक्तमिदं शुभम् ।
प्रीतये यमराजस्य यमुनाया विशेषतः ॥

(मोठी बहीण असल्यास ती 'भ्रातस्तवाग्रजाताऽहम् असें म्हणते.')

**मृगनक्षत्र:** भाऊबीजेच्या दिवसांत-हिंवाळ्यांत-मृगनक्षत्र रात्रभर आकाशांत असतें. ( मृगनीता रात्रयः )

**पृ. ५ लावण्य:** ( सं.लवण+य ) गोडी-यौवनकांति.

याचें लक्षण: मुक्ताफलेषु छायायाः तरलत्वं अिवान्तरा ।
प्रतिभाति यदंगेषु तल्लावण्यमिहोच्यते ॥

## कृष्णेचीं संस्मरणें

**सातारा :** लेखकाचें जन्मस्थान.

**पृ. ६ स्वर्गांत सुद्धां** : ( तुलना : शिखांचे गुरु नानकशा स्वर्गांत देखील खिन्न राहत असलेले पाहून भगवंतांनीं अेकदां कारण विचारलें. नानकशा म्हणाले "या तुमच्या स्वर्गांत सर्व कांहीं आहे पण मक्याची कणसें आणि 'सरसू' ची भाजी मात्र नाहीं; यामुळें सारखी पृथ्वीची आठवण होते !!" लोक-मानसच असल्या कथा रचूं जाणे ! )

**पृ. ७ अेकश्रुति** : वैविध्य नसलेला ( monotonous ). हा वैदिक शब्द आहे. वेदांत तीन प्रकारचे अुचार आहेत :— अुदात्त, अनुदात्त, व स्वरित. या तिन्हींपैकीं अेकच अुचार फरक न करतां चालविणें याला अेकश्रुति म्हणतात.

**जंगम** चालणारा. **स्थावर :** न चालणारा, स्थिर.

**पृ. ८ जीवनलीला :** जीवन म्हणजे आयुष्य व पाणी या दोन्ही अर्थीं.

**अनंतबुवा मर्ढेकर :** यांच्याच पवित्र स्मरणांना लेखकानें 'हिमालयांतील प्रवास' अर्पण केला आहे. लेखकाचे ते प्रिय सुहृद्. समर्थ श्रीरामदासांच्या मर्ढे मठांतील गृहस्थाश्रमी मठपतींच्या वंशांत यांचा जन्म झाला. वडील पुराणिक व हरदास होते. मराठी ट्रेनिंग कॉलेजांत तयार होअून प्रथम मास्तर झाले. नंतर लेखकाच्या नेतृत्वाखालीं चालणाऱ्या गंगनाथ विद्यालयांत सामील झाले. त्या विद्यालयाला निधि मिळवून देण्याकरितां ते सर्वत्र फिरत असत. त्यांचा मासिक खर्च कधींच दहा रुपयांच्या वर जात नसे. संस्थेच्या व्यवस्थेनुसार त्यांना जे मासिक पांच रुपये हातखर्चाला म्हणून मिळत ते देखील ते विद्यार्थ्यांकरितां खर्चून टाकीत; किंवा हिशोबांत कोठें

चूक आढळल्यास त्याची तोंडमिळवणी करण्यांत त्यांचा अुपयोग करीत. त्यांचें पवित्र जीवन पाहून पुष्कळ लोक त्यांचेकडून गुरुमंत्र मागत. पण स्वतःची अितकी लायकी नाहीं असें नम्रपणें सांगून ते असल्या विनंतीचा अस्वीकार करीत.

पृ. ९ **गंगेचे :** कृष्णेला वाअीकर प्रेमभक्तीनें गंगा म्हणतात.

**शिरःस्नान :** कृष्णेच्या पुरांत वाअीची किती तरी मंदिरें कळसासहित बुडून जातात.

**स्वराज्यऋषि :** स्वराज्याचें ध्यान करणारे, स्वराज्यासाठीं तपश्चर्या करणारे, व स्वराज्याचा मंत्र देणारे.

**पट-वर्धन :** द्रौपदीच्या पटा (वस्त्रा)चें वर्धन करणारे भगवान् श्रीकृष्ण.

**श्री अब्बाससाहेब :** पै. वा. अब्बास तैयबजी. कॉंग्रेसच्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष बद्रुद्दिन तैयबजी यांचे हे पुतणे. पुढें त्यांचे जामात झाले. पूर्वजीवनांत बडोद्याच्या हायकोर्टाचे न्यायमूर्ति होते. अुत्तरजीवनांत महात्माजींच्या प्रभावळींत येअून त्यांनीं जाहीर जीवनांत महत्त्वाचें कार्य केलें होतें. पंजाब हत्याकांडाच्या चौकशी-समितींत ते होते. असहकाराच्या आन्दोलनांत, टिळक-स्मारक फण्ड गोळा करण्याच्या कामांत, सरकारी शाळा व कोर्टें यांच्यावर निरोधन करण्याच्या कामांत, खादीप्रचाराच्या कामांत, हिन्दू-मुस्लिम अैक्याच्या कामांत, गुजराथ-प्रलयसंकटाच्या वेळीं मदत देण्याच्या कामांत, बारडोलीच्या लढ्यांत व धरासणाच्या मिठागरावर हल्ला नेणाऱ्या महात्माजींच्या तुकडीचे नेते म्हणून त्यांनीं महत्त्वाची कामगिरी केली होती.

**श्री पुणतांबेकर :** मुंबअीच्या राष्ट्रीय महाविद्यालयाचे त्यावेळचे आचार्य. खादीवर निबंध लिहिल्याबद्दल श्री वरदाचारी बरोबर विभक्त झालेलें पारितोषिक यांना मिळालें होतें. नंतर बनारस हिंदु युनिव्हर्सिटींत अितिहास विभागाचे मुख्य प्राध्यापक झाले. सध्यां नागपूर येथें राजकारण विभागाचे मुख्य व 'राघवेन्द्रराव प्रोफेसर' म्हणून काम करीत आहेत.

**कृष्णांबिका :** कृष्णामैया.

**श्री गिदवाणीजी :** स्व० श्री असुदमल टेकचंद गिदवाणी हे गुजराथ विद्यापीठाचे पहिले कुलनायक (व्हाअीस चॅन्सेलर) आणि गुजरात महाविद्यालयाचे पहिले आचार्य.

## गंगा माओी

**पृ. ११ देवव्रत :** भीष्माचें मूळचें नांव देवव्रत होतें. परन्तु पित्याला — शंतनूला — सत्यवती नांवाच्या अेका मासेमाराच्या कन्ये-बरोबर विवाह करतां यावा व वारशाचा झगडा पुढेंमागें होणार नाहीं अशी खात्री सत्यवतीच्या बापाला मिळावी म्हणून देवव्रतानें आजन्म ब्रह्मचर्य-पालनाची भीष्म (भीषण) प्रतिज्ञा घेतली म्हणून त्याला भीष्म असें नांव मिळालें. भीषण प्रतिज्ञेला भीष्म-प्रतिज्ञा अेवढ्याकरितांच म्हणतात.

**साम्राज्यें :** हर्षाचें, मौर्यांचें अि.

**कुरुपांचाल :** दिल्लीच्या आसपासच्या भागाला कुरु व गंगा-यमुनेच्या मधल्या भागाला पांचाल म्हणत.

**अंगवंगादि :** गंगेच्या अुजव्या किनाऱ्यावर असलेलें प्रख्यात राज्य तें अंग. याची राजधानी चंपा होती. ही नगरी म्हणजे सध्याचें भागलपूर असावें किंवा जवळपासचें कुठलें तरी शहर असावें असें समजतात. पूर्व-बंगाल म्हणजे वंग यांत समुद्रकिनाराहि येअून जाओ. (अुत्तर बंगालला गौड किंवा पुंड्र म्हणत.)

**पृ. १२ सर्वांचें स्मरण होतें :** गंगेच्या कांठीं शेती आणि व्यापारच नव्हे, तर काव्य, धर्म, शौर्य, आणि भक्ति -- थोडक्यांत म्हणजे सर्वंध संस्कृतीचाच विकास झाला आहे. तुलना : पं. जवाहरलाल नेहरू यांनीं नुकत्याच (१९४६ मध्यें लिहिलेल्या Discovery of India या ग्रंथांत अशाच प्रकारचा अुल्लेख केला आहे :

> " And the Ganga, above all the rivers of India, which has held India's heart captive and has drawn uncounted millions to her banks since the dawn of her history. The story of the Ganga, from her source to sea from old times to new, is the story of India's civilization and culture, of the rise and fall of Empires, of great and proud cities, of the adventure of man and the quest of the mind which has so occupied India's thinkers, of the richness and fulfilment of life

as well as its denial and renunciation, of ups and downs, of growth and decay, of life and death " (पृष्ठ ४३.)

**अुत्तर काशी :** गंगोत्रीहून अुगम पावल्यानंतर गंगा जेथें प्रथमच अुत्तर-वाहिनी बनते तें स्थान. पहा 'हिमालयांतील प्रवासा' तील वर्णन.

**देवप्रयाग :** जेथें भागीरथी व अलकनंदा यांचा संगम होतो ती जागा. (पाहा. हि. प्र.)

**लक्ष्मणझूला :** हृषीकेश जवळ अत्यंत प्राचीन काळीं गंगेवर दोरखंडांना शिंकीं टांगून अेक झुलता पूल बांधला होता. आतां तेथें तारेचे दोरखंड व लोखंडी सळ्या लावून पक्का झुलता पूल बांधला आहे. जवळच लक्ष्मणाचें मंदिर आहे. (पाहा हि. प्र.)

**कराल दंष्ट्रा :** भयंकर दाढ. तुलना : बहूदरं बहुदंष्ट्राकरालम् । (गीता ११-२४), दंष्ट्राकरालानि च ते मुखानि । (गीता ११-२५)

**त्रिवेणीसंगम :** गंगा, यमुना व (गुप्त रूपानें) सरस्वती यांचा प्रयागाजवळ संगम होतो. तिघी तेथें अेकमेकींत गुंफल्या जातात म्हणून त्या संगमाला 'युक्तवेणी' म्हणतात. बंगालमध्यें मुखाजवळ गंगेचे शतशः प्रवाह बनतात म्हणून तेथें त्या प्रकाराला 'मुक्तवेणी' म्हणतात.

**वर्धमान :** वाढत जाणारी.

**शर्मिष्ठा-देवयानी :** दैत्यराज वृषपर्व्याची कन्या शर्मिष्ठा अिच्याशी दैत्यगुरु शुक्राचार्यांची कन्या देवयानी अिची गाढ मैत्री होती. अेके दिवशीं दोघी जलक्रीडा करण्यास गेल्या. देवयानी पाण्यांतून प्रथम बाहेर पडली, आणि चुकून तिनें राजकन्या शर्मिष्ठेचीं वस्त्रें अंगावर चढवलीं. यांतून भांडण होअून व तें विकोपास जाअून शर्मिष्ठेनें कोरड्या पडलेल्या अेका विहिरींत देवयानीस ढकलून दिलें. थोड्या वेळानें शिकार करून दमून भागलेला ययाति राजा तृषार्त होअून तेथें आला असतां त्यानें देवयानीस हात देअून बाहेर काढलें. घरीं जाअून देवयानीनें वडिलांकडे तक्रार केली. क्रुद्ध झालेले शुक्राचार्य राज्य सोडून जाण्यास तयार झाले. वृषपर्व्यानें शेवटीं शर्मिष्ठेला देवयानीची दासी म्हणून ठेवण्याचें कबूल केलें, तेव्हां कोठें शुक्राचार्य परतले. पुढें संकटप्रसंगीं

हात देणाऱ्या ययातीचेंच करग्रहण करून जेव्हां देवयानी सासरीं गेली तेव्हां तिनें शर्मिष्ठेला दासी म्हणून बरोबर नेलें. तेथें तिच्या रूपगुणांवर मोहित होऊन ययातीनें शर्मिष्ठेशीं गुप्तपणें लग्न केलें, आणि शेवटीं तिचाच सर्वांत धाकटा मुलगा ययातीचा वारसदार झाला ! म्हणूनच येथें देवयानीची कथा ऐकतांना 'महत्प्रयासानें एकमेकांत मिसळणाऱ्या' प्रवाहांचें स्मरण होतें असें म्हटलें आहे.

**पृ. १३ प्रयागराज :** [ प्र (चांगल्या तऱ्हेनें) + यज् (पूजा करणें) + अ (अधिकरण) = जेथें उत्तम तऱ्हेनें पूजा झाली आहे असें ठिकाण. ] अलाहाबाद. जेथें दोन नद्यांचा संगम होतो तें काव्यमय स्थान यज्ञासाठीं पसंत केलें जात असें.

**सरयू :** कैलास पर्वतावरील मानस सरोवरांतून उगम पावून अयोध्येला लागून वाहणारी नदी. हिलाच घोग्रा देखील म्हणतात. सरांतून (सरोवरांतून) निघाली म्हणून हिला सरयू नाम प्राप्त झालें. मराठींत 'शरयू' देखील म्हणतात.

**चंबल, रंतिदेव :** चंबल वरील प्रकरण पाहा.

**शोणभद्र, गज़ग्राह :** शोणभद्रावरील प्रकरण पाहा.

**पाटलीपुत्र :** संध्याचें पाटणा. यालाच कुसुमपुर असेंहि म्हणत.

**मगधसाम्राज्य :** समुद्रगुप्ताच्या काळीं याचा विस्तार सिन्धूपासून कावेरीपर्यन्त होता.

**दाक्षिण्य :** संस्कृतांत दक्षिण शब्दाचे 'विनयी' आणि 'दक्षिण दिशा' असे दोन अर्थ होतात. याचा फायदा घेऊन लेखकानें माना-पमानाच्या प्रश्नावर भांडूं पाहणाऱ्या नद्यांनीं सलोखा करून दाक्षिण्य (विनयीपणा, नम्रत्व) धारण केलें व येथून त्या दक्षिणवाहिनी झाल्या असे दोन अर्थ अभिप्रेत केले आहेत.

विनय या अर्थानें दाक्षिण्याचें लक्षण खालीलप्रमाणें दिलें आहे :

दाक्षिण्यं चेष्टया वाचा परचित्तानुवर्तनम् । वाणी व वर्तनानें परक्यांच्या वृत्तीला अनुकूल होऊन आनंद देणें म्हणजे दाक्षिण्य.)

पृ. १४ : सगरपुत्र : सूर्यवंशांतील बाहु नांवाचा राजा युद्धांत हारून, राज्य सोडून, हिमालयांतील जंगलांत पळून गेला. तेथेंच त्याचा अंत झाला. त्यावेळीं त्याची अेक राणी सगर्भा होती. तिच्या सवतीनें त्या गर्भाचा नाश व्हावा या हेतूनें तिला विष घातलें. पण अितकें करूनहि तो गर्भ स्थिर राहिला. अशा तऱ्हेनें 'गर' म्हणजे विषासहित तो जन्माला आला म्हणून त्याला 'सगर' म्हणण्यांत आलें. वयांत आल्यावर सगरानें बापाचें राज्य परत मिळविलें. त्याच्या शैब्या नांवाच्या राणीनें असमंजस् नांवाच्या पुत्राला व अेका कन्येला जन्म दिला. त्याच्या वैदर्भी नांवाच्या दुसऱ्या राणीला प्रसूतिकाळीं अेक मांसाचा गोळा अुत्पन्न झाला ! पण त्या मांसपिंडांतून साठ हजार पुत्र निघाले ! पुढें सगरानें ९९ यज्ञ पूर्ण करून १०० व्या यज्ञाला आरंभ केला. शंभर यज्ञ पूर्ण झाले तर स्वतःचें अिन्द्र-पद सगराकडे जाअील या भीतीनें अिन्द्रानें यज्ञाचा मोकळा सोडण्यांत आलेला घोडा चोरून पाताळांत कपिल मुनि तपश्चर्या करीत होते तेथें नेअून बांधला. सगराच्या साठ हजार पुत्रांनीं घोड्याकरितां सर्व पृथ्वी धुंडाळली. पृथ्वीवर कोठें घोडा नाहीं अशी खात्री झाल्यानंतर पाताळांत जाण्याकरितां त्यांनीं पृथ्वी बरीचशी खणून काढली. (सगराच्या साठ हजार पुत्रांनीं या अफाट खड्यांत पुढें जेव्हां पाणी भरलें तेव्हां त्याला सागर असें नांव मिळालें.) शेवटीं अेकदांचे ते घोड्यांपाशीं येअून पोहोचले. ध्यान करीत बसलेल्या कपिल मुनींना ढोंगी चोर समजून त्यांचा सगर-पुत्रांनीं अपमान केला. क्रोधित मुनींनीं स्वतःच्या तपोबलानें त्यांना अेका क्षणांत जाळून भस्म करून टाकलें. पुढें चुलत्यांच्या व घोड्याच्या शोधार्थ निघालेला असमंजस्चा पुत्र अंशुमान् फिरत फिरत तेथें येअून पोहोचला. मुनींना प्रसन्न करून त्यानें घोडा तर परत आणला व अशा रीतीनें यज्ञ अेकदांचा पुरा केला. पण स्वतःच्या साठ हजार चुलत्यांची सद्‌गति कशी होअील याचीहि माहिती त्यानें कपिल मुनीकडून आणली. स्वर्गांत वाहणाऱ्या गंगेला पृथ्वीवर आणून गंगाजलाचा स्पर्श जर त्या भस्म झालेल्या सगरपुत्रांना कुणीं करविला तर त्यांचा अुद्धार होअील असें कपिल मुनींनीं सांगितलें. अंशुमानानें स्वतःचें सर्व आयुष्य याकरितां तपश्चर्या (Surveying ?) करण्यांत घालविलें. त्याचा पुत्र दिलीप यानेंहि ही तपश्चर्या पुढें चालू ठेवली.

आणि शेवटीं दिलीपाचा मुलगा भगीरथ यानें ती तपश्चर्या पूर्ण करून गंगेला पृथ्वीवर आणलें. तिचा प्रवाह जेव्हां साठ हजार सगरपुत्रांच्या भस्मीभूत देहांवरून गेला तेव्हां त्यांचा अुद्धार झाला. भगीरथानें गंगेला स्वर्गांतून पृथ्वीवर अुतरविली म्हणून तिला भागीरथी नांव मिळालें. [भगीरथ हा कालवा बांधण्याच्या (Irrigation) विद्येंत तज्ज्ञ असावा. यावरून 'अिरिगेशन' करितां "भगीरथविद्या" हा सुन्दर शब्द लेखकानें भारतीय पारिभाषिक शब्दभांडाराकरितां अुत्पन्न केला आहे.]

## संगम

पृ. १५ : **कलंकावांचून** : तुलना : मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति ।

**अपवादावांचून** : तुलना : Exception proves the rule. अुत्सर्गाः सापवादाः ।

**मिसोरी-मिसिसिपी** : या नदीची लांबी ५४३१ मैल आहे ! जेथें या दोन नद्यांचा संगम होतो तेथें पात्राची रुंदी पांच हजार फूट आहे ! (सामान्यतः हिला मिसिसिपी-मिसोरी म्हणतात.)

**द्वन्द्व समास** : यांत दोन्हीं पदें समान कक्षेचीं असतात या गोष्टीवर भर आहे.

**सीताहरणापासून** : . . . अि० : — रावण जेव्हां सीतेला पळवून नेअूं लागला तेव्हां सीतेच्या साडीचा पदर हंपीजवळील अेका खडकावर अडकून ओढला गेला त्यामुळें त्या खडकावर अेक रेषा अुमटली. आज देखील ती कायम आहे ! ! तसेंच विजयनगराच्या साम्राज्याचा कारभार देखील तुंगभद्रेच्या किनाऱ्यावरूनच चालत असे. अि. १३४६ मधें या साम्राज्याची स्थापना झाली. या साम्राज्याचा विस्तार कृष्णेपासून तो थेट कन्याकुमारीपर्यन्त होता. सवादोनशें वर्षें मुसलमानांच्या आक्रमणाला टक्कर देअून अि. १५६५ सालीं हें साम्राज्य अस्तंगत झालें. विजयनगरचा विस्तृत अितिहास 'अेक नष्टस्मृति साम्राज्य' ('अे फरगॉटन् अेम्पायर या अंग्रजी पुस्तकाचें भाषांतर) या पुस्तकांत सांपडेल.

**खडकवासला :** पुणें-सिंहगड रस्त्यावरील सुदीर्घ जलागार (water works). येथूनच पुण्यास पाण्याचा पुरवठा होतो. आतां तेथें अखिल भारतीय सैनिक शिक्षण विद्यालय निघणार आहे.

**चिंताजनक :** मनुष्य चिंता करूं लागला म्हणजे त्याच्या डोळयांची विशेष अुघडझांक होते. स्वतःच्या 'डोळ्या'ची अुघडझांक करणारे तारे जणूं काय चिंता करीत होते.

**बांग :** नमाजाची वेळ झाली, नमाजाकरितां चला, असें स्मरण देण्याच्या हेतूनें मशीदीच्या मनोऱ्यावरून देण्यांत येणारी आरोळी. (अरबी भाषेंत हिला 'अझान' म्हणतात.) प्रार्थनेचें स्मरण करविणाऱ्या बांगेप्रमाणें हे चरक रस-पानाचें स्मरण करून देत आहेत.

**लकडीपुलापासून :** लकडी-पुलाजवळ अेक व ओंकारेश्वरीं अेक अशीं दोन स्मशानें आहेत.

**कॅप्टन मॅलेट :** पेशवाअी बुडविण्याचीं कारस्थानें करणारा ब्रिटिश वकील.

**गगनचुंबी नम्रनामधेया :** कर्वे विश्वविद्यालयाला ज्याचें नांव देण्यांत आलें आहे त्या ठाकरसी कुटुंबाचा संगमरवरी महाल अेका टेकडी-वर आहे. म्हणून तो गगनचुंबी अथवा अुंच शिर असलेला म्हटला आहे. मालक लक्ष्मीपुत्र, महाल संगमरवरी, पण नांव 'पर्णकुटी'! पांचोळ्याची झोंपडी म्हणून तिला नम्रनामधेया म्हटलें आहे. महात्माजींचे दोन अैतिहासिक अुपवास येथेंच झाले होते.

**येरवडा :** महात्माजींच्या वास्तव्यानें जग-प्रसिद्ध झालेलें पुण्याजवळील कारागार. महात्माजी याला 'यरवडा-मंदिर' म्हणत.

## वेदांची धात्री

पृ. १७ **द्वन्द्वः सामासिकस्य च ।** : समासांत मी द्वन्द्व आहें (गीता १०-३३). या समासांत दोन्ही पदांचें महत्त्व सारखेंच असतें या गोष्टीवर भर आहे.

## अंबा-अंबिका

पृ. १८. महाभारतांत खालीलप्रमाणें कथा आहे. काशीराजाच्या मुलींच्या स्वयंवरांतून भीष्म त्याच्या अंबा, अंबिका व अंबालिका या

तिन्ही मुलींना अुचलून घेअून आला. मुलींशीं लग्न करूं पाहणाऱ्या शाल्वराजाबरोबर याबद्दल जें युद्ध झालें त्यांत भीष्मानें त्याचा पराभव केला. ब्रह्मचर्याची भीष्म-प्रतिज्ञा घेतलेल्या भीष्मानें त्या कन्या विचित्रवीर्य राजास अर्पण केल्या. त्यांतील फक्त अेकीनें — सर्वांत मोठ्या अंबेनें — सांगितलें कीं मी मनानें शाल्वराजाला वरून चुकल्यें आहे. तेव्हां तिच्या अिच्छेप्रमाणें तिला शाल्वराजाकडे धाडण्यांत आलें. पण त्यानें तिचा स्वीकार केला नाहीं. बिचाऱ्या अपमानित अम्बेनें भीष्माचे गुरु परशुराम यांच्याजवळ धाव घेतली. गुरूनें आज्ञा करून देखील भीष्म अंबेचा स्वीकार करण्यास तयार झाले नाहींत. यावरून गुरु-शिष्यांचें युद्ध झालें. त्यांत गुरूचा पराभव झाला. शेवटीं निराश व क्रुद्ध झालेल्या अम्बेनें भीष्मवधाचा संकल्प करून तपश्चर्या सुरू केली, आणि अग्निप्रवेश करून देहत्याग केला. तीच पुढें द्रुपदराजाच्या घरीं शिखंडीरूपानें जन्मास आली व भीष्माच्या वधास कारणीभूत झाली.

येथें लेखकानें महाभारतांतील मूळ कथेंत थोडासा फरक केला आहे हें स्पष्ट आहे. रसनिष्पत्तीच्या बाबतींत असें करणें कितपत बाधारूप होतें हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे.

## शोणभद्र

**क्षत्रिय गुरु-शिष्य :** क्षत्रियांचे गुरु ब्राह्मणच असत पण गुरु विश्वामित्र स्वतः देखील क्षत्रिय होते.

**पृ. १९ पीवरकाय :** भरलेल्या शरीराचा, पुष्ट.

**गजेन्द्र-नक्राची लढाअी :** गजेन्द्र-मोक्षाची सर्वांच्या माहितीची कथा पंचरत्न गीतेंत दिली आहे. (अनेक वर्षांपूर्वी Tug-of-war च्या खेळाकरितां 'गजग्राह' हा पारिभाषिक शब्द लेखकानेंच 'अहिन-कुलम्'च्या धर्तीवर अुत्पन्न केला होता.)

**सिन्धु आणि ब्रह्मपुत्रा :** ब्रह्मपुत्रेचें प्राचीन ऋषींनीं दिलेलें खरें नांव ब्रह्मपुत्र आहे. आधुनिक काळीं अिंग्रजीच्या रोमन लिपीमुळें 'ब्रह्मपुत्र' शब्दाचें 'ब्रह्मपुत्रा' झालें असावें.

**कुठें जाअूं आणि कुठें नको :** कालिदासानें शोणाचा हा भाव अेका अुपमेंत सुन्दर दाखविला आहे. अिन्दुमतीचा स्वयंवर झाल्यावर निराश झालेले राजे जेव्हां अजाच्या आडवे आले तेव्हां अजानें त्यांच्या सेनेवर धावून जावून जें आक्रमण केलें त्याची तुलना कालिदासानें 'भागीरथीं शोण अिवोत्तरंगः' म्हणजे गंगेवर धावून जाणाऱ्या अुसळत्या तरंगाच्या शोणाशीं केली आहे.

**नाल्पे सुखमस्ति :** थोड्यांत सुख नाहीं. जें सबंध विश्वाला स्वतांत समावूं शकेल तेंच खरें सुख आहे. (छांदोग्य ७–२३)

## चंबल

**पृ. २० महाभारतासारख्या— . . . शीण वाटत नाहीं :** रंतिदेवाची गोष्ट महाभारतांत दोनदां आली आहे. मेघदूतांतहि त्याचा अुल्लेख आहे.

**हेकॅटॉम्ब :** ( शत + अुक्ष + यज्ञ ) ज्यांत शंभर बैलांचा बळी देण्यांत येअी असा यज्ञ.

## स्वर्धुनी वितस्ता

**पृ. २१ जगांत जर कोठें :** मूळ फारशी ओळी खालील-प्रमाणें आहेत:

अगर फिरदौस बर रूअे ज़मीन अस्त,
हमीनस्तो, हमीनस्तो, हमीनस्त.

**पृ. २२ बुत्शिकन् :** ( बुत्=मूर्ति, शिकन्=भंगणारा ) मूर्तिभंजक. ( बुत्-परस्त=मूर्तिपूजक )

**गाझी :** धर्माकरितां युद्धास जाणारा मुसलमान. असल्या युद्धांत मरण पावेल तो **शहीद.** ( म्हणः जीते तो गाझी और मरे तो शहीद. )

**पृ. २३ सर्वतः संप्लुतोदके :** ( गीता २–४६ ) पुरामुळें सर्वत्र पाणीच पाणी होतें अशा वेळीं.

**रानडुकराच्या सुळयाप्रमाणें :** वराहमूलम् वरून ही अुपमा लेखकाला सुचली असेल काय ?

**पृ. २४ हातापेक्षां लांब बाहीचे:** "काश्मीरची हवा फार थंड असते. त्याकरितां तेथील लोकांनीं मोठे मजेदार अुपाय काढले आहेत. पट्टूचे पायघोळ डगले तर ते घालतातच, पण या डगल्यांच्या बाह्या हाताच्या बोटाबाहेर देखील वीत दीड वीत लांब ठेवलेल्या असतात. शाळकरी मुलगा हातांत अेक दोन पुस्तकें घेअून जात असला तर तीं सुद्धां बाहींत येअून जातात. मुलाला कांहीं खावेसें वाटलें तरी तो होतां होअील तो हात बाहेर काढीत नाहीं. बाहीनेंच खाद्य पदार्थ पकडून तो खातो." (पाहा: लेखकाचें 'जीवनांतील आनन्द' हें पुस्तक )

**अर्थवाद** : मुख्य विषय स्पष्ट करण्याकरितां किंवा त्याचा गौरव करण्याकरितां लिहिलेला भाग किंवा स्तुति.

**पृ. २५ स्वर्धुनी :** [ स्वर् ( स्वर्ग ) + धुनी ( नदी ) ] स्वर्ग-नदी.

## दूधगंगा

**पृ. २६ सरोवर तोडून:** आज जेथें रमणीय काश्मीर आहे तेथें पुराणकालीं सती-सर नांवाचें अेक सुदीर्घ सरोवर होतें. हरमुख पर्वत आणि पीरपुंजालच्या मधें हें सरोवर पसरलें होतें. खुद्द पार्वती या सरोवरांत विहार करीत असे. पण पुढें पुष्कळ राक्षस या सरोवरांत घुसून आश्रय करून राहिले तेव्हां देवांनीं सतीसराचा नाश करावयाचें नक्की केलें. त्याकरितां भगवान कश्यपांनीं वराहाची अुपासना केली व वराहानें संतुष्ट होअून स्वतःच्या सुळ्यांनीं पर्वताला खिंड पाडली, आणि सतीसरचें पाणी 'वराहमूलम्' च्या खिंडींतून वितस्ता नदीच्या रूपानें बाहेर वाहूं लागलें. वितस्ता हीच हल्लींची झेलम आणि वराहमूलम् हेंच आजचें 'बारामुल्ला'." ( पाहा : लेखकाचें 'जीवनांतील आनंद' हें पुस्तक )

**अुपत्यका** : खोरें, खिंड. तसेंच अधित्यका म्हणजे पठार (table-land).

**सतीकन्या :** सतीच्या प्रदेशांत जन्मलेली.

## रावी

पृ. २७ **वैदिक**: वेदांत अुल्लेखिलेली.

**पांच दोआब**: सिंधु आणि झेलमच्या मधला तो सिंधसागर दोआब; झेलम आणि चिनाब यांच्यामधील तो झेच दोआब; चिनाब व रावीमधील तो रेचना दोआब; रावी आणि सतलज मधील तो बारी दोआब; आणि सतलज व बियासमधील तो जालंदर दोआब.

**तीर्थराम**: स्वामी रामतीर्थांचें पूर्वाश्रमीचें नांव. (लेखकाच्या लेखनास सुरुवात आजपासून तीस वर्षांपूर्वी त्यांनीं लिहिलेल्या स्वामी रामतीर्थांच्या मराठी चरित्रानें झाली होती ही नमूद करण्यासारखी गोष्ट आहे.)

**पुलिन**: सुकून गेलेला कांठ (पाहा: श्यानपुलिना नदी–भर्तृहरी)

**जाड्य**: जडता (Inertia या वैज्ञानिक अर्थी)

पृ. २८ **रणजितसिंह** (१७८०–१८३९) शिखांचा राजा. अहमदशाह अबदालीनंतर पंजाब प्रान्त परत शिखांच्या हातीं आला. पण त्यांत लहान लहान राज्यें अुत्पन्न होअून तीं आपसांत लढूं लागलीं. वयाच्या तेराव्या वर्षी गादीवर येणाऱ्या रणजितसिंहानें वयाच्या अेकोणिसाव्या वर्षी शिख राज्यांचें आधिपत्य स्वतःकडे घेतलें. अिंग्रज देखील त्याला वचकून असत. चाळीस वर्षें सतत प्रयत्न करून शिखांत त्यानें लष्करी ताकद पैदा केली. असें सांगतात कीं रणजितसिंह जेव्हां अटक नदी ओलांडून पलीकडे जाअूं लागला तेव्हां त्याच्या गुरुंनीं सांगितलें कीं हिंदूंना अटक न ओलांडण्याची शास्त्रांत आज्ञा आहे. यावर तो म्हणाला:

> सब है भूमि गोपालकी तामें अटक कहां?
> जाके मनमें अटक है, वो ही अटक रहा।

आणि धडाडीनें पुढें जाअून सबंध अफगाणिस्तान त्यानें काबीज केलें!

**अर्जुनदेव** (१५६३–१६०६) शिखांचे पांचवे गुरु. आदि-ग्रंथाची रचना यांनींच केली. त्यांत, पूर्वी होअून गेलेल्या गुरुंची व

संतांची वाणी संग्रहित केली आहे. यांच्या शत्रूंनीं बादशाहाजवळ तक्रार केली कीं या ग्रंथांत हिंदु आणि अिस्लाम धर्मांची निंदा आहे. तेव्हां कांहीं भाग अकबरनें स्वतः वाचून पाहिला आणि अर्जुनदेवांची सुटका तर केलीच पण त्यांचा खूप सन्मानहि केला. जहांगीरच्या काळीं पुन्हां अशीच तक्रार करण्यांत आली. अेकदां जहांगीरचा मुलगा खुशरो हा बापानें त्याला पकडण्याचा हुकुम काढला असतां पळून जाअून आश्रयार्थ गुरु अर्जुनदेवांकडे आला असतां गुरूंनीं त्याला आश्रय दिला होता. हा राजद्रोह झाला, असा आरोप त्यांच्यावर करण्यांत येअून गुरूंच्या शत्रूंनीं बादशाहाकडून त्यांना दोन लक्ष रुपये दंड करविला.

गुरु अर्जुनदेवांनीं हा दण्ड स्वतः तर भरला नाहींच पण कुणाला भरूंहि दिला नाहीं. याबद्दल त्यांना तुरुंगांत डांबून ठेअून क्रूरपणें हाल हाल करून ठार मारण्यांत आलें. तरवारीच्या जोरावांचून स्वतःचा पंथ टिकणें शक्य नाहीं हें ओळखून स्वतःच्या पुत्रास त्यांनीं गादीवर सशस्त्र बसण्याचा व शक्य होअील तेवढें लश्कर गोळा करण्याचा आदेश तुरुंगांतून पाठविला होता. शिखांच्या अितिहासाला या आदेशामुळें पुढें नवीनच वळण मिळालें.

## रेणुकेचा शाप

**पृ. ३१ अन्तःस्रोता :** जिचा प्रवाह भूमीच्या आंत आहे अशी. [अंतः (आंतून) + स्रोत (प्रवाह)]

**योमा :** ब्रह्मी भाषेंत योमा म्हणजे पर्वत.

**अलसलुलित :** [अलस (अळसावलेली) + लुलित (सुन्दर)]

धीर गतीनें व सुंदर रीतीनें असा अर्थ. हा शब्द अुत्तररामचरितांतील पहिल्या अंकांतील २४ व्या श्लोकांत आहे. “अलसलुलितमुग्धान्य-ध्वसंजातखेदात्” अि. फरक अितकाच कीं त्या ठिकाणीं ‘लुलित’ शब्दाचा अर्थ गलित असा आहे.

**अंत्यजांचा शाप :** हरिजनांना पाण्याकरितां नदींच्या वाळवंटांत खड्डे खोदण्याची देखील परवानगी नाहीं म्हणून.

**पृ. ३१ खंडिता :** काव्यशास्त्रांत ज्या मुख्य आठ नायिका सांगितलेल्या आहेत त्यांत खंडिता म्हणजे स्वतःच्या प्रियकराच्या शरीरावर परस्त्री–सहवासाचीं चिन्हें पाहून अपमान व ओर्षेनें भरलेली स्त्री असें सांगितलें आहे.

पार्श्वमेति प्रियो यस्या अन्यसंभोगचिह्नितः ।
सा खण्डितेति कथिता धीरैरीर्ष्याकषायिता ॥
(साहित्यदर्पण)

येथें खंडिता म्हणजे जिचा प्रवाह खंडित झाला आहे असाहि अर्थ घ्यावयाचा.

## त्रिवेणी

**पृ. ३२ ब्रह्मकपाल :** त्या नांवाची शिला. हिच्यावर बसून श्राद्ध केलें असतां पुन्हां कधींच श्राद्ध करावें लागत नाहीं.

**हरीच्या चरणाचा स्पर्श :** हरद्वार येथील 'हरिकी पायरी' या जागेचें सूचन. गंगा हिला लागून वाहते.

## फल्गु

**पृ. ३३ सीतेचा शाप :** अेकदां राम, सीता आणि लक्ष्मण फिरत फिरत फल्गूच्या तीरावर आलीं असतां तेथें रामाला आठवण झाली कीं आज पितृश्राद्धाचा दिवस आहे. तेव्हां त्यानें लक्ष्मणाला सामग्री आणण्याकरितां शहरांत पाठविलें. त्याला येण्यास वेळ झालासें पाहून राम स्वतः शहरांत गेला. परन्तु तेवढ्यांत श्राद्धाचा मुहूर्त निघून जाअूं लागला. तेव्हां सीतेनें स्नानादि करून जी काय सामग्री होती ती घेअून रामाच्या अेवजीं स्वतःच पितरांना पिंडदान केलें. सर्व पितर अत्यंत सन्तुष्ट होअून नदी–प्रवाहांतून हात लांब करून पिंड घेअून गेले. ते जाअूं लागले तेव्हां सीतेनें त्यांना म्हटलें 'तुम्ही प्रत्यक्ष येअून पिंड घेअून गेलांत ही गोष्ट माझ्या पतीला कशी खरी वाटणार?' याला अुत्तर म्हणून आकाशवाणी झाली कीं तूं कोणाला तरी साक्षी ठेव. तेव्हां सीतेनें फल्गु नदी, गाय, अग्नि आणि केवडा यांना साक्षी ठेवलें.

राम-लक्ष्मण सामग्री घेऊन परत आले आणि त्यांनीं सीतेला पिंडांकरितां भात तयार करण्यास सांगितलें. सीता कांहींच बोलली नाहीं व तिनें भातहि केला नाहीं. रामानें कारण विचारलें असतां सीतेनें अित्थंभूत हकीकत सांगितली. पण राम-लक्ष्मणाला हें खरें वाटेना. तेव्हां सीतेनें साक्षी पुढें केले. पण त्या चौघांनींहि अुलटून आम्हांला कांहीं अेक माहीत नाहीं असें सांगितलें! तेव्हां निरुपाय होअून सीतेनें पिंडाचा भात तयार केला, आणि रामानें पितरांना पिंडदानाकरितां आवाहन केलें. त्या वेळेस आकाशवाणी झाली कीं जानकीनें आम्हांला तृप्त केलें आहे. पण रामाचा विश्वास बसेना. तेव्हां दुसऱ्यांदा आकाशवाणी झाली. तरीहि रामाचा विश्वास बसेना. शेवटीं प्रत्यक्ष सूर्यानें येअून साक्षी दिली, तेव्हां रामाची खात्री झाली.

आयत्या वेळीं घात करणाऱ्या त्या चार साक्षीदारांना सीतेनें शाप दिला: फल्गु, तूं पाताळांत राहशील. (म्हणूनच ती वाळवंटाखालून वाहते.); केवड्या, तूं शंकराला अग्राह्य होशील (म्हणूनच शंकराला केवडा वाहात नाहींत.); गाअी, तुझें मुख अपवित्र पण शेपटी पवित्र समजण्यांत येअील (म्हणूनच गाय घाण खाते); आणि अग्नि, तूं सर्वभक्षक होशील.' (शिवपुराण, अध्याय ३०)

**बोधिगया:** जेथें बुद्धाला आत्मज्ञान झालें ती जागा. (पाहा. हि. प्र.)

## नदीवर कालवा

**पृ. ३४ कलौ आद्यन्तयोः स्थितिः** कलियुगांत ब्राह्मण व शूद्र असे दोन वर्ण राहिले आहेत. संस्कारलोपामुळें क्षत्रिय आणि वैश्य शूद्रासारखे झाले आहेत असा प्रवाद दक्षिणेंत पसरविण्यांत आला आहे.

**भगीरथ :** Irrigation Engineer.

**पृ. ३५ माशाप्रमाणें :** पाण्यांत राहणारे मासे जितक्या सहजपणें खेळतात त्याप्रमाणें.

(केवळ अुपमेच्या जोरावर वर्णन किती जिवंत व तादृश होअूं शकतें याची कल्पना या कालव्याच्या वर्णनावरून येअील.)

**परतंत्र पुत्री :** परक्यांचा तंत्रांत सांपडलेली; स्वतःचा नैसर्गिक क्रम सोडून कालवा बांधणाऱ्याच्या 'तंत्रां'त सांपडलेली. सुनेशीं तिचें साम्य दाखविण्याकरितां मुद्दामच या विशेषणाची योजना केली आहे.

**निम्नगा :** खालीं जाणारी नदी. येथें खालून वाहणारी असाहि अर्थ आणण्यासाठीं हा शब्द वापरला आहे.

## सिंधूचा विषाद

**पृ. २६ मानदंड :** मापण्याचा दंड, गज. महाकवि कालिदासाच्या 'कुमारसंभव' या महाकाव्यांतील पहिल्या श्लोकांत हिमालयाकरितां हा शब्द वापरलेला आहे.

अस्त्युत्तरस्याम् दिशि देवतात्मा
हिमालयो नाम नगाधिराजः।
पूर्वापरौ तोयनिधीऽवगाह्य
स्थितः पृथिव्या:अिव मानदण्डः ॥

(ज्यांत देवांचा वास आहे असा हिमालय नांवाचा नगाधिराज पृथ्वीला मापणाऱ्या गजाप्रमाणें पूर्व आणि पश्चिम समुद्रांत स्नान करीत अुत्तरेकडे अुभा आहे.)

**पृ. ३७ पंजाबच्या पांच नद्या :** झेलम, चिनाब, रावी, बियास, आणि सतलज.

**युक्तप्रांतांतील पांच नद्या :** गंगा, यमुना, सरयू, चंबल आणि गोमती.

**अतिभारतीय** : केवळ हिन्दुस्तानांतूनच नव्हे तर त्याच्या सीमेच्या बाहेरून देखील वाहणाऱ्या नद्या.

**वैदिक सप्तसिन्धु :** वेदांत ज्यांचा अुल्लेख आहे अशा सात नद्या — वितस्ता (झेलम), असिक्नी (चिनाब), परुष्णी अथवा अिरावती (रावी), शतद्रु (सतलज), विपाशा (व्यास, बियास) सिंधु, आणि सरस्वती.

**प्राचीन आर्य . . . पडले :** हिन्दुस्थानावर झालेली जवळजवळ सर्वच आक्रमणें वायव्य दिशेकडून झालीं आहेत.

**परोपनिसदी :** अफगाणिस्तानाला ग्रीक भाषेंत हें नांव दिलेलें आढळतें.

**यवन :** Ionian Greek. या शब्दरचनेंतील प्रथम शब्दावरून 'यवन' हा शब्द बनला आहे.

**बाल्हिक :** बल्ख, बॅक्ट्रिया.

**स्वाभाविक सीमा :** लष्करी दृष्ट्या आवश्यक वाटणारी प्राकृतिक सरहद्द. आक्रमक राष्ट्रांना अुपयोगी असा Strategic Frontier चा अेक नवा बूट हल्लीं निघाला आहे.

**सिमेरामिस .** अॅसीरियाची सुप्रसिद्ध राणी. बॅबिलोनची स्थापना हिनें केली होती असें म्हणतात. निनेव्हेचा संस्थापक तिचा पति नीनस याच्यापेक्षांहि ती जास्त पराक्रमी होती. अगदीं अर्भक असतांनाच तिच्या आअीनें तिला सोडून दिलें होतें. प्रथम तिचें लग्न नीनसच्या अेका सरदाराबरोबर झालें होतें. पुढें नीनसचें मन तिच्यावर बसलेलें पाहून तिच्या पतीनें आत्महत्या केली व तिनें नीनसशीं विवाह केला. त्याच्या मागें तीच राज्यारूढ झाली व अुत्तरवयांत तिनें स्वखुशीनें स्वतःच्या पुत्राला गादीवर बसविलें.

**फारस :** अिराण.

**सुवर्णकरभार :** अि. स. पूर्वीं सहाव्या शतकांत इराणचा बादशाह दरायस यानें सिंध प्रान्त जिंकून त्याच्यावर वार्षिक १८५ हंड्रेडवेट सोन्याची खंडणी बसविली होती, त्याचा येथें अुल्लेख आहे.

**युअेची :** अि. स. पूर्वीं पहिल्या शतकाच्या सुमारास शकांना अुत्तर हिंदुस्थानांतून दक्षिणेंत हाकलून लावून अुत्तर भारतांत साम्राज्य स्थापणारे मध्य आशियांतील कुशान लोक. त्यांच्यापैकीं बहुतेकांनीं बौद्ध व कांहींनीं हिंदुधर्म स्वीकारला होता. प्रख्यात बौद्ध सम्राट् कनिष्क स्वतः कुशान होता. कुशान साम्राज्याच्या भरभराटीच्या काळीं त्याचा विस्तार अेवढा मोठा होता कीं त्यांत पश्चिम आशियांतील बोखारा व अफगानिस्तान, मध्यआशियांतील काशगर, यारकंद आणि खोतान, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील काश्मीर आणि पंजाब व पूर्वेस बनारस, आणि दक्षिणेस विंध्यापर्यंतचा सर्व प्रदेश येअून जात असे.

**हूण :** अि. स. पांचव्या-सहाव्या शतकांत अेकामागून अेक हल्ले करून माळवा, सिंध आणि सरहद्द प्रान्तांत राज्य स्थापन करणारे श्वेत हूण.

युरोपांत देखील ॲटिल्लाच्या सेनापतित्वाखालीं या लोकांनीं जुल्माची पराकाष्ठा केली होती. हिंदुस्थानांत त्यांच्या असह्य जुलमाला कंटाळून शेवटीं आर्यावर्तातील सर्व राजांनीं अेकत्र जमून बालादित्य व यशोधर्माच्या नेतृत्वाखालीं हूण राजा मिहिरगुल याचा पराभव करून त्याला कैद केलें. त्यानंतर कांहीं वर्षांनीं हूणांचे हल्ले बंद झाले. हूण राज्य जवळजवळ अर्धे शतक हिन्दुस्थानांत अस्तित्वांत होतें.

**पृ. ३८ गिरगिट :** श्रीनगरच्या वायव्येस १२५ मैलांवर, जवळजवळ ५००० फूट अुंचीवर असलेलें त्या नांवाच्या जिल्ह्यांतील अेक शहर. येथें ब्रिटिश अेजंटाचें ठाणें आहे, आणि लष्करी छावणी देखील आहे. आसपास बौद्ध अवशेष आहेत. अिंग्रजींत याला 'गिलगिट' म्हणतात.

**चित्राल :** वायव्य प्रान्तांतील त्या नांवाच्या राज्याचें मुख्य शहर.

**स्वात :** पंजकोरेस मिळणारी छोटी नदी.

**सफेत कोह :** (कोह = पर्वत) अेका पर्वताचें नांव.

(तुलना : कोह-अि-नूर = तेजाचा पर्वत.)

**बॅक्ट्रिया** = बल्ख

**यंगहसबंड :** हा जन्मानें अँग्लो-अिंडियन होता. १८९३-९४ मधें हा चित्रालचा पोलिटिकल अेजंट होता. १८९५ सालीं चित्रालच्या स्वारीच्या वेळेस यानें 'टाअिम्स'चा रिपोर्टर म्हणून काम केलें होतें.

**अमानुल्लाची . . . चढाअी :** १९१९च्या अेप्रिल महिन्यांत अमीर अमानुल्लानें हिंदुस्थानावर केलेल्या स्वारीचा येथें अुल्लेख आहे. दहाच दिवसांत अफगाणांचा पराभव होअून त्यांना शरण यावें लागले होतें.

**कोहटची क्रूरता :** १९२४च्या ९ आणि १० सप्टेंम्बर रोजीं घडलेल्या घटनेचा येथें अुल्लेख आहे. धर्मान्तर व अपहरण यामुळें वातावरण आधींच तंग होतें. अितक्यांत कोहटच्या सनातनी धर्मसभेच्या मंत्र्यांनीं अेक पुस्तिका प्रसिद्ध केली. मुसलमानांना त्यामुळें त्वेष चढला. हिंदूंनीं झालेल्या प्रकाराबद्दल जाहीर माफी मागून पुस्तिकेच्या अुरलेल्या प्रति जाहीररीत्या जाळल्या. तरीहि मुसलमानांना सन्तोष झाला नाहीं. कडक अुपाय योजण्याबद्दल त्यांनीं सरकारवर दडपण आणलें. त्याचा अुपयोग झाला नाहीं म्हणून मशिदींत अेकत्र जमून जेहाद करण्याच्या त्यांनीं शपथा वाहिल्या. ठरल्याप्रमाणें

९ तारखेस दंगा सुरू झाला. सुरुवात कशी झाली याबद्दल मतभेद आहेत; पण सुरू झाल्यानंतर अेकमेकांवर गोळीबार करण्यापर्यंत मजल गेली. साऱ्या हिंदु लच्याला आग लावून देण्यांत आली. पोलीस व लष्कर यांनीं देखील गोळीबार केला. अेकंदरींत मालमत्ता व प्राणांची बरीच हानि झाली. सर्व हिंदूंना लष्करी रक्षणाखालीं कँटॉनमेंटमध्ये व तेथून त्यांच्या विनती-प्रमाणें रावळपिंडीस नेअून ठेवण्यांत आलें. (बेळगांव येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत या बाबतींत पास करण्यांत आलेल्या ठरावांत, कोहटच्या मुसलमानांनीं सन्मानपूर्वक परत बोलाविल्याखेरीज व त्यांच्या मालमत्तेबद्दल व जीविताबद्दल हमी दिल्याखेरीज हिन्दूंनीं तेथें परत जाअू नये असा सल्ला त्यांना देण्यांत आला होता.)

**कुरम** : सुलेमान पर्वतांतून निघून सिंधूला मिळणारी अेक नदी. वैदिक नांव क्रुमु.

**पृ. ३९ लाहोरचें वैभव** : अकबरच्या आणि त्याच्या वंशजांच्या काळांत लाहोर खूपच भरभराटीस आलें होतें.

**व्यास** : बियास नदी. वेदकालीं हिला विपाशा म्हणत. स्वतःच्या शंभर पुत्रांना राक्षसानें खाल्लेलें पाहून शोकविव्हल झालेल्या वसिष्ट ऋषींनीं स्वतःस बांधून घेअून या नदींत अुडी घेतली असतां नदीनें त्यांना पाशमुक्त म्हणजे विपाश केलें म्हणून या नदीला हें नांव मिळालें, अशी कथा आहे.

**त्यागाय संभृतार्थानाम्** : रघुवंशाच्या सुरवातीसच या वंशाच्या राजांचें वर्णन करतांना कालिदासानें त्यांच्या अनेक गुणांमध्यें त्यागा (दाना) करितां अर्थ (धन) संग्रह करण्याच्या गुणाचा अुल्लेख केला आहे.

**पृ. ४० जयद्रथ काळ** : महाभारत काळ. महाभारत काळांत जयद्रथ हा सिंधु देशाचा राजा होता.

**दाहिर ( ६४५-७१२ )** : सिंधचा अेक ब्राह्मण राजा. हा चच्च राजाचा मुलगा. सिंधला लागून असलेल्या खिलाफत प्रान्ताच्या हज्जाज नांवाच्या सुभेदाराला त्यानें अनेक वेळां हारवलें होतें. शेवटीं महंमद बिन कासम नांवाचा केवळ सतरा वर्षें वय असलेल्या सेनापतीला त्याच्यावर स्वारी करण्यांत धाडण्यांत आलें. या युद्धांत दाहिराचा हत्ती अुधळल्यामुळें

त्याचा प्राणांत झाला, व त्याचें लष्कर पळून गेलें. तेव्हांपासूनच मुसलमानांचा हिंदुस्तानांत प्रवेश झाला. दाहिराची राणी लाडी अिचेबरोबर महंमदानें स्वतः लग्न केलें, व तिच्या दोन कुमारी मुली खलीफाला नजर म्हणून पाठविल्या.

**चच** ( ५९७–६३७ ) वर सांगितलेल्या दाहिराचा हा पिता. त्याच्या वंशाचा अितिहास फारशींत लिहिलेल्या ' चचनामा ' या ग्रंथांत पाहावयास मिळतो. हा राजा फार शूर होता. स्वतःच्या राज्याची हद्द त्यानें थेट काश्मीरपर्यंत नेली होती. हा मूळचा सिंधमधील आरोर गांवच्या शैलज नांवाच्या अग्निहोत्री ब्राह्मणाचा मुलगा. राजाच्या मंत्र्याचा कारकून म्हणून सुरवात करून चढत चढत तो स्वतःच राजा होअून बसला व पूर्वीच्या राजाच्या राणीशीं त्यानें लग्न केलें.

**राजांचे अनाचार:** सिंधमधील अेका ब्राह्मण राजाला अेका ज्योतिषानें सांगितलें कीं तुझ्या बहिणीचा मुलगाच तुझें राज्य लाटणार. तेव्हां याला अुपाय म्हणून त्या राजानें स्वतःच्या बहिणीशींच लग्न लावून टाकलें! दुसऱ्या अेका राजानें अेका सतीवरच अत्याचार केले. लोक असे कांहीं त्रासले होते कीं महम्मद बिन कासिम जेव्हां सिंधवर स्वारी घेअून आला तेव्हां तेथील जाट व मेड लोकांनींच त्याला खूप मदत केली.

**महंमद बिन कासिम:** वर अुल्लेख आलेल्या या सेनापतीचा अंत मोठा विचित्र रीतीनें झाला. त्यानें खलीफाला नजर केलेल्या दाहिरच्या दोन कन्यांनीं खलीफाला सांगितलें कीं महंमदानें आम्हांला आधींच भ्रष्ट केलें असल्यामुळें खलीफाबरोबर लग्न करण्याच्या मानास आम्हीं अपात्र आहोंत. क्रुद्ध खलीफानें महंमदाला हुकूम पाठविला कीं पत्र पोहोचतांच स्वतःस गाअीच्या कातड्यांत शिवून घेअून माझ्यापुढें हजर हो. महंमदानें ही आज्ञा अक्षरशः पाळली. कातड्यांत शिवला गेल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं तो मरण पावला. या स्थितींत त्याचें प्रेत जेव्हां खलीफापुढें रुजू झालें तेव्हां मुलींनीं खलीफाला सांगितलें कीं आमच्या घराण्यातर्फे सूड अुगविण्याकरितां आम्हीं खोटेंच सांगितलें होतें! खलीफानें नंतर त्यांचा देखील शिरच्छेद करविला, आणि मुलींनीं अशा तऱ्हेनें स्वतःचें शील वांचविलें.

**सर चार्ल्स नेपियर** ( १७८२-१८५३ ): १८४२ ते १८४७ मधें सिंध जिंकून ब्रिटिश अमलाखालीं आणणारा अिंग्रज सेनापती. अन्यायानें सिंध काबीज केल्यानंतर या शिपाअी गड्यानें रिपोर्ट केला ' I have sind (sinned)!'

**तरस्वी :** वेगवान्

**सुहिणी :** सिंधी लोककथेंत हिची गोष्ट आहे.

( पाहा लेखकाची " सती कीं कुलटा ? " या नांवाची गोष्ट )

## बिहारची गंडकी

**पृ. ४२ बाण :** विशिष्ट प्रकारचे लंबगोळ गोटे. शिवलिंग.

**दोन टोकें :** नर्मदा आणि गंडकी यांच्यामधें बौद्ध जग पसरलें होतें.

**मांडलिक :** पाणीरूप कर भरणाऱ्या नद्या; येअून मिळणाऱ्या नद्या.

**अनासक्तीचे आद्य प्रवर्तक :** जनक विदेही. जनक अितके अनासक्त होते कीं राजधानीला आग लागली असताहि त्यांनीं मनाचा समतोलपणा सोडला नाहीं.

**अष्टांगिक मार्ग :** भगवान् बुद्धानें अुपदेशिलेच्या आर्य अष्टांगिक मार्गाचीं पुढीलप्रमाणें आठ अंगें सांगितलीं आहेत : १. सम्यक् दृष्टि; २. सम्यक् संकल्प; ३. सम्यक् वाचा; ४. सम्यक् कर्मान्त; ५. सम्यक् आजीव; ६. सम्यक् व्यायाम; ७. सम्यक् स्मृति आणि ८. सम्यक् समाधि.

**मार :** मनुष्याच्या सद्वासनांचा नाश करणारा राक्षस, सैतान. बौद्ध धर्मांत कल्पिलेली आसुरी संपत्तीची अधिष्ठात्री देवता.

## सागर-सरिता संगम

**पृ. ४३ सुरूचें बन :** पाहा या नांवाचें लेखकाच्या 'स्मरणयात्रा' या पुस्तकांतील प्रकरण.

**पृ. ४४ अुगमाचा शोध :** लेखकानें स्वतःच्या ' हिमालयांतील प्रवासां'त म्हटलें आहे : " गंगोत्री, जम्नोत्री, बदरी, केदार, अमरनाथ, खोजरनाथ, मानससरोवर, राक्सताल, परशुरामकुंड, अमरकंटक, महाबळेश्वर, त्र्यंबक, अि. सर्व तीर्थस्थानें नदीचा अुगम शोधून काढण्याच्या, मनुष्याच्या,

नैसर्गिक जिज्ञासेचा परिणाम आहेत असें मला वाटतें. अुत्तर ध्रुवावर राहणारी आर्य प्रजा ज्याप्रमाणें अुष्णता देणारा हा सूर्य अुगवतो तरी कोठून आणि मावळतो तरी कोठें हें शोधून काढण्याच्या जिज्ञासेनें बाहेर पडून सर्व खंडांतून पसरली, त्याचप्रमाणें भारताचे वीर पुत्र स्वतःच्या गुरांढोरांना घेअून किंवा अेकटेच नदीच्या अुगम शोधीत हिंडत राहले असल्यास नवल नाहीं." (अजिंठ्याच्या गुंफांजवळसुद्धां लहानशा नदीचा अुगम आहे.)

**महाबळेश्वर :** वाओजवळ. येथें कृष्णेचा अुगम आहे.

**त्र्यंबक :** नाशीकजवळ. येथें गोदावरीचा अुगम आहे.

## यमुना राणी

**पृ. ४५ भव्यतेची भव्यता कमी :** भव्यतेचे ढिगावर ढिग रचून अतिपरिचयादवज्ञा या म्हणीप्रमाणें त्याचें महत्त्व कमी करणें.

**अूर्जस्विता :** भव्यता

**पृ. ४६ असित ऋषि :** व्यासांचे अेक शिष्य.

(असित = कृष्ण; काळा.)

**देवाधिदेव :** महादेव. स्वर्गांतून अुतरणाऱ्या गंगेला शंकरानें डोक्यावर झेललें होतें.

**अेक सहृदयी ऋषि :** लेखकानें त्याला नांव दिलें आहे 'यामुन ऋषि' (पाहा हि. प्र.).

**अंतर्वेदी :** पूर्वीं गंगायमुनेमधील प्रदेशाला हें नांव होतें. त्यावरून आतां आपण कोणत्याहि दोन नद्यांच्या मधल्या प्रदेशाला अंतर्वेदी (दोआब) म्हणूं लागलो आहोंत.

**श्रीनगर :** हें काश्मीरचें श्रीनगर नव्हें. हें हरिद्वारच्या अुत्तरेला केदारच्या वाटेवर आहे. याला देखील सिद्धपीठ म्हणतात; कारण येथें केलेली साधना कधींच वाया जात नाहीं अशी समजूत आहे.

**पृ. ४७ ब्रह्मावर्त** कुरुक्षेत्राजवळचा दृषद्वती व सरस्वती या नद्यांमधील प्रदेश. हल्लीं याला 'बिठूर' म्हणतात.

**सचिवत्वाणी :** (सचिव = मित्र किंवा मंत्री) येथें दोन्ही अर्थ घेतां येतील. मित्रत्वाच्या नात्यानें दिलेला सल्ला किंवा सलोखा हवा म्हणून

केलेली मध्यस्थी. पांडवकौरवांमधें भांडण न व्हावें व सलोखा राहावा म्हणून कृष्णानें हस्तिनापुरांतच मध्यस्थी केली होती.

**रोमहर्षण :** अंगावर शहारे (आश्चर्याचे व आनंदाचे) अुभे करणारा. 'संवादमिममश्रौषं अद्‌भुतं रोमहर्षणम्' (गीता १८-७४)

**यमराजाच्या भगिनीचें बन्धुत्व :** यम, यमुना (अुर्फ यमी) व अश्विनीकुमार हीं सूर्य व त्याची पत्नी संज्ञा यांचीं मुलें. अेकदां संज्ञेला स्वतःच्या माहेरीं (विश्वकर्मा हा तिचा पिता) जाण्याची इच्छा झाली. पण सूर्य परवानगी देईना. तेव्हां मायेच्या बळानें स्वतःची हुबेहूब प्रतिकृति अशा छाया नांवाच्या अेका स्त्रीस अुत्पन्न करून तिला सूर्याजवळ ठेवून संज्ञा माहेरीं निघून गेली. सूर्याला मुळींच कळलें नाहीं कीं ही स्त्री संज्ञा नव्हे. यमाला देखील तीच मोठा करूं लागली. पण पुढें तिच्या मनांत सापत्न भाव प्रगट झाला व ती यमाची अुपेक्षा करूं लागली. यामुळें रागावलेल्या यमानें अेकदां तिच्यावर लाथ अुगारली. म्हणून छायेनें त्याला शाप दिला. त्यामुळें यमाच्या पायावर व्रण पडले व कालान्तरानें त्यांत किडे सळवळूं लागले. जिकीरीस आलेल्या यमानें सर्व हकीकत सूर्याला सांगितली. अुपाय म्हणून सूर्यानें यमाला अेक कुत्रा दिला. तो त्याच्या व्रणांतून निघणारा पू व किडे खाअून टाकून यमाचा पाय स्वच्छ ठेवूं लागला.

कथेंत म्हटलें आहे कीं, पुढें यमानें दक्ष प्रजापतीच्या तेरा मुलींशीं लग्न केलें. त्यांपासून त्याला खालील प्रमाणें सन्तति झाली. श्रद्धेपासून सत्य, मैत्रीपासून प्रमाद, दयेपासून अभय, शान्तीपासून सम, तुष्टीपासून हर्ष, पुष्टीपासून गर्व, क्रियेपासून योग, अुन्नतीपासून दर्प, बुद्धीपासून अर्थ, मेधेपासून स्मृति, तितिक्षेपासून मंगल, लज्जेपासून विनय, आणि मूर्तीपासून नर आणि नारायण.

प्रत्येक जीवाचा पाप-पुण्याचा हिशोब पाहून यम न्याय देतो. या कामीं त्याचा मंत्री चित्रगुप्त त्याला मदत करतो. यमाचें वाहन रेडा व हत्यार दण्ड आहे.

अशा अखिल सृष्टीवर शासन चालविणाऱ्या भावाची बहीण देखील तशीच प्रतापी असावयाची. तेव्हां तिचा भाअू होअूं पाहणारा मनुष्य असामान्यच असला पाहिजे. वाटेल त्याला तें जुळणार नाहीं, असें येथें सूचन आहे.

**ताजबीबी :** मुमताज महालकरितां हें नाजुक नांव योजलें आहे.

**थिजलेले अश्रु :** शुभ्रमूर्ति ताजमहाल. ताजमहालाबद्दल याच लेखकानें म्हटलें आहे : ‘ ही समाधि नाहीं, अेका प्रेम-रसिक सम्राटाचें दुःख येथें थिजलें आहे’ (पाहाः जीवनांतील आनन्द). गुरुदेव रवीन्द्रनाथांनीं ताजमहालाला ‘कालाच्या कपोला (गाला) वरील अश्रुबिंदु’ म्हटलें आहे.

**पृ. ४८ चर्मण्वती :** या नदीबद्दलचें पुढें येणारें प्रकरण पाहा.

**सिंधु :** माळव्यांतून वाहणारी या नांवाची अेक लहान नदी. मेघदूतांत २९ व्या श्लोकांत हिचा अुल्लेख येतो.

वेनीभूतप्रतनुसलिला तामतीतस्य सिंधुः । अि.

मालतीमाधवांत (४-९) देखील हिचा अुल्लेख आहे.

**तोंडांत साखर घालून :** काल्पीला खडीसाखरेचे कारखाने आहेत. त्याचें सूचन.

**अक्षयवट :** प्रयाग, भुवनेश्वर, गया अि. ठिकाणीं रोवण्यांत आलेले वडाचे डोंब. या वडाची पूजा केल्यानें अक्षय्य पुण्याची प्राप्ति होते म्हणून याला अक्षयवट म्हणतात. (पाहा : हि. प्र.)

**अशोकाचा शिलास्तंभ :** याच्यावर अशोकाचा धर्मलेख कोरलेला आहे. (पाहा. हि. प्र.)

**सरस्वती :** वाणी. प्रयागांत गुप्तस्रोतानें वाहणाऱ्या सरस्वतीचेंहि सूचन आहे.

**पृ. ४९ कादंब :** कलहंस.

**धवलशीला :** शुभ्र (स्वच्छ) शील (चारित्र्य) असलेली. मेघश्यामाच्या जोडीला म्हणून योजलेल्या या विशेषणांत विशेष गोडी आहे.

**इंदीवरश्यामा :** इंदीवर म्हणजे नीलकमल. त्याच्याप्रमाणें श्याम. इन्दीवरश्याम आणि गौर वर्णाच्या संगमापासून अन्योन्यशोभेनें सौंदर्य अुत्पन्न होतें ही संस्कृत कवींची कल्पना जुनी आहे. तुलना :

अिन्दीवरश्यामतनुर्नृपोऽसौ
त्वं रोचनागौरशरीरयष्टिः ।
अन्योन्यशोभापरिवृद्धये वां
योगस्तडित्तोयदयोरिवास्तु ॥ (रघुवंश)

**सुधाजला :** सुधा = अमृत. अमृतासारखें जल असलेली. शिवाय अमृत पांढरें मानलें आहे. तेव्हां शुभ्रजल असलेल्या. सुधेचा अर्थ चुना असाहि होतो. धवलजला नदी जणूं काय चुन्याच्या निवळीसारखी असावी अशी दिसते.

**जाह्नवी :** गंगा. सगरपुत्रांच्या उद्धारार्थ भगीरथ गंगेला घेऊन चालला असतां वाटेंत जह्नु नांवाच्या अेका राजर्षीची यज्ञसामग्री तिच्या प्रवाहांत वाहून गेली. तेव्हां रागावलेल्या जह्नूनें स्वतःच्या तपोबळानें सर्व गंगा पिऊन टाकली! पण भगीरथानें त्याची हात जोडून प्रार्थना केल्यावर त्यांनीं गंगेला स्वतःच्या कानांतून (कांहींच्या मतें मांडीतून) सोडून दिलें. जह्नु ऋषीच्या कानांतून बाहेर पडली म्हणून यापुढें गंगेला जाह्नवी असें अेक नवीन नांव प्राप्त झालें.

**परिरंभ:** आलिंगन.

**नामरूप सोडून :** तुलना: यथा नद्यः स्यंदमानाः समुद्रे । अस्तं गच्छन्ति नामरूपे विहाय । (कठउपनिषद्)

## तापी

पृ. ५० **विग्रह :** युद्ध; वेगळें पाडणें.

**संधि :** तहाकरितां अेकत्र करणें. नदी सर्वांना अेकत्र आणते.

राजनीतींत कार्यसिद्धीचे सहा मार्ग सांगितले आहेत: १ संधि, २ विग्रह, ३ यान (चढाअी), ४ स्थान अथवा आसन (मुक्काम करणें), ५ संश्रय (आश्रय घेणें) आणि ६ द्वैध अथवा द्वैधीभाव (दुटप्पीपणा).

**आत्मरतिः आत्मक्रीडः ।**

(आत्मरति = आत्म्यांतच आनंद मानणारे; आत्मक्रीड = आत्म्यांतच रममाण होणारे; आत्मन्येव संतुष्ट = आत्म्यांतच संतोष मानणारे.)

पृ. ५२ **जीवनाची स्मृति सुरू होते तो काळ :** १८९१–९२

## नेपाळची गंगा

पृ. ५३ **अतिमानुषी :** अलौकिक; मनुष्याच्या पलीकडील (अिं Superhuman.)

**भगिनी निवेदिता** : स्वामी विवेकानंदांच्या आंग्ल शिष्या. मूळचें नांव मार्गरेट नोबल. हिन्दु झाल्यावर त्यांचें भगिनी निवेदिता असें नांव ठेवण्यांत आलें. त्यांनीं लिहिलेल्या अनेक महत्त्वाच्या पुस्तकांत The Web of Indian Life या नांवाचें अेक सुन्दर पुस्तक खास पाहण्याजोगें आहे. अि. स. १८९८ सालीं त्या हिन्दुस्थानांत आल्या व १९११ सालीं वारल्या.

**पृ. ५४ गोरक्षनाथ** : अयोध्येजवळ जयश्री म्हणून अेक नगर होतें. तेथें सद्बोध नांवाचा अेक ब्राह्मण व सद्वृत्ति नांवाची त्याची स्त्री राहात असत. त्यांना मुलबाळ कांहींच नव्हतें. अेकदां मत्स्येन्द्रनाथ भिक्षेच्या निमित्तानें तेथें आले. सिद्ध साधु पुरुष जाणून दुःखी सद्वृत्तीनें स्वतःस संतति नसल्याचें मत्स्येन्द्रनाथांना सांगितलें. त्यांनीं प्रसाद म्हणून तिला भभूति ( अंगारा ) दिला. पण प्रसादाचें सेवन करण्याअेवजीं विश्वास न बसलेल्या सद्वृत्तीनें तो अंगारा अुकिरड्यावर फेकून दिला. बारा वर्षांनीं मत्स्येन्द्रनाथ परत आले व मुलगा कोठें आहे म्हणून विचारूं लागले. सद्वृत्तीनें त्यांना खरी हकीकत सांगितली. तेव्हां अुकिरड्याजवळ जाअून मत्स्येन्द्रनाथांनीं 'अलख' म्हणून हांक मारली. ती अेकतांच 'आदेश' असें प्रत्युत्तर करणारी गोरक्षनाथाची बालमूर्ति बाहेर आली! (म्हणूनच गोरखनाथाला 'अयोनिज' म्हटलें आहे). गुरूजवळ राहून गोरखनाथ सर्व विद्या शिकले. मत्स्येन्द्रनाथ योगी होते तसेच भोगीही होते. पण गोरखनाथाचें वैराग्य अग्नीप्रमाणें प्रखर होतें. सिंहलद्वीपाच्या प्रमिला राणीच्या मोहपाशांतून गोरखनाथानेंच पुढें मत्स्येन्द्रनाथांना सोडविलें. योगी, शिवोपासक, अद्वैतवादी आणि किमियागार म्हणून गोरखनाथांची प्रसिद्धि आहे. त्यांचे मठ बंगाल, पंजाब, नेपाळ, काठेवाड, महाराष्ट्र, लङ्का, अि० ठिकाणीं आढळतात.

मत्स्येन्द्रनाथ व गोरखनाथ हे गुरख्यांचे देव आहेत. गोरखनाथांच्या नांवावरूनच नेपाळ्यांचें गुरखा हें नांव पडलें.

नेपाळांत बौद्धांचा महायान पंथ चालत असे. त्याचा गोरखनाथानें यशस्वी प्रतिकार करून त्यांच्यांत शिवाची अुपासना प्रचलित केली होती. (गोरखनाथाच्या कालाचा निर्णय अजून होअू शकला नाहीं.)

## दक्षिणगंगा गोदावरी

**पृ. ५५ अतिशय सुखाचे दिवस . . . आघात :** पंचवटींत सीता व लक्ष्मण यांच्या बरोबर घालविलेले सुखाचे दिवस; आणि सीता-हरणाचा आघात.

**वाल्मीकींच्या . . . :** क्रौंचवधासारख्या अेका लहानशा प्रसंगामुळें वाल्मीकींच्या करुण भावनेंतून ज्याप्रमाणें रामायणासारखें महाकाव्य निर्माण झालें त्याप्रमाणें.

**कषाय :** तुरट

**कल्पांतिक :** ( कल्प + अन्त + अिक ) सृष्टीच्या अंतापर्यंत टिकेल असें ( सृष्टि अेक कल्प टिकते असें समजतात. त्याचा हिशोब असा : ४३,२०,००,००० मानवी वर्षें = १०० युग = ब्रह्मदेवाचा अेक दिवस = अेक कल्प )

**जनस्थान :** गोदावरीच्या तीरीं जेथें रामचन्द्र राहिले होते तो दंडकारण्याचा भाग. या ठिकाणीं राक्षसांचा अुपद्रव कमी होता व त्यामुळें लोक ( जन ) तेथें वसती करून राहूं शकत. यावरून त्या जागेला 'जनस्थान' असें नांव मिळालें.

**पृ. ५८ दशग्रंथी :** ऋक्, यजुर्, साम आणि अथर्व हे चार वेद; व शिक्षा ( स्वरोच्चाराबद्दलचें शिक्षण ), छंद, व्याकरण, निरुक्त ( व्युत्पत्ति व अर्थासंबंधीं ), ज्योतिष् आणि कल्प ( सूत्र ) अशीं सहा वेदांगें; अशा दहा ग्रंथांचें पठण करून पारंगत झालेला ब्राह्मण.

**व्यवस्थापत्रें :** निर्णयपत्रें, निकाल.

**पृ. ५९ अष्टावक्रा :** आठी अंगांनीं वांकडी; अनेक वळणें घेअून वाहणारी.

**पृ. ६० जीवनवितरण :** जीवन = पाणी; वितरण = वांटप. येथून पाणी वाटण्यास सुरवात केली.

**यानान :** समुद्रकांठीं गोदावरीच्या मुखाजवळ असलेलें फ्रेंच संस्थान ( १७५० मधें तें फ्रेंच्यांच्या ताब्यांत गेलें. )

**पृ. ६१ भवभूतींचें स्मरण :** भवभूतीनें 'अुत्तररामचरितां'त गोदेच्या विविध सौंदर्याचें वर्णन केलें आहे म्हणून.

**वैदिक प्रभात :** वेदकाळीं आर्य जेथें राहत असत तेथें प्रभात धुक्यानें परिपूर्ण असे. म्हणून येथें अंधुक प्रभाताला असें म्हटलें आहे.

**अवतरले :** खालीं अुतरले. [ अव ( खालीं ) + तृ ( जाणें ) ]

**कवीच्या प्रतिभेप्रमाणें :** "प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा मता।" अशी प्रतिभेची व्याख्या आहे. (नवनवीन स्फुरण देणारी ती प्रतिभा.)

## सुवर्ण देशाची माता

**पृ. ६४ वेड्या लोकांचें काम :** याच्याबरोबर अुलट अेके ठिकाणीं लेखकानें लिहिलें आहें : "प्रवासी मनुष्य अितिहास किंवा दंतकथा अैकतो. पण त्यांची चर्चा करत बसायला त्याला फुरसद नसते. फुरसत असलीच तर तो कल्पनातरंग चालवतो" हि. प्र०

**वाफर :** स्टीमलॉंचला गोव्याच्या बाजूस वाफर म्हणतात. स्टीमवर चालणारी ती स्टीमर तसेंच वाफेवर चालणारें तें वाफर. ( मात्र हा शब्द नपूंसकलिंगी आहे. )

**पृ. ६५ जीवन :** पाण्याचें अेक नांव.

**पृ. ६७ कृपेचा अुत्पात :** कृपेला वर अुसळविणें, कृपेची पराकाष्ठा करणें. येथें महापुराचा अुल्लेख आहे. नाअील नदींत पूर आल्यानें जो सुपीक चिखल चहूंकडे पसरतो त्याला अिजोप्शियन भाषेंत 'नाअिलची कृपा' म्हणतात. तशीच अिरावतीची कृपा. महापूर आला असतां या कृपेचा अुत्पात होतो, पराकाष्ठा होते.

**सोन्याचीं बोटें :** पागोडा मंदिराचे सोन्याचे कळस.

**भवभूति आणि कालिदास :** याच पुस्तकाचें पान ६७ पाहा.

कालिदास आणि भवभूति समकालीन अर्थातच नव्हते; वर दिली ही अेक दंतकथा आहे.

**पृ. ६८ शान राज्यें :** ब्रह्मदेशांत सरहद्दीला लागून असलेलीं अर्धस्वतंत्र राज्यें. शानलोक वर्णानें गोरे, धर्मानें बौद्ध आणि कर्मानें अुद्योगी शेतकरी आहेत. धातूच्या वस्तु बनविण्यांत त्यांचा हातखंडा

आहे. गोंदून घेण्याचा यांना फार नाद आहे. यांच्यांत बहुपत्नीकत्वाची चाल आहे.

**संकर** : मिश्रण; भेसळ.

**अनिच्चा वत संखारा अि०** :— अुत्पत्ति आणि नाश हाच ज्यांचा स्वभाव असे सर्व सृष्ट पदार्थ खरोखर अनित्यच होत.

**बालक** : अमेरिका अगदीं परवांपरवांपर्यंत ओसाड होतें.

## जोगचा धबधबा

**पृ. ७० मनसा चिंतितम्** : आपण मनांत आणतों अेक आणि दैव करतें दुसरेंच.

**पृ. ७१ स्थितधीः किं प्रभाषेत०** — स्थितप्रज्ञ कसा बोलतो, कसा बसतो, कसा चालतो? (गीता. २-६४)

**कुलशिखरिण** : सबंध श्लोकाचा अर्थ खालीलप्रमाणें आहे. अरे बुद्धिहीना, विपत्तीच्या वेळीं महात्म्यांचा धैर्यनाश झालेला पाहण्याची तुझी अिच्छा असेल तर तो व्यर्थ प्रयत्न सोडून दे. असले महात्मे तुमच्या क्षुद्र कुलपर्वतांप्रमाणें किंवा पामर सागराप्रमाणें प्रलयकाल आला तरी स्वधर्मकर्माचा नियम अुल्लंघीत नाहींत. (स्वतःची मर्यादा न सोडणारा सागर आणि स्वतःचें स्थैर्य न सोडणारे कुलपर्वत प्रलयकाल आला म्हणजे मात्र स्वधर्म विसरतात. पण महात्मे तर कधींच
१ चलायमान होत नाहींत.)

**पृ. ७३ प्रतीप** : अुलट; विरुद्ध [प्रति (अुलट) + अिप् (पाणी)]

**पृ. ७४ जोग** : येथें जोग शब्दाचे दोन अर्थ घेऊन श्लेष उत्पन्न केला आहे.

**पृ. ७५ नमः पुरस्तात्०** —"हे सर्वा! तुला पुढून, मागून, सर्व बाजूंनीं नमस्कार असो. तुझें वीर्य अनंत आहे. तुझी शक्ति अपार आहे. सर्व तूंच धारण करतोस. म्हणूनच तूं सर्व (म्हटला जात) आहेस."
(गीता ११-४०)

**सुदुर्दर्शमिदम्०** — "जें माझें रूप तूं पाहिलेंस त्याचें दर्शन दुर्लभ आहे. देव देखील हें रूप पाहण्यास उत्सुक असतात." (गीता ११-५२)

**व्यपेतभीः०** :– “भीति सोडून प्रसन्न-चित्त हो आणि तेंच माझें रूप पुन्हां पाहा” (गीता ११–४९)

**पृ. ७६ मणिबेन**: सरदार पटेलांची मुलगी.

**लक्ष्मी** : राजगोपालाचार्यांची मुलगी — श्री देवदास गांधींची पत्नी.

**“ अण्णा ”** — म्हणजे राजाजी

**पृ. ७७ पत्रं नैव यदा०** – “ केरड्याच्या झाडाला जर पानें नसतील तर त्यांत वसंताचा काय दोष ? घुबड जर दिवसा पाहात नसेल तर त्यांत सूर्याची काय चूक ? ”

**अुच्छिष्ट**: अुष्टें या अर्थी हा शब्द येथें योजला नाहीं. ‘ बाकी राहिलेलें ’ (शेतकऱ्यानें कापणी करून घेतल्यावर अुरलेलें) असा अर्थ आहे.

**परिग्रहो भयायैव** : परिग्रहांत – संग्रह करून ठेवण्यांत – अेकंदरींत भयच आहे.

**नीस कोटीचे** ( gneiss ) पापुद्रे असलेला दगड.

**पृ. ७९ भैरवजाप** : “ जेथें पर्वतावर अत्युच्च शिखर व जवळच तुटलेला कडा असतो त्याला भैरवघाटी म्हणतात. जुन्या काळीं ( व आज देखील कधीं कधीं ) भैरव सम्प्रदायी लोक असल्या ठिकाणीं येअून भैरव मंत्राचा जप करीत करीत अुडी घेत. अशा तऱ्हेनें आत्महत्या करण्यांत पाप तर नाहींच पण मोक्ष मिळतो असे मानलें जातें. ही मान्यता आजकालच्या कायद्याप्रमाणें चुकीची असेल तर असो, पण मानसशास्त्री त्याच्यामागें राहिलेलें तत्त्व सहज समजूं शकतील. जगांत सर्व तऱ्हेनें निराश होअून नामर्दपणानें आत्महत्या करणें, आणि निसर्गा–बरोबर अेकरूप होण्याची अिच्छा होअून व निसर्गापासूनचें भिन्नत्व सहन न झाल्यामुळें देहबंधन विसरून जाअून अनंतत्वांत विलीन होण्याकरितां प्रयत्न करणें या दोन गोष्टी परिणामीं अेक असल्या तरी वस्तुतः भिन्न आहेत. प्रत्येक प्रकारच्या विनाशाला ‘ मरण ’ या अेकच नांवानें आपण ओळखतों, पण वस्तु अेकच नसते. कित्येक वेळां मरण हें जीवनरूपी नाटकाचा विष्कंभक असतें; आणि कित्येक वेळां तर तें नाटकाचें भरत–वाक्य — जीवनसाफल्य — असतें ” ( हि. प्र. )

**नाभिनन्देत मरणम्०** :– मरणाचीही हौस बाळगूं नये आणि जीवनाचीहि बाळगूं नये.

**पृ. ८० नीरो**: अि. स. ५४ से ६८ पर्यंत राज्यावर असलेला रोमचा अेक अत्यन्त क्रूर बादशाह.

**आर्तिनाशनम्** ( दुःखी लोकांच्या ) दुःखांचा नाश करणें. तुलना: कामये दुःखतप्तानां प्राणिनामार्तिनाशनम् ।

**पृ. ८२ प्रायः कंदुकपातेन** : आर्य मनुष्य पडतो तो साधारणपणें चेंडूप्रमाणें पडतो. म्हणजे पडून पुन्हां वर चढतो. ( अनार्य पडतो तो मातीच्या ढेंकळाप्रमाणें पडतो असा या श्लोकांतील पुढील चरणाचा अर्थ आहे. )

**पृ. ८३ न हि कल्याणकृत् अि०** : कल्याण करणारा कधीं दुर्गतीप्रत जात नाहीं.

**पृ. ८६ देवेन्द्र**: सिलोनचा दक्षिण भाग. यालाच अिंग्रज लोकांच्या जड जिभेनें Dundra Head असे नांव दिलें आहे.

**नारायण सरोवर**: सिंध आणि कच्छच्या मधें असलेलें अेक सरोवर.

**जीवनराशि** : जलराशि

**अधःपात** : खालीं पडणें.

( जीवन व अधःपात शब्द वापरून लेखकानें श्लेष साधला आहे. )

**पृ. ८७ पुनरागमनाय च**: धार्मिक प्रसंगीं पूजेच्या शेवटीं देवांचें विसर्जन करतांना 'पुनरागमनाय च — म्हणजे परत येण्याकरितां — आपण आतां जावें' असें म्हणतात. लेखकाच्या या वासनेची किंवा संकल्पाची पूर्ति कांहीं वर्षांत कशी झाली याचें वर्णन पुढील लेखांत आहे.

## जोगचें पुनर्दर्शन

**पृ. ८८ आकंठ**: पोटभर: गळ्यापर्यंत [ नयनांना कंठ ( गळा ) असतो कां ? ! ! ]

**भेटवही**: Visitors' Book.

**अेतावान् अस्य०** हा सर्व (हें जें विश्व दिसतें तें) त्याचा केवळ महिमा झाला. तो पुरुष तर ह्यापेक्षां कितीतरी मोठा आहे. (ऋग्वेद — पुरुषसूक्त)

पृ. ८९ **अन्यतम :** अनेकांपैकीं अेक (one out of many)

**तप :** बारा वर्षें (तपश्चर्या सफल व्हावयास बारा वर्षें लागतात अशी मान्यता आहे.)

**प्रतीप-प्रवास :** प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनें केलेला प्रवास.

पृ. ९० **कोकिला :** खरें म्हणजे कोकिल-नरच गातो. कवींनीं (व लेखकांनीं) द्यावें पाहिजे तर श्रेय स्त्रीजातीला.

पृ. ९१ **धारावाही :** सतत चालणारा.

**अनुदरी :** बारीक कमरेची (अक्षरशः पोट नसलेली)

**विश्वजित् अि० :** तुलना : अकिंचनत्वं मखजं व्यनक्ति। (रघुवंश) विश्वजित् यज्ञ केल्यानें आलेलें (मखज), अकिंचनत्व आणि व्यक्त होणें (व्यनक्ति) हे तिन्ही शब्द वरील चरणांतून घेतले आहेत.

**मयासुराचा प्रासाद :** राजसूय यज्ञांत मयासुरानें बांधलेला महाल अनेक चमत्कृतिपूर्ण वस्तूंनीं नटविला होता.

**प्रतिधनुष्य :** आकाशांत अिन्द्रधनुष्याच्या थोडेंसे वर दुसरें अेक धनुष्य नेहमीं दिसतें. या प्रतिधनुष्यांतील सात रंगांचा क्रम मूळ अिंद्रधनुष्यांतील रंगांच्या क्रमाच्या बरोबर अुलट असतो.

**सुरधनु आणि सुरधुनि :** आकाश-धनुष्य आणि आकाश-गंगा. प्रपाताला स्वर्गीय नदी म्हणून लेखकानें शब्दजालांतून गोडी अुत्पन्न केली आहे.

**मर्त्यलोकांत प्रवेश :** पुण्यक्षय झाला म्हणजे स्वर्ग सोडून मृत्युलोकांत परत यावें लागतें (क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति — गीता ९.२१) 'पुण्यक्षय' व 'मर्त्यलोक' हे दोन शब्द वापरून लेखकानें स्वर्गसुखाचें सूचन केलें आहे.

पृ. ९४ **रोमे रोलाँ :** अहिंसेचा प्रचारक प्रख्यात फ्रेंच साहित्यिक. शांततेच्या प्रचारार्थ याला नोबल प्राअिझ मिळालें होतें.

**पुण्य-प्रकोप** : Righteous indignation.

**आर्षवाणी** : ऋषींची वाणी

**मानवकलाकृति** : सृष्टींत जें सौंदर्य असतें त्याला कला म्हणतां येत नाहीं. कला ही मानवीच असते. प्रकृतींत फक्त सौंदर्यच असतें. प्राकृतिक सौंदर्य कलेच्या अुत्पत्तीला प्रेरणा देणारें कारण आहे; तें स्वत: कलाकृति नव्हे.

**पढतमूर्ख** : समर्थ श्री रामदासस्वामींनी ही शब्दयोजना मूळ केली आहे. Learned fool

शैले गे, प्रिय कन्यके, करुनियां अुत्कर्ष शालेय तूं
'साहित्याभिरुची असो मम सदा अुत्कृष्ट' या हेतुनें,
अभ्यासार्थ जधीं पितामहकृती घेशील तूं वाचण्या,
'शैली-बोधिनी' ही असो तव करीं घेण्या रसास्वादन.

— सतीश

# आमचीं मराठी प्रकाशनें

**अेक धर्मयुद्ध** – लेखक : महादेव हरिभाअी देसाअी; अनु. पां. ग. देशपांडे; पृ. सं. ८ + ९८; किंमत ०–१४–०, पो. ०–१–६

**विधायक कार्यक्रम** – त्याचें रहस्य व स्थान – लेखक : मो. क. गांधी; अनु. पां. ग. देशपांडे; पृ. सं. ४०; किंमत ०–६–०, पो. ०–१–०

**आमच्या बा** – ( त्यांची जीवन-कस्तुरी ) – लेखिका : वनमाला परीख व सुशीला नय्यर; अनु. ना. ग. जोशी; पृ. सं. ८ + २१४ किंमत २–०–०, पो. ०–५–०

**हिन्दस्वराज** – लेखक : मो. क. गांधी; अनु. पां. ग. देशपांडे; पृ. सं. २४ + १०७; किंमत ०–१२–०, पो. ०–१–६

**जीवनांतील आनंद** – लेखक : दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर; अनु. पां. ग. देशपांडे; पृ. सं. १६ + ३०६; किंमत २–८–०, पो. ०–६–०

**मलेरिया** – संपादक : विठ्ठलदास म. कोठारी; अनु. पां. ग. देशपांडे; पृ. सं. ८ + ४२; किंमत ०–६–०, पो. ०–१–०

**नवजीवन कार्यालय**
पो. बॉक्स १०५, **अमदावाद**

दा. क. 5632

REFBK 0005832

REFBK-0005832